पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
www.peoplespost.in

# द पीपल्स पोस्ट

वर्ष : १ । अंक सोळावा । मराठी पाक्षिक । मूल्य : २५ । दिनांक १६ ते ३० एप्रिल




# फॅसिझम नकोच नको!

**विशेष संपादकीय**

सावधान! दारात आलंय राष्ट्रभक्तीचं सोंग!




मोदी-शाह देशावरील संकट ! राज ठाकरे



मोदींनी खोटे बोलून जगात भारताची अब्रू कादली - ॲड.प्रकाश आंबेडकर



## With Best Compliments

# Sos. Agrotech Pvt.Ltd



संपादक
चेतन शिंदे

मांडणी व सजावट
सचिन ओव्हाळ

मुखपृष्ठ
भूषण बिरारी



संपादकीय पत्रव्यवहार

११, तळमजला, बी ब्लॉक,
लक्ष्मी निवास, जे. के. सावंत मार्ग
यशवंत नाट्यमंदिरासमोर, माहिम (प.)
मुंबई ४०००१६

संपर्क

८८८८५४१८२२
९५८८४५११५१
E mail :
thepeoplespost2014@gmail.com



(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)

*अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असेलच असे नाही.

द पीपल्स पोस्ट | ८८८८५४१८२२

- जाहिरात विभाग संपर्क
९८२१४४५४०९/ ८८०५१५१४५२

- वर्गणीदारांसाठी संपर्क
**महाराष्ट्र / मुंबई :**
**विदर्भ** : अंकुश वाकडे : ९४२१४२४२४२
**मराठवाडा** : सचिन : ७३५००९१५६९
**मुंबई / कोकण** : संकेत तांबे : ७७३८७८४१३२

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष
**द पीपल्स पोस्ट** या नावाने काढावा


THE PEOPLE'S POST द पीपल्स पोस्ट THE PEOPLE'S POST

पाक्षिक
# द पीपल्स पोस्ट
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : १ ।
अंक १६ वा । मूल्य : रु. २५ । दिनांक १६ एप्रिल ते ३० एप्रिल २०१९



संपादकीय ६

तुझ्या व्होटांवरी गाणे लोकशाहीचे — प्रा.जयदेव डोळे ९

माध्यमांची मोदीनिष्ठा आणि आचारसंहितेची ऐसीतैसी — प्रकाश खंडेलोटे १४

दलित पक्षांच्या मतांमध्ये घट होत आहे का? — डॉ. माला मुखर्जी २०

मुलाखत : देशाचे स्वातंत्र्य धोक्यात, अघोषित आणीबाणी संपवा – खा.शरद यादव — चेतन शिंदे २५

मोदी–शाह देशावरील संकट –राज ठाकरे २८

मोदींनी खोटे बोलून जगात भारताची अब्रू काढली – ॲड.प्रकाश आंबेडकर ३३

ऊर्मिला मातोंडकर: अभिनयाकडून राजकारणात प्रतिनिधी ३८

ग्रंथपरिचय : श्रमिकांचे जग : काल, आज आणि उद्या — डॉ. मिलिंद कसबे ४०

आजकालचे प्रश्न : : पंक्चरवाला ४२

कविता : – प्रा.डॉ. सिद्धोधन ४५

कोण काय बोलतं... : ४६



हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक धम्मपाल भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए-४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. *संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील.) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. प्रकाशित झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. नोंदणी क्र. MAHMAR/2018/76460




## अंक वाचनीय आणि संग्राह्य

*'डॉ. बाबासाहेबांच्या लोकशाहीकडे चला' अशी हाक देणारा १६ मार्च ते ३१ मार्च २०१९ चा अंक विशेष वाचनीय होता. गुलामी मानसिकतेतून बाहेर पडण्यासाठी लोकांनी मतदानाचा हक्क बजावला पाहिजे. केवळ हक्क बजावूनच चालणार नाही, तर सजगतेने मतदान केले पाहिजे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटनेच्या माध्यमातून सामान्य माणसाला स्वाभिमानाने जगण्यासाठी जे हक्क दिले, त्याचा वापर जागरूकतेने केला तरच या हक्कांना काही अर्थ राहील. तुम्हाला तुमचे हक्कही व्यवस्थित वापरता येत नसतील तर शत्रू तुमचा गळा घोटायला तयारच आहे. लोकशाहीव्यवस्था संकटात आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या पक्षांपासून सावध राहून मतदान करण्याचे आवाहन संपादकीयातून करण्यात आलेले आहे, ते योग्यच आहे. प्रकाश खंडेलोटे यांचा संसदीय राजकारणाचा इतिहास मांडणारा लेखही अभ्यासपूर्ण होता. निवडणूक आयोगाची माहिती देणारा 'लोकशाहीचा उत्सव आणि निवडणूक आयोग' हा लेखही उत्तमच होता.* **– सुहास रमण, पुणे**

## मूलतत्त्ववाद्यांना उखडून टाकलेच पाहिजे

*देशातील लोकशाही, सामान्य माणसाचं जीवन आणि एकूणच या देशातील व्यवस्था विस्कळीत करण्याचं काम भारतीय जनता पक्ष आणि संघ परिवार करीत आहे. जनतेने विश्वासाने दिलेल्या सत्तेचा हा दुरूपयोग आहे. भाजप पुन्हा सत्तेवर आला तर देशाचा कारभार चालविणारी राज्यघटनाच तो बदलून टाकण्याची भीती आहे. त्यामुळे १ ते १५ एप्रिलच्या अंकात ज्या महनीय लेखक महोदयांनी सत्तेतील मूलतत्त्ववादी भाजपला उखडून टाकण्याचं जे आवाहन केलेलं आहे, ते स्वागतार्हच आहे. भाजपला निवडून न देण्याची ५० कारणे अग्रलेखात देण्यात आलेली आहेत, ती कोणत्याही भारतीयाला मनोमन पटणारीच आहेत. 'अन्यायी राजवटीला निवडून देताना विचार करा' हा न्या. पी.बी. सावंत यांचा लेखही मनुवादी आणि मनीवादी राजवटीवर टीकास्त्र सोडणारा आहे. 'देशहितासाठी विवेकी जनता सत्ता परिवर्तन घडवेल' हा डॉ. रावसाहेब कसबे यांचा आणि प्रो. सुखदेव थोरात यांचा, 'मागासवर्गीय समूह सत्तापरिवर्तनाच्या अपेक्षेत' हा लेखही भाजपला सत्तेवरून दूर करण्याची गरज व्यक्त करणारा आहे.*

**– विजय कांबळे, मुंबई**

## नागपुरातील संघटनांची भूमिका स्वागतार्हच!

*मोदी सरकारच्या कारभारावर ताशेरे ओढून त्याविरूद्ध राजकीय पक्षांसाठी जाहीरनामा प्रकाशित करणाऱ्या आणि सामान्य लोकांच्या हिताचे सरकार आणण्याचा आग्रह करणाऱ्या नागपुरातील ४० अशासकीय संघटनांच्या भूमिकेचे कुण्याही सच्चा भारतीयांनी स्वागतच केले पाहिजे. या संघटनांच्या भूमिकेवर प्रकाश टाकणारा प्रो. सुखदेव थोरात यांचा १ ते १५ एप्रिलच्या अंकातील लेख लोकांना सजग करणारा होता. एवढेच नाही तर भाजपने साडेचार वर्षांच्या राजवटीत केलेल्या काळ्या कारनाम्यांची ती चिरफाड होती. प्रोफेसर सुखदेव थोरात यांच्या लेखातून भाजपच्या राजवटीने देशाला दिलेल्या यातना, दुःख मांडण्यात आले आहे. लोकसभा निवडणुकीत लोकांनी कोणती भूमिका घ्यावी, हेही या लेखाने सांगितले आहे.* **– सुनंदा काळे, सातारा**

## भाजपने खरेच लोकशाही धोक्यात आणली

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मल्लिकार्जून खरगे यांचा १ ते १५ एप्रिलच्या अंकात प्रसिद्ध झालेला 'काँग्रेसने देश घडवला, भाजप सरकारमुळे लोकशाही धोक्यात' हा लेख वास्तव मांडणारा होता. या लेखात खरगे यांनी भाजपच्या राजवटीतील गलथान कारभारावर ताशेरे ओढतानाच काँग्रेसने आपल्या ५४ वर्षांच्या कारकीर्दीत बजावलेल्या कामगिरीचा लेखाजोखाही मांडलेला आहे. काँग्रेसने काय केले, असे ऊठसूठ विचारणाऱ्या भाजपच्या नेत्यांनी हा लेख वाचला तर त्यांना कळेल, की काँग्रेसने आपल्यापूर्वी देशासाठी काय केले? पंडित जवाहरलाल नेहरूंनी देशाची संरचनात्मक बांधणी केली आणि त्याला पुढे इंदिरा गांधी, राजीव गांधी, पी.व्ही. नरसिंहराव यांनी आकार दिला. भाजपने हे लक्षात घेतले पाहिजे की, काँग्रेसने देशासाठी खूप काही केले आहे. **– विनायक शिर्के, नांदेड**

## काँग्रेसनेच देश घडवला

*१ ते १५ एप्रिलच्या अंकातील मल्लिकार्जून खरगे यांचा लेख भाजप नेत्यांच्या डोळ्यात अंजन घालणारा आहे. खरगे यांनी आपल्या या लेखात, काँग्रेसने घडवलेला देश बिघडवण्याचे काम भाजप करीत असल्याचे जे चिंतन मांडले आहे, ते वास्तवच आहे. ऊठसूठ काँग्रेसने काय केले, याचा धोशा लावणाऱ्या भाजप नेत्यांनी हा लेख बारकाईने वाचला तर त्यांची ही काँग्रेसद्वेषाची टेप आपोआप बंद होईल. वास्तविक, लोकशाहीविरोधी कृत्यांना अभय देणाऱ्या भाजप सरकारने आपण पाच वर्षांत जे दिवे लावले, त्याने सामान्यांच्या आयुष्यात प्रकाश निर्माण झालेला आहे का, याचे आत्मपरीक्षण करावे. खरगे यांनी त्यांच्या या लेखातून हेच सांगितले आहे.* **– अनंत पाटील, औरंगाबाद**

'द पीपल्स पोस्ट' हे पाक्षिक समता, स्वातंत्र्य, न्याय व बंधुत्व या सर्वोच्च मूल्यांचा पुरस्कार करणारे नियतकालिक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेल्या तत्त्वज्ञानाचा आग्रहाने पुरस्कार करत आहे. देशातील शोषित-पीडित, वंचित समूहाचे प्रश्न मांडणे, त्यांच्याविषयीचे प्रबोधनात्मक लेखन, वाचनाची परंपरा पुढे घेऊन जाण्याचा प्रयत्न करत आहे. १ एप्रिल ते १५ एप्रिल २०१९ च्या 'द पीपल्स पोस्ट' मधील विशेष संपादकीयावर वेगवेगळ्या ठिकाणांहून काही कौतुकाच्या तर काही शिव्या, टीका, धमक्या देणाऱ्या प्रतिक्रिया आल्या आहेत. अनेकांनी अत्यंत अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली आहे तर सांगली, औरंगाबाद, लातूर, उस्मानाबाद, मुंबई या ठिकाणी अनेकांनी अंकाच्या हजारो प्रती घेऊन वितरीत केल्या आहेत. आलेल्या सर्व प्रतिक्रियांचे आम्ही खुल्या मनाने स्वागत करत आहोत. विचारी वाचकांच्या पाठबळावर आमचा प्रवास यापुढेही अत्यंत निर्भीडपणे चालू ठेवणार आहोत. १५ व्या अंकातील अग्रलेखावरच्या काही प्रतिक्रिया येथे देत आहोत.

**– संपादक**

## देशद्रोही पाक्षिक

काँग्रेसच्या पैशावर राहुल गांधींची दलाली करणारा 'द पीपल्स पोस्ट'चा फडतूस अंक वाचनात आला. अत्यंत द्वेषाने भरलेला अग्रलेख वाचून संपादकाच्या बुद्धीची कीव आली. एका बाजूला नरेंद्र मोदी यांचे सरकार जगात भारताचा सन्मान वाढवत असताना त्यांच्याबद्दल चुकीचे लिहिणे, त्यांच्याबद्दल अपप्रचार करणे अत्यंत निषेधार्ह आहे. खऱ्या राष्ट्रभक्ताच्या विरोधात पैसे घेऊन बिनबुडाचे आरोप करणे देशद्रोहाचे लक्षण आहे.

**– अमित यादव, घाटकोपर, मुंबई**

## भाजप विरोधात लिहायला लाज वाटत नाही का?

विशाल – हॅलो, कोण बोलतय?
संपादक – कोण पाहिजे?
विशाल – 'पीपल्स पोस्ट'ला नंबर लागलाय का?
संपादक – हो.
विशाल – का रे, ...... भाजपच्या विरोधात लिहायला लाज वाटत नाही का? भाजपला का मत द्यायचं नाही? मोदीजींनी काय काम केले तुला माहीत नाही काय? पुढल्या अंकात भाजपला मत दिलं पाहिजे, याची १०० कारणं लिहून आली पाहिजेत. नाही तर तुझा पेपर जाळून टाकीन. (मेसेंजरवर आलेला एक कॉल)

**– विशाल पाटील, नवी मुंबई**

## रावसाहेब कसबे काँग्रेसी विचारवंत

मराठा आरक्षणाला विरोध करणारे रावसाहेब कसबे हे काँग्रेसने पोसलेले विचारवंत असून त्यांचं आयुष्य काँग्रेसचं समर्थन करण्यात गेलं आहे. काँग्रेसच्या बाजूने असलेली जनता म्हणजे विवेकी जनता आहे का?

**– अंकुश खाडे, अहमदनगर**

## राहुल गांधी संपादकाचा बाप आहे का?

भाजपला मत न देण्याची ५० कारणं 'द पीपल्स पोस्ट'च्या संपादकाने विशेष संपादकीयात लिहिली. पहिल्यांदाच पाकिस्तानच्या सीमेत घुसून दहशतवाद्यांना धडा शिकवणाऱ्या मोदींना मत द्यायचे नाही तर पप्पू असलेल्या राहुल गांधींना मत द्यायचे का? भाजपला मत द्यायचे नाही तर काँग्रेसला मत द्यायचे का? काँग्रेसच्या मुलाखती छापून संपादकाने राहुल गांधी आपला बाप असल्याचे सिद्ध केले का? राहुल गांधी काय संपादकाचा बाप आहे का?

**– राम कायंदे, भुसावळ**

## भारत हिंदू राष्ट्रच

आरएसएसमुळेच देशाची हिंदू संस्कृती टिकली असून या देशात राहणारा प्रत्येक माणूस हिंदू आहे. हा देश हिंदूंचा असल्यामुळेच हिंदुस्थान म्हटले जाते. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी पुन्हा पंतप्रधान झाले तर अधिकृतरित्या हिंदू राष्ट्र करतील. त्यावेळेस तुमच्यासारख्या देशद्रोह्यांचा निकाल ते नक्की लावतील.

**– अमितेश जोशी, लातूर**

## काँग्रेसची दलाली बंद करा

अख्खं जग मोदींचं कौतुक करत असताना, देशातील वृत्तपत्रे, टी.व्ही.चॅनल्स मोदींनी केलेल्या विकास कामांचा गवगवा करत असताना, काँग्रेसची दलाली करणाऱ्या 'पीपल्स पोस्ट'ने भाजपला मतदान न करण्याचे आवाहन केले आहे. त्यांच्या या फालतू आवाहनाला कोणी प्रतिसाद देणार नाही. नक्षलवादाचे समर्थन करणाऱ्या लोकांना घेऊन काही लिहिल्याने मोदींची राष्ट्रभक्ती कमी होणार नाही. त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या लोकांची संख्या कमी होणार नाही. उलट मोदी बहुमतांनी निवडून येणार आहेत.

**– सुबोध माने, सांगली**





# सावधान! दारात आलंय राष्ट्रभक्तीचं सोंग!

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटनेवरील चर्चेदरम्यान एक अतिशय महत्त्वाचं विधान केलंय. हे ऐतिहासिक विधान असं होतं, 'कोणताही पक्ष आणि कोणताही नेता जर राष्ट्र आणि राज्यघटनेपेक्षा स्वतःला श्रेष्ठ मानायला लागला तर हा लोकशाहीचा डोलारा कोसळायला वेळ लागणार नाही.' हे क्रांतिकारी विधान आज आठवायचं कारण म्हणजे लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान आणि भाजप व त्यांचा नेता नरेंद्र मोदी ज्या पद्धतीनं भाषणं करत आहेत, ज्या पद्धतीनं मतं मागत आहेत आणि ज्या पद्धतीनं निवडणूक जाहीरनाम्यात देव, धर्म, मूलतत्त्ववाद आणि खोट्या आश्वासनांची गर्दी करत आहेत ते पाहता डॉ. बाबासाहेबांनी देऊन ठेवलेला इशारा आठवल्याशिवाय राहत नाही. मुळात हे समजून घेतलं पाहिजे की, 'आरएसएस'चं अपत्य असलेला भाजपची राष्ट्राची कल्पनाच वेगळी आहे. राष्ट्र कसं असावं, याचे जणू काही पेटंटच 'आरएसएस'ने आपल्या हातात घेतले आहेत. आपलं अपत्य असलेल्या विविध संघटनांकडून ते उच्चारले जात असतात. त्यातीलच एक भाग म्हणजे लष्करातील चाळीस जवानांनी केलेल्या बलिदानाचा आदर म्हणून भाजपला मत द्या, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी सांगत आहेत. हे असं का बोललं गेलं? जवानांनी केलेल्या बलिदानाचं असं राजकारण आणि मतकरण गेल्या सत्तर वर्षांत कोणीच केलं नव्हतं. भाजपवाल्यांनी ते केलं; कारण पक्षालाच ते राष्ट्र समजत आहे.उत्तर प्रदेशचे वाचाळ आणि भगवे मुख्यमंत्री आदित्यनाथ यांनी तर नेहमीप्रमाणेच कहर केला आहे. ते म्हणाले, मोदी सेनेने दुश्मनांना गोळ्या घातल्या. काँग्रेसचे लोक अतिरेक्यांना बिर्याणी घालत होते आणि मोदी सेना गोळ्या घालत आहे. यातला बिर्याणीचा विषय बाजूला ठेवू; कारण पाकिस्तानचे नेते जेव्हा आपल्याकडे येतात, विशेषतः जनरल मुशर्रफ यांच्या दौऱ्यात तेव्हा भारतात सत्तेवर असलेल्यांनी काय खायला घातले होते, याचा इतिहास आहे. अर्थात, तो कोठे बोलला जाणार नाहीय. तर अतिरेक्यांना गोळ्या कोण घालत होतं? भारतीय लष्कर की मोदी सेना? सर्जिकल स्ट्राईक कोण करत होतं भारतीय लष्कर की मोदी सेना? गेल्या पाच वर्षांत या चाळीस जवानांशिवाय जे चार-पाच हजार जवान चकमकीत शहीद झाले त्यांचं काय केलं मोदींनी? खरं तर मोदी आणि आदित्यनाथ पोपटासारखे बोलले. यापूर्वी संघप्रमुखांनीही चार तासांत स्वयंसेवकांचं सैन्य उभं करू, असं म्हटलंच होतं की! संघाचे बाहुले असणारे दुसरं काय करणार? आपलं लष्कर, सैन्य स्वतंत्र आहे. राज्यघटनेनं त्यांना राजकारणापासून दूर ठेवत स्वयंभू बनवलं आहे. त्यांच्या हालचाली म्हणजे पक्षाच्या हालचाली समजणं आणि त्यांच्या त्यागाचं राजकारण, मतकरण करणं

लोकशाहीविरोधी, राज्यघटनेविरोधी आणि नैतिकतेविरोधी आहे. ज्या ज्या देशात लष्कराचा राजकारणासाठी उपयोग झाला ते देश एक तर रसातळाला पोहोचले किंवा तेथे हुकूमशहा जन्माला आले किंवा हुकूमशहाच्या तंत्रावर चालणारी सरकारे आली आणि गेलीही. शेवटी लष्कर ही अशी गोष्ट आहे की, ती सर्व प्रकारच्या राजकारणापासून दूर आणि देशभक्तीसाठीच्या त्यागाशी बांधली गेली आहे. सामान्य माणसाला पक्ष, सरकार आणि राष्ट्र यातला फरक कळत नाही म्हणून गैरफायदा घेणे चुकीचं आहे. असे प्रयत्न म्हणजे विस्तवाशी खेळ आहे. सर्जिकल स्ट्राईक असो, चकमकी असोत हे सारं लष्कराचं कर्तव्य असतं. सरकारे येतात-जातात, राजकारण येते-जाते; पण स्वयंभू, स्वायत्त आणि त्यागी असणाऱ्या संस्थांना कोणी राजकारणात ओढत नाही. याउलट मोदी म्हणतात मी केले, मी केले आणि मीच केले. गेल्या सत्तर वर्षांत सत्तेवर असताना कोणा पंतप्रधानावर चित्रपट निघाला नाही. गेल्या सत्तर वर्षांत सत्तेत असताना कोणी स्वतःच्या नावानं टी. व्ही. चॅनल सुरू केलं नाही. गेल्या सत्तर वर्षांत ऐन निवडणुकीच्या काळात कोणी स्वतःवरील चित्रपट प्रदर्शित करण्याचा प्रयत्न केला नाही; पण तो यावेळी झाला. याचा अर्थ काय तो मतदारांनी समजून घेतला पाहिजे. मते मागण्यासाठीचे सारे विषय संपतात तेव्हा काही पक्ष, काही नेते स्वतःचे रूपांतर पवित्र गाईत करतात आणि लष्कर, देव, धर्म, धर्मस्थळं यांच्या नावानं मतं मागायला लागतात. जगातल्या प्रत्येक हुकूमशहानं असेच केलं आहे. कोणी वंश, कुणी धर्म तर कुणी भावनांचे डफ वाजवत हुकूमशहा बनलेला होता. लक्षात घ्यायला पाहिजे की, भाजपचे राष्ट्र हिंदुत्ववादाच्या, मनुस्मृतीच्या वाटेवरून प्रवास करणारे आणि संघाच्या हिंदू राष्ट्राकडे, सांस्कृतिक राष्ट्राकडे जाणारे आहे आणि असे राष्ट्र कुणालाच परवडणार नाही. धर्माधिष्ठित राष्ट्र भेदाभेदावर, कुणाच्या तरी द्वेषावर उभे असते. विषमता घेऊन मिरवत असते. मोदी दुसऱ्यांदा लोकसभा लढवत आहेत. चुलीवर स्वयंपाक करणाऱ्या महिलांच्या डोळ्यातील धूर त्यांना दिसतो. उघड्यावर शौच करणाऱ्या महिलांची त्यांना दया येते. खरं तर ती कुणालाही यायला पाहिजे; पण गुजरातमध्ये विशिष्ट समूहातील लोकांची कत्तल त्यांना का दिसत नाही? आपणच मुख्यमंत्री असताना झालेला नरसंहार त्यांना का आठवत नाही? त्याविषयी ते माफी का मागत नाहीत, त्यावेळी त्यांना सांगण्यात आलेला विशेष म्हणजे वाजपेयींनी सांगितलेला राजधर्म ते का आठवत नाहीत, गुजरातचा गृहमंत्री म्हणजे अमित शहा सत्तेवर असताना हद्दपार कसा झाला आणि गेल्या सत्तर वर्षांत असे घडले नव्हते असं मोदी का सांगत नाहीत? कोणतं राष्ट्र आपल्या मनात आहे आणि कोणत्या गोष्टीला ते राष्ट्रप्रेम म्हणतात ते का सांगत नाहीत? लोकांना संमोहित करण्याची, त्यासाठी छाती बडवून घेण्याची, नकाश्रू व्यक्त करण्याची, छातीची लांबी-रुंदी सांगण्याची कला त्यांच्याकडे आहे. एकाधिकारशाही बनण्याचे स्वप्न बाळगणाऱ्या प्रत्येकाकडे ती असतेच. किंबहुना ती एक पात्रताच असते. गेल्या पाच वर्षांत राष्ट्रद्रोहाची नवी व्याख्या करण्यात आली. नेत्यावर टीका केली की राष्ट्रद्रोह, सरकारवर टीका केली की राष्ट्रद्रोह, कुणी काही विद्रोही लिहिलं, बोललं की राष्ट्रद्रोह. हे सारं एकाच कारणासाठी घडत होतं आणि ते म्हणजे भाजप आणि त्याच्या सरकारनं स्वतःचं रूपांतर राष्ट्रात करण्याचा प्रयत्न चालवला आहे. यापुढं ते काय करतील याची कल्पनाच केलेली बरी. भाजप सत्तेवर आला तो काही जनकल्याणाचा कार्यक्रम घेऊन नव्हे. दोन गोष्टी त्याच्याकडे होत्या. एक म्हणजे महात्मा गांधी आणि काँग्रेसचा द्वेष आणि दोन : देवाधर्माचं काम. सत्तेवर आल्यानंतर पाच वर्षे त्यानं राम मंदिराचा विषय काढला नाही. ते काम साधू सेनेकडे सोपवले. आता सत्ता पुन्हा मिळवण्याची वेळ आली तेव्हा भाजपच्या ७५ कलमी जाहीरनाम्यात देवासाठी मोठं कलम देण्यात आलं. जी राष्ट्रं देवाधर्माच्या नावानं राज्य करतात, निवडणुका जिंकतात ती लाल दिव्याच्या गाडीत बसूनही अंधारयुगाकडे प्रवास करत असतात. एकाधिकारशाहीला तेच हवं असतं. जेव्हा या देशाच्या स्वातंत्र्याला जेव्हा ७५ वर्षे पूर्ण होतील तेव्हा राम मंदिर उभं राहिलेलं असेल असं आता ते सांगत आहेत. याचा अर्थ अजूनही काही निवडणुकांत त्यांना राम वापरायचा आहे. याशिवाय ३७०वं कलम आहे. तलाक पद्धत आहे आणि हो शबरीमलाही आहे. ज्या मंदिरात सर्वांना प्रवेश द्या, असा आदेश सर्वोच्च न्यायालयानंच दिला आहे तेथे भाजप काय करणार? निर्णय फिरवणार आणि महिलांना मंदिराबाहेर रोखणार का, असा प्रश्न आहे. काश्मीरविषयी असलेल्या स्वतंत्र कलमाला आणि समान नागरी कायद्याला संघाचा प्रारंभापासून विरोध आहे. आता या कलमांनाही भाजपच्या निवडणूक जाहीरनाम्यात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष जागा मिळाली आहे. या साऱ्याचा एकत्रित अर्थ काय होतो आहे? एक-हिंदू राष्ट्रनिर्मितीकडे जाण्यासाठी टाकलेलं महत्त्वाचं पाऊल म्हणजे हा जाहीरनामा. दोन-सामान्य माणसाला त्यांच्या जगण्या-मरण्याच्या प्रश्नापासून दूर करून भावनाप्रधान बनवण्याचा प्रयत्न आणि तीन-विद्यमान राज्यघटना आणि लोकशाही किती फोल आहे हे सांगण्याचा प्रयत्न आणि चार-बाबासाहेबांनी गाढलेल्या मनूला पुन्हा एकदा जीवित करण्याचा हा प्रयत्न. बाबासाहेबांच्याच मतानुसार प्रतिक्रांतीचा हा प्रयत्न आहे. प्रतिक्रांती चालवायची की राज्यघटना आणि लोकशाहीच्या मदतीनं यशस्वी होत गेलेल्या क्रांतीकडे चालायचे हा मतदारांसमोरील आणि सर्व नागरिकांसमोरील एक गंभीर प्रश्न आहे. राष्ट्राला, स्वातंत्र्याला, समतेला, बंधुतेला तुडवत गेल्याशिवाय प्रतिक्रांती कधी होत नसते. राष्ट्रासाठी कधीच न लढलेले लोक जेव्हा प्रतिक्रांती करण्याची स्वप्न पाहतात तेव्हा काळ मोठा कठीण आलेला असतो. भारतीय लोकशाही अशा काही कठीण काळातून यापूर्वीही चालली आहे. आताचा काळ यापेक्षा कठीण आहे. पूर्वी मारहाणीतील जखमा दाखवता येत होत्या, आता त्या दाखवता येत नाहीत. कारण मार मुक्का आहे. शेळीचे शेपूट आखूड का, असा प्रश्न विचारला तरी देशद्रोह होतो. हरामजादे ठरवले जाते. म्हणूनच स्वतःला हवा तसा सुंदर समाज घडवण्याचं काम नागरिकांच्या हातात असतं. नागरिक जर खोट्या




स्वप्नांना भुलले तर मात्र काही खरं नाही. नागरिकांच्या मनात राज्यघटनेनं पेरलेलं सुंदर स्वप्न पूर्ण व्हावं आणि त्यासाठी त्यांनी या निवडणुकांचा वापर करावा. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, लष्करातील काही अधिकाऱ्यांनी अर्थात निवृत्त अधिकाऱ्यांनी 'बालाकोट'एअर स्ट्राईक आणि 'पुलवामा' हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांचा संदर्भ घेऊन राष्ट्रपतींना पत्र लिहिलं आहे. निवडणूक आयोगाकडे तक्रारही केली आहे. लातूरच्या प्रचारसभेत मोदींनी'भाईयो और बहनो' म्हणत असं सांगितलं की, पहिल्यांदा पगार मिळाल्यावर तुम्ही ते पैसे आई-वडिलांना देता तसं तुम्हाला पहिल्यांदा मिळालेलं मत शहीद जवानांसाठी द्याल का? कमळ किंवा धनुष्यबाणावरील बटण दाबून सांगाल का तुमचं मत थेट मोदींना मिळालं. अर्थात लष्कराच्या शौर्याचं आणि त्यागाचं श्रेय कोणी पुढाऱ्यानं घेणं म्हणजे लष्कराचा अवमान आहे. हे सारं वाचल्यानंतर एकच गोष्ट लक्षात ठेवा आणि ती म्हणजे कोणताही पक्ष आणि नेता राष्ट्रापेक्षा मोठा नसतो. राष्ट्रात तयार झालेली, राष्ट्राने तयार केलेली सत्ता हस्तगत करण्यासाठी तयार झालेल्या एजन्सी म्हणजे पक्ष, नेते व राजकारणी असतात. एजन्सी बदलत जातात. जसं की बँकांकडून भली मोठी कर्ज मिळवून देणारा आणि ती बुडवण्याची युक्ती सांगणारा एजंट वेगळा तर राफेलचा वेगळा. राष्ट्र म्हणजे सामान्य माणसाच्या हृदयाची एकत्रित स्पंदनं असतात. लष्कर आणि राज्यघटना तेच असते. बाबासाहेबांनी कार्लाइलचा विचार देऊन सांगितलं आहे की, जेव्हा सरपटणारी माणसं, शिमग्यातला रंग वापरून स्वतःची कुरूपता संपवण्याचा प्रयत्न करणारी माणसं, सामान्य माणसांना मूलतत्त्ववादाची अंघोळ घालणारी माणसं आपल्या मोठ्या सावल्या टाकायला लागतात तेव्हा समजावं संधिकाल जवळ आलाय. खरं तर ही सावध राहण्याची वेळ असते. संधिकाळानं आपल्या सावल्यांच्या काटेरी मगरमिठीत घेण्याची आपण वाट पाहायची नसते. धर्म, राजकारण आणि भांडवलशाही एकत्र नसते. धर्म, राजकारण आणि भांडवलशाही एकत्र येतात तेव्हा लोकशाहीची, देशाची वाट लागत असते. ज्यांना राष्ट्रापेक्षा धर्म प्यारा असतो ते राष्ट्रभक्तीच्या कल्पना धर्म भक्तीकडे ओढत आहेत. एक मोठं मायाजाळ, एक मोठा भ्रम तयार केला जात आहे. या भ्रमाला ओळखण्याची आणि तो दूर करण्याची एक संधी म्हणजे ही निवडणूक असते. आपण हे समजून घेतलं नाही तर इतिहास आपल्याला माफ करणार नाही; कारण उद्या भ्रमालाच इतिहास समजलं जाईल.शेवटी काहीही असो, पाण्यावर मिरवणारा गाळ एक दिवस खाली बसतोच आणि स्वच्छ, नितळ पाणी दिसायला लागतं. बुद्ध हेच सांगत होते; पण हे करत असताना थोडी सावधगिरी बाळगायला लागते. गाळ आणि पाणी यातला फरक समजून घ्यावा लागतो. राष्ट्र, राज्यघटना आणि पक्ष यातला फरक समजून घ्यावा लागतो. आपल्या सर्वांना ठाऊकच आहे की, बहुरूपी आपल्या पोटासाठी रोज नवं सोंग घेऊन आपल्या दारात उभा राहतो. कधी राम, कधी कृष्ण, कधी इन्स्पेक्टर, कधी राष्ट्रभक्त तर कधी आणखी कशाचं तरी सोंग घेतो. क्षणभर आपण दचकतो, गोंधळतो. पण जेव्हा तो काही मागायला लागतो तेव्हा 'दूध का दूध, पानी का पानी' होतं.अरे हा तर खोटा राम, खोटा देशभक्त हे लक्षात येतं. आताही तसंच आहे. राष्ट्राचं, धर्माचं, रामाचं सोंग घेऊन येणारे कोण आहेत? आणि खरंच क्षत्रिय रामाशी यांचं काही देणं-घेणं आहे का ओळखा. शिवाय डॉ. बाबासाहेबांच्या राज्यघटनेचं एकूणच ब्रीद 'सत्यमेव जयते' आहे. सोंग कोणतंही येवो, कुणाच्याही नावानं मताची भीक मागितली जावो; पण शेवटी शिल्लक राहतं ते 'सत्यमेव जयतेच.' प्रश्न आहे तो या अजरामर, वैश्विक आणि मानवी जीवन सुंदर आणि अर्थपूर्ण करणाऱ्या वचनावर विश्वास ठेवण्याचा. ●●●




# तुझ्या व्होटांवरी गाणे लोकशाहीचे



प्रा.जयदेव डोळे

मतदान नेहमीच दोन पर्यायांमधील निवड असते आणि प्रत्येक पर्यायाचा परस्परांवर दबाव असतो. नाझी पद्धतीप्रमाणे हो आणि नाही एवढ्यावर सरकार चालत नसते. येणारी निवडणूक हाच प्रत्येक उमेदवाराचा पर्याय असतो. त्यासाठी तो/ती जबाबदारी स्वीकारीत राहते. पक्षकार्यात अग्रेसर अथवा गर्क असते. भाजपच्या प्रचारात खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी 'आपका हर एक वोट मुझे मिलनेवाला है' असे सांगत आहेत किंवा 'आपका वोट मोदी सरकार का वोट होगा' असे बोलत आहेत. म्हणजे जो कोणी उमेदवार आहे तो बिनकामाचा, बिनमहत्त्वाचा असे त्यांच्याकडून ठरवणे चालू असून अध्यक्षीय निवडणुकीसारखे स्वतःच आपला प्रचार करीत मोदी हिंडत आहेत.

''माझा सर्व विश्वास अस्पृश्य वर्गाच्या मतदारांवर आहे. तुम्ही कोणत्याही प्रकारच्या लाचलुचपतीला बळी पडता कामा नये. मतेही एक अमोल चीज आहे..... लक्षात घ्या की, आपल्याला काही अधिकार नाही, ब्राह्मणांचे धार्मिक सामर्थ्यही आपल्याला नाही, सामाजिक सामर्थ्यही नाही. म्हणून आपल्यासाठी मत ही राजकीय क्षेत्रातील एक अमोलिक चीज आहे. ती विकता कामा नये. आपण अल्पसंख्याक आहोत. तेव्हा आपण एक एक दाणा निवडून भरला तरच पोते भरेल. ज्याला ज्याला मतदानाचा अधिकार आहे, त्याने अवश्य मतदान केले पाहिजे.'' (डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८, भाग ३, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००२, पृष्ठ ३८१)

लोकसभेच्या भंडारा मतदारसंघात एप्रिल १९५४ मध्ये पोटनिवडणूक झाली. तीत डॉ. आंबेडकर उमेदवार होते. त्यावेळी त्यांनी जे भाषण केले, त्यातील वरील एक उतारा आहे. या



**आम्ही आमचे खरे प्रतिनिधी संसदेत आणि राज्य विधानसभांमध्ये पाठवले तर ते आपल्या प्रश्नांसाठी लढू शकतील. त्यामुळे आपली मुले चांगलं शिक्षण घेऊ शकतील आणि आपली गरिबी दूर होऊ शकेल. जीवनाच्या सर्व क्षेत्रात आपल्याला समान वाटा मिळेल, असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी २८ ऑक्टोबर १९५१ रोजी लुधियाना येथे दिलेल्या भाषणात सांगितले होते.**

निवडणुकीत डॉ. बाबासाहेब पराभूत झाले. आपल्याला स्पृश्य समाजानेही मतदान करावे असेही त्यांनी म्हटले होते. या भाषणात त्यांनी असंख्य मुद्दे मांडले तरी मतदान म्हणून त्यांनी स्वजातीयांची काय स्थिती आहे ते अत्यंत स्पष्ट सांगितले होते. अज्ञान, निरक्षरता आणि गरिबी यामुळे दलित मतदार आपले मत विकतात, हे डॉ. बाबासाहेबांना माहीत होते. त्याचबरोबर एक राजकीय हक्क कसा सावधपणे वापरायचा याबद्दलही ते मतदारांना बजावतात. दहशत, हिंसा, अडवणूक यामुळेही दलित मतदार मतदान करू शकत नसत. पण ज्यांना शक्य आहे, त्यांनी सर्व ती आमिषे व धाकदपटशा झुगारून मतदान केले पाहिजे, असे डॉ. आंबेडकर म्हणायचे.

आपल्या देशाची अडचण अशी की, फार मोठे चिंतक नेते त्याला लाभूनही लोकशाही, राजकारण, निवडणुका इत्यादी महत्त्वाच्या प्रश्नांवर सलग एक पुस्तक असे कोणी लिहू शकले नाही. गांधी, नेहरू, पटेल, बोस, लोहिया, जयप्रकाश, आंबेडकर, मानवेन्द्रनाथ रॉय असे असंख्य विद्वान नेते देशाने स्वातंत्र्य चळवळीच्या काळात पाहिले; परंतु प्रत्येकाची लोकशाही, समाजवाद अशा विषयांवरील निरनिराळी भाषणे, लेख यात सारे विचार विखुरले गेले आहेत. स्वातंत्र्य, समानता, लोकशाही यांच्या प्रस्थापनेसाठी संघर्ष करण्यात प्रत्येकाचा इतका वेळ गेला की, शांतपणे एका विषयावर सलग पुस्तकासारखे लिखाण कोणी करू शकले नाही. तरीही प्रत्येक नेता आवर्जून भारतापुढील महत्त्वाच्या समस्या हाताळतो अन् त्यावर लेखन, चिंतन करतो हे केवढे महत्त्वाचे! आजचा एकही नेता ना कागदावर काही लिहितो, ना पुस्तके वाचून काही व्यवस्थित भाषणे करतो! सारा व्यवहार उथळ, उनाड आणि हास्यास्पद!!

## सरकार बायप्रॉडक्ट

: भारताने राज्यकारभार करण्याची पद्धती लोकशाहीची ठरवली आहे. लोकशाहीचा गाभा म्हणजे कारभाऱ्यांवर लोकांचा लगाम. जे धोरणं ठरवणारे लोक असतात, त्यांच्यावर लोकांचे नियंत्रण! या नियंत्रणाचा व्यवहार म्हणजे निवडणूक. लोकांचा लगाम मतदानाच्या माध्यमातून लागतो. सत्ता प्रत्यक्ष मतदारांच्या म्हणजे लोकांच्या हातात नसणार; परंतु जनतेचे प्रतिनिधी जनतेच्या नावाने कारभार हाकणार. म्हणून या सरकारला लोकांचे सरकार, लोकनियुक्त सरकार किंवा स्वयंशासन असे म्हटले जाते.

म्हणून मतदान महत्त्वाचे. मतदानाचे आणखी एक महत्त्व म्हणजे मतदानातून सरकार जन्मते. म्हणून सरकार हे एक उपउत्पादन आहे, बायप्रॉडक्ट आहे! मतदानाशिवाय, निवडणुकीशिवाय सरकार अस्तित्वातच येत नसल्याने मतदान जनकासारखे असते. मतदान व निवडणूक यांचे महत्त्व सरकारपेक्षा अधिक असल्याचे कारण हे आहे. याचाच विशाल अर्थ हा की, मतदान मंत्र्यापेक्षा मोठे! मतदान करणारा पंतप्रधान, मुख्यमंत्री यांच्यापेक्षा महान. निर्माता मोठा असतो, निर्मिती नव्हे. एक मत, एक पत याचा मूलार्थ हा आहे.

## सत्तेतील वाटा

सत्तेत अप्रत्यक्ष सहभाग असा जो मतदार या नात्याने अधिकारप्राप्त झालेला आहे, तो मतदाराला अधिक सोपा, गोंधळात न टाकणारा असावा म्हणून राजकीय पक्षांना चिन्हे, झेंडे, रंग आदी व्यवस्था केलेली असते. कित्येकदा सारखी नावे असलेले उमेदवार उभे केले जातात, तेव्हा चिन्ह लक्षात ठेवावे लागते. गंमत अशी की, आपले मतदान म्हणजे येणाऱ्या सत्तेमध्ये आपला वाटाच आहे, असे मुळी भारतीय मतदाराला वाटतच नाही. किंबहुना ते माहीतच नाही. तरीही मतदान केल्यांनतर ते कोणी, का, कशासाठी केले, हेतू काय, कारण काय हे धड स्पष्ट होत नाही. व्यक्तिगत मतदाराला आपले मतदान एक वैयक्तिक अथवा खाजगी गोष्ट वाटू शकेल. त्याचा-तिचा राग, अपेक्षा, आनंद किंवा निष्ठा म्हणूनही ते केले जात असेल. अभिमान असो की, कर्तव्य, मातीकाम करणाऱ्याला अन् शास्त्रज्ञाला मतदान हा एक अत्यंत भावनिक असा प्रसंग असतो, हे लक्षात ठेवायला हवे. निवडणुकीत मतदान करणे आणि निवडणुकीसाठी मतदान करणे यात फार फरक आहे. एकात अधिकार आहे, तर दुसऱ्यात उपचार!

भाजप, मोदी व त्यांचे सरकार यांनी मतदान म्हणजे उत्सव, महोत्सव असे वर्णन सुरू केले आहे. फेस्टिव्हल असे त्याचे स्वरूप ठरवले. लोकशाहीचा उत्सव म्हणे! प्रश्न लोकशाहीचा आहेच, पण तो जन्मणाऱ्या सरकारसाठीचा उत्सव असणार आहे. फक्त मतदान करा, मोकळे व्हा, पुढचे आम्ही पाहून घेऊ, असा संदेश मोदी आणि अमित शाह देत आहेत. मतदान आणि सरकार यांचा संबंध भाजपने गोवा, कर्नाटक, अरूणाचल प्रदेश, ईशान्येकडील राज्ये येथे तोडल्याचे आपण पाहिले. मतदान भाजपच्या विरोधात जाऊनही सरकार भाजपचे येते, याचा अर्थ मतदारांची घोर फसवणूकच! असे सरकार मतदारांच्या वतीने कारभार चालवणारे कसे ठरू शकते?

## नकली निकष

यादीमधील ‘सर्वोत्तम व्यक्तीची निवड’ करणे म्हणजे मतदान असाही एक अर्थ मोठ्या लबाडीने मतदारांच्या माथ्यावर मारला जातो. सर्वोत्तम म्हणवली जाणारी व्यक्ती म्हणजे उमेदवार राजकीयदृष्ट्या सर्वोत्तम असल्याचे मानावे कसे? व्यक्ती म्हणून उमेदवाराचा चांगुलपणा लोकप्रतिनिधी म्हणून तसाच असेल हे कशावरून? भाबडेपणा किंवा नादानपणा असा की, प्रामाणिक माणूस, स्वच्छ चारित्र्याचा माणूस किंवा यशस्वी डॉक्टर, उत्कृष्ट शिक्षक, प्रगतीशील शेतकरी निवडणुकीत उतरल्यावर तो जशाच्या तसा ‘चांगला’ असेल असे आधीच ठरवून टाकणे हे वाईट सरकारवर चांगल्या माणसाचे औषध योजने म्हणजे दोन संघर्ष भिन्न गोष्टींची सांगड घालणे. शुद्ध नितीमत्तेची माणसे आपोआप उत्तम प्रशासक, छान कारभारी असतात असे मानणे निखळ बावळटपणाचे आहे! इतिहासात असे कधीही, कोठेही दाखवता येत नाही. एखाद्या व्यवसायामधील कौशल्य सार्वजनिक सेवेसाठी किंवा लोकसेवेच्या धोरणांसाठी उपयुक्त ठरेल असे कसे मानू शकतो आपण? किंवा धोरणे आखण्याच्या राजकीय कलेसाठी व्यक्तीचे तिच्या पूर्वायुष्यातील यश कसे काय उपयोगी पडू शकते? सत्ता नेहमी भ्रष्टच करणारी असते असे आधीच ठरवून चांगल्या माणसांची शिफारस करणे फार धोक्याचे आहे. म्हणून व्यक्तिगत गुणदोष डोळ्यांपुढे ठेऊन मतदान करायला लावणे, म्हणजे पक्षाच्या धेयधोरणांपासून मतदाराला अंधारात ठेवणे. हिंदूराष्ट्र हे मूळ ध्येय भाजपचे आहे; परंतु ते साध्य करायला सज्जन, अभ्रष्ट, नीतिवान, सुशिक्षित व्यक्तीच निवडून द्या, असे म्हटल्याने केवढी फसगत होते प्रत्येकाची! याचा अर्थ चतूर, गुंड, लबाड, खटपट्या उमेदवार निवडून द्या, असा होत नाही. मोदी यांच्या सहकारी मंत्र्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप झाले नाहीत म्हणून ते सारे चांगले, असे मानणे म्हणजे लोकशाही उलथवून हिंदूराष्ट्र जाहीर करण्याच्या कटात सहभागी होणे. हिंदूराष्ट्र सज्जन लोकांनी आणणे काय किंवा भ्रष्ट नसलेल्यांनी स्थापन करणे काय, दोन्हीही वाईटच ना!

निवडणूक म्हणजे लोकप्रियतेची स्पर्धा नसते आणि मतदान म्हणजे लोकप्रिय माणसाला पसंती देणे नव्हे. लोकप्रियतेची स्पर्धा व राजकीय स्पर्धा या दोन्ही गोष्टीत फरत असतो. लोकप्रियतेची स्पर्धा जिंकणाऱ्याला सत्ता मिळत नसते. राजकीय निवडीत मतदाराला हे ज्ञात असते की, आपली प्रतिनिधी म्हणून ही व्यक्ती-उमेदवार महत्त्वाचे निर्णय घेऊन काही बदल घडवील. म्हणजेच सत्तेचा लाभ लोकांचे आयुष्य पालटण्यासाठी ती करील. म्हणून मतदान नेहमीच दोन पर्यायांमधील निवड असते आणि प्रत्येक पर्यायाचा परस्परांवर दबाव असतो. नाझी पद्धतीप्रमाणे हो आणि नाही एवढ्यावर सरकार चालत नसते. येणारी निवडणूक हाच प्रत्येक उमेदवाराचा पर्याय असतो. त्यासाठी तो/ती जबाबदारी स्वीकारीत राहते. पक्षकार्यात अग्रेसर अथवा गर्क असते. भाजपच्या प्रचारात खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी ‘आपका हर एक वोट मुझे मिलनेवाला है’ असे सांगत आहेत किंवा ‘आपका वोट मोदी सरकार का वोट होगा’ असे बोलत आहेत. म्हणजे जो कोणी उमेदवार आहे तो बिनकामाचा, बिनमहत्त्वाचा असे त्यांच्याकडून ठरवणे चालू असून अध्यक्षीय निवडणुकीसारखे स्वतःच आपला प्रचार करीत मोदी हिंडत आहेत. मजबूत सरकार, मुमकीन-नामुमकीन, देशभक्त, राष्ट्रवादी, हिंदुत्त्ववादी सरकार असे काही

# मतदान प्रतिकात्मक नाही

स्वतः पंतप्रधान मोदी सर्व संकेतांची आणि नियमांची मोडतोड करीत औसा (जि. लातूर) येथील जाहीर सभेत तरूणांना म्हणजे पहिलेच मतदान करणाऱ्यांना काय म्हणाले? हे मत तुम्ही पुलवामात शहीद झालेल्यांना समर्पित करू शकाल काय? इवाई हल्ल्यात भाग घेणाऱ्या जवानांच्या शौर्यासाठी अर्पण करू शकता काय? याचा अर्थ भारताची सेना दले आणि भारतीय जवानांचे कार्य भारतीय जनता पक्षाच्या विजयासाठी वापरा; कारण ही कारवाई भाजपच्या सरकारने पाकिस्तानविरूद्ध केली आहे, असे अप्रत्यक्ष म्हणणे! मतदान कोणत्या तरी प्रतिकासाठी अथवा कशाच्या तरी अप्रत्यक्ष गौरवासाठी वापरायला लावणे म्हणजे मतदानाचा मूळ अर्थ नष्ट करणे. सरकारची निर्मिती करणे यापलिकडे कोणत्याही मतदानाचे अन्य महत्त्व नाही. उद्या जर असे कोणी म्हणाले की, मतदान यंत्रे तयार करणाऱ्या कारखान्यातील कामगारांना रोजगार मिळावा म्हणून मतदानास या, तर ते चालेलं का? बोटाला लावायच्या शाईचा व्यवसाय भरभरून चालावा म्हणून मतदानास जा, असे आवाहन केले तर ते खपेल का? एखाद्या राजकीय अधिकाराचे इतके विकृतीकरण भारतात कधी झाले नाही. मोदी ही व्यक्ती केवढी अनितीमान आहे, हे या निमित्ताने समजले. अजूनही काही राज्यांत दलित, गरीब मतदारांना मारझोड करून, धकम्या देऊन मतदान अमुक एका पक्षास वा व्यक्तीस करायला लावतात. दहशत घालून मत समर्पित करायला भाग पाडणे आणि शाबासकी देण्यासाठी मतदान वापरावयास लावणे याचा अर्थ एकच. मोदी यांच्या भाषणात दर्प, दरारा, इशारे व पाहून घेण्याची भाषा वाढू लागली आहे. मतदारांसाठी अशी भाषणेसुद्धा आक्षेपार्ह वाटू शकतात. मतदारांना राजकारण, पक्षाची धोरणे, सरकारच्या योजना, समाजघटकांचे हित-अहित, विरोधकांचे हितसंबंध, आंतरराष्ट्रीय परिस्थिती, अर्थशास्त्र, इतिहास, तत्त्वज्ञान अशा अनेक विषयांत उद्‌बोधनाची गरज असते. त्यासाठी निवडणूक प्रचार ही सर्वोत्तम संधी. मोदी ती घालवीत आहेत.

सांगूनही ते मते मिळवत आहेत.

आपल्या सरकारने काय केले आणि त्याचा लाभ मतदाराला केवढा झाला याचा दाखला त्यांनी द्यायला पाहिजे होता. तो न देता ते काँग्रेस व त्याच्या सहकारी पक्षांवर टीका करीत आहेत. मोदींच्या काळात मतदार कसा अधिकारसंपन्न झाला, हा प्रचाराचा पाया हवा होता. तसे न करता मतदाराचे मन कलुषित कसे होईल हे ते बघत आहेत. प्रचारात उणीदुणी काढून, कमतरता व त्रुटींकडे बोट करणे साहजिक आहे; परंतु मतदाराचे प्रबोधन, जागरण आणि प्रशिक्षण करण्याऐवजी पंतप्रधानाचे पद सांभाळणारा माणूस दोन मतदारांत झुंज लावून देत असल्याचे आढळत आहे. चिथावणी आणि उत्तेजना पसरवून मतदारांना त्यांचा विवेक वापरता येऊ नये असे वातावरण मोदी त्यांच्या वक्तृत्व शैलीमधून तयार करीत आहेत. आपले श्रेष्ठत्व, आपली गुणवत्ता इतरांना तुच्छ लेखून मोदी ठसवू पाहत आहेत.

## मतदारांची सरबराई

मतदारांनी पैसे घेऊन मतदान करू नये असे डॉ. आंबेडकरांनी सांगितले आहेच. त्याहीपेक्षा वेगळे काही आमिष काही राजकीय पक्ष मतदारांना कायम दाखवत असतात. पुष्कळ नगरसेवक, आमदार दर गुरूवारी शिर्डीला साईभक्तांची फेरी नेत असतात. वर्षाला एखादी तीर्थयात्रा काशीला व हिमालयाकडे पाठवत असतात. त्याबदल्यात प्रत्येकाच्या मतांचा हिशेब चोख ठेवतात. बारसे, मयत, तेरावे, सत्यनारायण, विवाह, मुंज हे कार्यक्रमही लोकप्रतिनिधी आपल्या उपस्थितीने भारून टाकत असतात. लग्नपत्रिकाही आता प्रेषक, निमंत्रक या नावांनी राजकीय पुढाऱ्यांच्या वतीने छापल्या जात आहेत. शालेय प्रवेश, दिल्ली व मुंबई येथे मुक्कामाची सोय, रेल्वेचे आरक्षण, पोलिसांत वजन वापरणे, कर्जासाठी दबाव आणि धमक्या द्यायला लावणे, शेतजमिनीला जास्तीचा भाव मिळवून घेणे, बेकार मुलांना पोकलेन, जेसीबी, डम्पर, टिप्पर आदी बांधकामविषयक वाहने घेण्यास लावणे, कंत्राटदारी करण्यास उत्तेजन द्यायला लावणे, आंतरजातीय विवाह मोडण्याच्या कामी मदत घेणे, मुलीने ठरवलेला प्रेमविवाह संपविण्याकामी पुढाकार घ्यायला लावणे, गुन्हेगारीत पोलिसांनी पकडलेल्या कोणाचीही सुटका करवून घेण्याकामी बोलावणे अशी असंख्य कामे मतदार संभाव्य आणि विद्यमान लोकप्रतिनिधींवर सोपवत राहतो. त्याचा दुष्परिणाम मतदाराचे संपूर्ण परावलंबन राजकीय नेतृत्त्वाकडे जाण्यात होते. म्हणजे मतदानाचे जे हेतू आहेत ते स्वतःहून नष्ट करण्यासारखेच आहे. आपले सर्वाधिकार प्रतिनिधींच्या हवाली केल्यावर सत्ताधारी झालेला आमदार-खासदार कोणती धोरणे राबवतोय याकडे मग मतदार साफ काणाडोळा करतो. कित्येकदा ही धोरणे मतदारांच्या हिताविरुद्ध असतात. पण मतदार स्वतःहून निकामी होतो.

## गढूळ वातावरण

ज्येष्ठ अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन असे सांगतात की, निर्णय घेण्यासाठी माहिती हवी असते व ती स्वच्छ, निर्मळ आणि कलुषित नसणारी असेल तर निर्णय अचूक व फायदेशीर होतात. निवडणुकीत उमेदवार, पक्ष, इतिहास, राजकारण यांच्याविषयीची

माहिती व्यवस्थित आणि बिनचूक येत राहिली तर मतदार त्याच्या कलाप्रमाणे निर्णय घेऊन मतदान करू शकतो; परंतु गेल्या चार वर्षांत 'फेक न्यूज' हे प्रकरण सत्ताधाऱ्यांनी व त्यांच्या पाठीराख्यांनी असे उभे केले की, मतदाराला ना नेत्यांबद्दल ना पक्षांबद्दल, ना राजकारण-इतिहास याबद्दल खरी माहिती मिळू शकत नाही. त्याचा फार विपरीत परिणाम मतदान प्रक्रियेवर होत जातो. व्हॉट्सअॅप, फेसबुक, यू-ट्यूब, ट्विटर, इन्स्टाग्राम अशा विविध मंचांवर येणारी माहिती इतकी विकृत व विपर्यस्त असते की, तिने मतदार हमखास चुकलाच म्हणून समजा. अफवा, असत्य, अतिशयोक्ती यांचा प्रचार अशारितीने केला जातो की, जणू हे सारे खरेच. पाठवणारे लोक भाडोत्री, कंत्राटी व कार्यकर्ते म्हणून असतात. म्हणजे नजर चुकीने किंवा अजाणतेपणे हे विकृतीकरण होत नाही. सामान्य मतदार खातरजमा करू शकत नसल्याने बहुतेक खोट्या वार्ता स्वीकारल्या जाऊन मनात काही प्रतिमा तयार होण्यास त्या मदत करतात.

आणखी एक गोष्ट म्हणजे खुद्द उमेदवार व त्यांच्या पक्षांचे नेते जाणीवपूर्वक अशा बाबी आपल्या भाषणांमधून सांगत राहतात की, कोण खरे, काय खोटे, काहीच कळत नाही. हाही एक प्रकार वक्त्यांनी मुद्दाम विकसित केलेला आहे. पंतप्रधान मोदी, भाजप अध्यक्ष शाह हेही यांत अग्रेसर आहेत. अर्धवट अथवा अर्धसत्य माहिती अशी द्यायची की, प्रतिपक्षातील लोक वाईट आणि मत मिळवण्याच्या लायकीचे नाहीत असेच मतदाराला वाटावे. शरद पवारांबद्दल मोदी तीन प्रचारसभांत असेच काही बोलले. तिकडे शाह असे सांगतात की, हवाई हल्ल्यांत किती दहशतवादी मेले याचा आकडा विचारून विरोधी पक्ष भारतीय सेना दलांविषयी अविश्वास व्यक्त करीत आहेत. हे सारे करण्यामागे एक प्रकारची ब्राह्मणी वृत्ती दडलेली आहे. उच्च पदावर बसलेली व्यक्ती आणि उच्च जातीची वा सवर्ण व्यक्ती नेहमी खरेच बोलते असा आभास देशाच्या जातीयवादी परंपरांत तयार झालेला आहे. त्याचा पुरेपूर गैरफायदा अनेक जण घेतात. ब्राह्मणांच्या तोंडचा शब्द म्हणजे देववाणीच जणू या समजुतीचा विद्यमान काळांतही कसा प्रचार चालू आहे....

## ठिसूळ पदार्थ, टिकाऊ विवेक

निवडणूक, प्रचार, मतदान हा सारा बौद्धिक व्यवहार आहे. तो भौतिक करून टाकला तर नुकसान आपलेच आहे. भौतिक म्हणजे तो काही पदार्थांशी जोडला गेला तर तो मूळ हेतूपासून लांब जात राहील. विचार, तत्त्वे, मूल्ये, धोरणे यांवर विचारपूर्वक निर्णय करण्यास या मतदान प्रक्रियेत प्रेरणा मिळते. ज्याचा तर्क, विवेक अधिक सुसंगत त्याला मतदानाचा योग्य तो लाभ घेता येतो. आपली मतदानपद्धती गुप्त असल्याने मनाजोगते मतदान संपूर्ण स्वातंत्र्यासह करता येते. पैसे, दारू अथवा साडीचोळी, धोतर पायजमा या पदार्थांवर आधारलेली मतदान प्रक्रिया त्या पदार्थांएवढीच नाजूक आणि मर्यादित असेल. तिच्यावर उभी राहू पाहणारी लोकशाहीदेखील लवकर फाटणारी व तुटणारी राहील. म्हणून जितके तत्त्व व मूल्य मजबूत तितकी लोकशाही मजबूत राहील. त्यात मतदान निर्धोक, निर्मोही आणि निःस्वार्थ पद्धतीने झाले तर आणखीनच पूरक ठरेल. ●●●

**(सदर लेखासाठी 'अॅन इंट्रोडक्शन टू डेमॉक्रॅटिक थिअरी,' लेखक एच.बी. मायो, १९६७ याचा आधार घेतला आहे.)**






# माध्यमांची मोदीनिष्ठा आणि आचारसंहितेची ऐसीतैसी

प्रकाश खंडेलोटे

निवडणूक आचारसंहिता जशी राजकीय पक्ष आणि उमेदवारांसाठी आहे, तशीच ती सामान्य नागरिकांसाठी, खाजगी आणि सरकारी अशा दोन्ही प्रसारमाध्यमांसाठी आहे. मंत्री, खासदार, आमदार, राज्यपाल या सगळ्यांनाच आचारसंहिता पाळणे बंधनकारक आहे. तरीही, ही मंडळी पदाचं भानं न ठेवता बेताल वक्तव्ये करतात. केंद्रीय मंत्री मनेका गांधी, उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, राजस्थानचे राज्यपाल कल्याणसिंह, नीती आयोगाचे उपाध्यक्ष राजीव कुमार यांनी, आपल्या असल्या–नसलेल्या निष्ठा मोदींच्या चरणी वाहत आक्षेपार्ह वक्तव्य करून आपल्या पदाची अप्रतिष्ठा केली आहे. ही मंडळी सत्ताधारी पक्षाची पालखी वाहणारी असल्यामुळे निवडणूक आयोग सध्यातरी त्यांच्यावर कठोर कारवाई करणार नाही. दूरदर्शन, दूरदर्शन न्यूज आणि आकाशवाणी औरंगाबाद केंद्राच्या वृत्तविभागाने राजकीय पक्षांना प्रसारणकाळ देण्यात पक्षपात करून त्यांच्यासाठी असलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन केले आहे. अनेक वृत्तपत्रांनी काही उमेदवारांच्या पेड न्यूजच्या निकषांमध्ये बसणाऱ्या एकेक, दीड–दीड पान मुलाखती छापून लोकशाही संवर्धनापेक्षा व्यवसायवाढीला महत्त्व दिले आहे. जगभरातील वृत्तपत्रे येथील लोकसभा निवडणुकीचे निःपक्षपातीपणे वार्तांकन करत असताना आमची वृत्तपत्रे मात्र सरकारच्या दावणीला बांधली गेल्याचे दिसते. लोकशाही मूल्यांशी ही प्रतारणा लोकशाहीच्या उत्सवाला गालबोट लावताना दिसते आहे.

**लोकसभा** निवडणूक सुरळीत पार पडावी यासाठी निवडणूक आयोगाने राजकीय पक्ष, उमेदवार आणि प्रसारमाध्यमांसाठी आचारसंहिता लागू केली आहे. सरकारी पक्षाच्या कामगिरीची शासकीय खर्चाने जाहिरात देणे, निवडणूक जाहीर झाल्यानंतर नवीन योजनेचे उद्घाटन करणे, चालू लाभार्थी योजना पुढे सुरू ठेवणे, कार्यादेश देण्यात आलेल्या योजनेचे काम सुरू करणे, पेड न्यूजच्या निकषांमध्ये बसणारा मजकूर छापून आणणे, निवडणूक प्रचारादरम्यान व्यक्तीच्या खाजगी जीवनाशी संबंधित बाबींवर टीका करणे, समाजमाध्यमांवर बेकायदेशीरपणे जाहिरात प्रसृत करणे अशा सर्व प्रकारांना निवडणूक आयोगातर्फे प्रतिबंध घालण्यात आलेला आहे. तरीही अनेक उमेदवार मतदारांना प्रलोभन दाखवून आचारसंहितेचा भंग करीत असतात. सध्या हेच सुरू आहे. मुलाखतीच्या नावाखाली काही उमेदवार आपल्या कामगिरीचे कौतुक करणारा एक-एक, दीड-दीड पान मजकूर छापून आणत आहेत. दूरदर्शन आणि आकाशवाणी या सरकारी माध्यमांचे वृत्तविभाग निवडणूक वृत्त प्रसारणात संतुलन राहील याची काळजी घेताना दिसत नाहीत. आचारसंहितेचे उल्लंघन करणारी बहुतांश मंडळी सत्ताधारी पक्षाची किंवा सत्ताधाऱ्यांची तळी उचलणारी असल्यामुळे त्यांच्यावर निवडणूक आयोग कठोर कारवाई करताना दिसत नाही.

निवडणूक आयोगाने १७ व्या लोकसभेच्या निवडणुकीचा कार्यक्रम १० मार्च रोजी जाहीर केला. निवडणूक घोषित होताच आदर्श आचारसंहिता लागू झाली. निवडणुका पारदर्शक, निर्भीडपणे आणि निर्भयपणे व्हाव्यात, सर्व उमेदवारांना समान संधी मिळावी, कुणावरही अन्याय होऊ नये यासाठी आचारसंहिता महत्त्वाची भूमिका बजावत असते. सर्वच उमेदवार आणि प्रसारमाध्यमांनी याचे भान ठेवायला हवे; परंतु प्रत्यक्षात असे दिसून येत नाही. निवडणुकीला लोकशाहीचा उत्सव असे म्हटले जाते; परंतु आरोप-प्रत्यारोप आणि अमाप पैशांची उधळण करून राजकारण्यांनी या उत्सवाला एक बाजारू स्वरूप आणले आहे.

अलीकडे निवडणुकीत पेड न्यूज हा परवलीचा शब्द झालेला आहे. पैसे देऊन किंवा वस्तूंच्या बदल्यात मुद्रित किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये एखादी बातमी अथवा परीक्षण छापून आणणे ही आयोगाच्या मते पेड न्यूजची व्याख्या. अशा पेड न्यूजच्या माध्यमातून मतदारांवर प्रभाव टाकण्याचा उमेदवारांचा हेतू असतो. पेड न्यूजच्या प्रतिबंधासाठी प्रत्येक जिल्ह्याला एक संनियंत्रण समिती असते. मात्र तरीही काही उमेदवार समितीच्या डोळ्यात धूळफेक करून मुलाखतीच्या स्वरूपात पान-पान मजकूर छापून आणून मतदारांवर प्रभाव पाडत असतात. अलीकडेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अशा प्रकारच्या मुलाखती दोन बड्या दैनिकांमध्ये प्रसिद्ध झालेल्या आहेत. काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांचीही अशीच मुलाखत एका दैनिकात प्रसिद्ध झालेली आहे. यापूर्वी कोणत्याही संदर्भाने एवढा मोठा मजकूर मुलाखत म्हणून छापलेला नसताना निवडणूक प्रचारासाठी उमेदवाराच्या कामाचे कौतुक करणारा मजकूर मुलाखत म्हणून छापणे वृत्तपत्राच्या







कोणत्या नैतिकतेत बसते, हे अनाकलनीय आहे.

**समाजमाध्यमेही आचारसंहितेच्या टप्प्यात :** फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, ब्लॉग ही प्रचाराची प्रभावी साधन असलेली समाजमाध्यमेही आता निवडणूक आचारसंहितेच्या टप्प्यात आली आहेत. त्यामुळे उमेदवाराने या माध्यमांचा वापर करीत असल्याचे शपथपत्र निवडणूक अधिकाऱ्यांकडे देणे बंधनकारक करण्यात आले आहे. प्रत्यक्षात मात्र अनेक उमेदवार प्रचारासाठी करीत असलेला समाजमाध्यमांचा वापर उघड करत नाहीत. प्रतिस्पर्धी उमेदवारांच्या तक्रारीनंतर असे प्रकार उघडकीस येऊ लागले आहेत. शपथपत्रात नोंद न करता प्रचारासाठी समाजमाध्यमांचा वापर करणाऱ्या उमेदवारांविरूद्ध आचारसंहिता भंगाचे गुन्हे दाखल केले जात आहेत. २०१९ ची निवडणूक घोषित होण्यापूर्वीच समाजमाध्यमांवर राजकीय जाहिराती सुरू झाल्या. फेब्रुवारी ते मार्चदरम्यान राजकीय पक्ष आणि त्यांच्या समर्थकांनी फेसबुकवरील जाहिरातींवर १० कोटी रुपये खर्च केल्याचे 'फेसबुक ॲण्ड लायब्ररी'च्या अहवालात म्हटले आहे. यामध्ये सर्वाधिक खर्च भाजप आणि त्यांच्या समर्थकांनी केल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या अहवालानुसार, फेब्रुवारी ते मार्च २०१९ या कालावधीत फेसबुकवर एकूण ५१,८१० जाहिराती होत्या. त्यासाठी १० कोटी ३२ लाख रुपये आकारण्यात आले आहेत. फेसबुकवर सर्वाधिक जाहिराती सत्ताधारी भारतीय जनता पक्ष आणि त्यांच्या समर्थकांनी केल्या आहेत. 'भारत के मन की बात' या पानावर एकूण ३,७०० जाहिराती असून त्यावर दोन प्रवर्गात २ कोटी २३ लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत. भाजपने 'माय फर्स्ट व्होट फॉर मोदी'

# दूरदर्शन, आकाशवाणीच्या अधिकाऱ्यांवर कारवाई होईल काय?

निवडणूक काळात वृत्तप्रसारणासंदर्भात दूरदर्शन न्यूज आणि आकाशवाणीच्या वृत्तविभागासाठी निवडणूक आयोगाने मार्गदर्शक तत्त्वे ठरवून दिली आहेत; परंतु या दोन्ही शासकीय माध्यमांचे अधिकारी या तत्त्वाचे काटेकोरपणे पालन करताना दिसत नाहीत.

निवडणूक जाहीर झाल्यानंतर सरकारी प्रसारमाध्यमांनी विशिष्ट एका पक्षाला दुसऱ्या पक्षाच्या तुलनेत अधिक प्रक्षेपणकाळ देऊ नये, असा दंडक माजी मुख्य निवडणूक आयुक्त टी.एन. शेषन यांनी घालून दिलेला आहे. मात्र त्याला सरकारी माध्यमं हरताळ फासताना दिसत आहेत. १० मार्च रोजी लोकसभा आणि चार राज्यांच्या विधानसभा निवडणुका जाहीर झाल्यापासून ते ५ एप्रिलपर्यंत दूरदर्शन न्यूजने भाजपला १६० तासांचा आणि काँग्रेसला ८० तासांचा प्रक्षेपणकाळ दिला. 'दि इंडियन एक्सप्रेस'च्या १५ एप्रिलच्या अंकात याबाबतचे वृत्त प्रसिद्ध झाले आहे. डीडी न्यूजवर राजकीय पक्षांना दिल्या जाणाऱ्या प्रक्षेपण काळात असंतुलन असल्याचे पत्र निवडणूक आयोगाने केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाला ९ एप्रिल रोजी पाठवले होते. डीडी न्यूजवर सत्ताधारी भाजपला काँग्रेस पक्षाच्या तुलनेत अधिक वेळ दिला जात असल्याची गंभीर दखल घेऊन आयोगाने हे प्रकार तात्काळ थांबवण्याचे निर्देश माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या सचिवांना दिले. डीडी न्यूजच्या अधिकाऱ्यांनी भाजपला जास्तीचा वेळ देऊन निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन केले आहे. सरकारी यंत्रणा सरकारी पक्षासाठीच कशी राबते याचा प्रत्यय ३१ मार्च रोजीदेखील आलेला आहे. या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मै भी चौकीदार' या कार्यक्रमाचे थेट प्रसारण दूरदर्शनने सलग ८४ मिनिटे केले. याबद्दल निवडणूक आयोगाने दूरदर्शनला नोटीस बजावली आहे. वास्तविक, हा कार्यक्रम निवडणूक जाहीर झाल्यानंतर आयोजित केला होता. त्यामुळे मतदारांना आकर्षित करणे हाच या कार्यक्रमाचा हेतू होता, हे उघड आहे आणि तरीही मार्गदर्शक तत्त्वे पायदळी तुडवत कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करून दूरदर्शनने या कामी भाजपला एकप्रकारे मदतच केली. पक्षपातीपणे भाजपला जास्तीचा प्रसारणवेळ देणे असो किंवा 'मै भी चौकीदार' या पंतप्रधानांच्या कार्यक्रमाचे बेकादेशीररित्या प्रसारण करणे असो, या कृती एका विशिष्ट पक्षाचं समर्थन करणाऱ्या आणि म्हणून निवडणूक आचारसंहितेचं उल्लंघन करणाऱ्या आहेत.

**औरंगाबाद आकाशवाणी वृत्तविभागाचा पक्षपात :** औरंगाबाद आकाशवाणी केंद्राच्या प्रादेशिक वृत्तविभागाकडूनही प्रक्षेपण काळात संतुलन न राखता मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन होत असल्याचे दिसते. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष राहुल गांधी यांच्या एप्रिलच्या पहिल्या पंधरवड्यात आपापल्या उमेदवारांसाठी अनुक्रमे ६ एप्रिल आणि १५ एप्रिल रोजी नांदेडला प्रचारसभा झाल्या. मोदींच्या सभेचा वृत्तांत ७ एप्रिलच्या सकाळच्या ७.१० च्या दहा मिनिटांच्या मुख्य बातमीपत्रात देण्यात आला. या बातमीपत्रात मोदींच्या सभेच्या वृत्तासाठी १ मिनिट ४७ सेकंद देण्यात आले. त्यातील ५१ सेकंद मोदींच्या भाषणाची क्लिप ऐकवण्यात आली. राहुल गांधींच्या १५ एप्रिलच्या नांदेडमधील सभेचा वृत्तांत १६ एप्रिल रोजी सकाळी ७.१० च्या मुख्य बातमीपत्रात देण्यात आला. या बातमीपत्रात गांधी यांच्या सभेसाठी केवळ ३८ सेकंद देण्यात आले. औरंगाबाद आकाशवाणीच्या प्रादेशिक वृत्तविभागाचा हा उघडउघड पक्षपातच मानला जात आहे. सरकारी प्रसारमाध्यमांनी राजकीय नेत्यांच्या प्रचारसभा आणि भाषणांचं फेअर आणि संतुलित कव्हरेज दिलं पाहिजे, असा दंडक आहे. संतुलन याचा अर्थ, कोणत्याही पक्षाला इतरांपेक्षा भरीव कव्हरेज दिले जाऊ नये, असा आहे. औरंगाबाद आकाशवाणीच्या प्रादेशिक वृत्तविभागाच्या १ ते ८ एप्रिल अशा आठवडाभरातील बातम्यांचा आढावा घेतल्यानंतर, या वृत्तविभागाचा कल काँग्रेसप्रणित महाआघाडी आणि भाजपप्रणित महायुतीकडेच असल्याचे स्पष्ट होते. या वृत्तविभागाने वरील ८ दिवसांत सत्ताधारी भाजपला ५७८ सेकंद एवढा प्रसारणकाळ दिला तर काँग्रेसला त्याखालोखाल ५६३ सेकंदांचा वेळ दिला. ॲड. प्रकाश आंबेडकरप्रणित वंचित बहुजन आघाडीला औरंगाबाद आकाशवाणीच्या वृत्तविभागाने ८ दिवसांत केवळ ६० सेकंद प्रसारणकाळ दिला. भारतीय कम्युनिस्ट पक्षाला ३६ सेकंद तर बहुजन समाज पक्षाला ८ दिवसात केवळ १९ सेकंद प्रसारणकाळ औरंगाबाद आकाशवाणीच्या वृत्तविभागाने आपल्या मुख्य बातमीपत्रात दिला. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपव्यतिरिक्त बसपा आणि माकप हेदेखील राष्ट्रीय पक्ष आहेत, याचा औरंगाबाद आकाशवाणी केंद्राच्या प्रादेशिक वृत्तविभागाला विसर पडल्याचेच दिसून येते.




केंद्रीयमंत्री मनेका गांधी यांनी सुलतानपूर येथील सभेत मुस्लिमांनी मलाच मतदान करावे, असे वादग्रस्त वक्तव्य केले होते.

# वाचाळवीरांना निवडणूक आयोग का रोखत नाही?

निवडणुका शांततेत पार पाडण्यासाठी प्रत्येकानेच आदर्श आचारसंहितेचं पालन केलं पाहिजे. वरिष्ठ पदांवर विशेषतः घटनात्मक पदांवर असणाऱ्या लोकांनी तरी किमान याचं भानं ठेवलं पाहिजे; परंतु मोदीमॅनिया झालेले मोदींचे मंत्री असतील किंवा सरकारमध्ये वरिष्ठपदी असलेले अधिकारी असतील, त्यांनी आपल्या पदाला अशोभनीय अशी वक्तव्ये करून सरकारप्रती असलेली निष्ठा दाखवून दिली आहे. या लोकांनी केलेले हे आचारसंहितेचे उल्लंघनच होते. निवडणूक आयोगाने मात्र त्यांच्यावर कोणतीही कठोर कारवाई केलेली नाही. उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी, भारतीय लष्कराला 'मोदी की सेना' असे संबोधले. डोळ्यात तेल घालून सीमेवर देशाचे रक्षण करणाऱ्या लष्कराची ही अवहेलनाच आहे. लष्करापेक्षा व्यापाऱ्यांकडे अधिक धाडस असते, अशा शब्दात मोदींनीही लष्कराचा अपमान केला.

काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यात जाहीर केलेल्या किमान हमी उत्पन्न हमी योजनेवर (न्याय योजना) नीती आयोगाचे उपाध्यक्ष राजीव कुमार यांनी टीका केली होती. ही योजना अर्थशास्त्राच्या निकषांनुसार व्यवहार्य ठरत नाही. ही योजना अंमलात आणल्यास देशाच्या अर्थव्यवस्थेची घडी विस्कटेल, असे विधान राजीव कुमार यांनी केले होते. वास्तविक, राजीव कुमार हे शासकीय सेवेत आहेत. त्यामुळे राजकारण्यांसारखं त्यांना काहीही बोलता येत नाही. तरीही याचे भान विसरून, काँग्रेसवर टीका करून आपण मोदीभक्त असल्याचे दाखवून देणे हाच त्यांच्या न्याय योजनेवरील प्रतिक्रियेचा हेतू असावा. राजस्थानचे राज्यपाल कल्याणसिंह यांनी तर, पंतप्रधान पदासाठी मोदींना पाठिंबा व्यक्त केलेला आहे. अमूक एका समाजाने मला मते द्यावीत, अमूक उमेदवाराला मते द्यावीत किंवा देऊ नयेत, असे विधान करणे आचारसंहितेचा भंग ठरतो. 'मुस्लिमांनी मला मते द्यावीत, निवडणुकीनंतर त्यांना माझी गरज भासेल' हे मनेका गांधी यांनी सुलतानपूरच्या प्रचारसभेत केलेले वादग्रस्त वक्तव्य त्यांच्यात लोकशाहीप्रती असलेली अनास्थाच दर्शविते.

काँग्रेसचा जाहीरनामा म्हणजे पाकिस्तानच्या कटाचा भाग हे नरेंद्र मोदी यांचं वक्तव्य म्हणजे करायची म्हणून केलेली टीकाच आहे. आजपर्यंत कोणत्याही सरकारने लष्करी कारवाई निवडणुकीत 'एनकॅश' करण्याचा प्रयत्न केलेला नाही. नरेंद्र मोदी मात्र औसा इथल्या सभेत तुमचं पहिलं मत पुलवामातील शहीद जवानांना अर्पण करणार का, अशी साद घालून जवानांच्या हौतात्म्याचा राजकारणासाठी वापर करतात. एवढेच नाही तर मोदींनी त्यांच्या ३५ सभांमध्ये बालाकोट येथे केलेल्या एअर स्ट्राईकचा उल्लेख केला. औशात मोदी यांनी केलेल्या आवाहनानंतर, लष्कराला राजकारणापासून वाचविण्याचे आवाहन १५६ माजी सैन्य अधिकाऱ्यांनी राष्ट्रपतींकडे केले होते. त्यानंतरही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका वृत्तवाहिनीवरील मुलाखतीत सैन्याच्या कारवाईचे श्रेय मोदींनाच असल्याचे सांगून त्यांच्या वक्तव्याचं जोरदार समर्थन केले. यासाठी फडणवीस, १९७१ च्या युद्धाचं श्रेय काँग्रेसनं लाटल्याचा दावा करतात. वास्तविक, १९७१ च्या निवडणुकीत काँग्रेसने, 'गरिबी हटाओ, इंदिरा लाओ, देश बचाओ' अशी घोषणा करून निवडणूक जिंकली होती. त्यावेळी काँग्रेसला तब्बल ३५२ जागा मिळाल्या होत्या.

# भाजपलाही जडलाय घराणेशाहीचा रोग



डॉ.हिना गवीत



कांचन कुल



पूनम महाजन



डॉ.प्रीतम मुंडे



रक्षा खडसे



रणजितसिंह निंबाळकर



सुभाष भामरे



सुजय विखे पाटील



भारती पवार

**भाजपचे नेते ऊठसूठ काँग्रेसच्या नावे घराणेशाहीची बोंब ठोकतात; परंतु घराणेशाही सर्वच पक्षात आहे, हे ते विसरतात. खुद्द भाजपनेच या निवडणुकीत २३ पैकी ९ उमेदवार घराणेशाहीतले दिले आहेत. माजी मंत्री, आमदार डॉ. विजयकुमार गावीत यांच्या कन्या हिना गावीत, दिवंगत माजी आमदार गोजरताई भामरे यांचे पुत्र सुभाष भामरे, माजी महसुल मंत्री, आमदार एकनाथ खडसे यांच्या स्नुषा रक्षा खडसे, दिवंगत माजी आमदार ए.टी. पवार यांच्या कन्या डॉ. भारती पवार, दिवंगत माजी केंद्रीय मंत्री प्रमोद महाजन यांच्या कन्या पूनम महाजन, आमदार राहुल कुल यांच्या पत्नी, माजी आमदार सुभाष कुल यांच्या सून कांचन कुल, काँग्रेस नेते राधाकृष्ण विखे पाटील यांचे पुत्र सुजय विखे पाटील, दिवंगत माजी केंद्रीय मंत्री गोपीनाथ मुंडे यांच्या कन्या, मंत्री पंकजा मुंडेंच्या भगिनी डॉ. प्रीतम मुंडे, माजी खासदार हिंदुराव निंबाळकर यांचे पुत्र रणजितसिंह निंबाळकर हे भाजपचे उमेदवार घराणेशाहीच्या पुण्याईवरच या निवडणुकीत नशीब अजमावत आहेत.**

व 'नेशन विथ नमो' या पानांसाठीही मोठा खर्च केला असून १,१०० जाहिरातींसाठी ३६ लाख दोन हजार रुपये दिले आहेत. काँग्रेस पक्षाच्या पानावर ४१० जाहिराती असून फेब्रुवारी ते ३० मार्चदरम्यान त्यांचा खर्च ५ लाख ९१ हजार रुपये आहे. बिजू जनता दलाने ८ लाख ५६ हजार रुपये खर्च केले असून तेलुगू देसम पक्षाने १ लाख ५८ हजार रुपये तर राष्ट्रवादी काँग्रेसने ५८ हजार ३५५ रुपये खर्च केले आहेत.

**सरकारच्या दावणीला बांधलेली वृत्तपत्रे :** वृत्तपत्रांना आरशाची उपमा दिली जाते. आरसा जसा माणसाचं प्रतिबिंब दाखवतो, तद्वतच वृत्तपत्रांनीही समाजात घडणाऱ्या गोष्टी जशाच्या तशा लोकांसमोर मांडणं अपेक्षित असतं. त्याहीपेक्षा समता, स्वातंत्र्य, बंधुता या मूल्यांची बूज राखताना लोकशाही व्यवस्था मजबूत बनवण्यासाठी लोकमत घडवण्याचं काम वृत्तपत्रांनी केलं पाहिजे. लोकशाहीचा उत्सव समजल्या जाणाऱ्या निवडणुकांच्या काळात तरी त्यांनी आपल्या जबाबदारीचं भान प्रकर्षानं राखणं अपेक्षित असतं; परंतु १०० टक्के व्यावसायिक दृष्टिकोन ठेऊन बहुतांश वृत्तपत्रांनी लोकशाही उद्ध्वस्त करण्याच्या प्रयत्नात असलेल्या शक्तींना अधिक जागा दिल्याचं दिसतं. अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणे, कायदा हातात घेऊन निरपराधांवर हल्ले करणे, कायद्याचा बडगा दाखवून सामान्य लोकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण करणे असे लोकशाहीविरोधी प्रकार मोदी सरकारच्या काळात अनेकदा घडले. समाजातील अनेक घटक याविरोधात एकत्र आले. निवडणुकीचे निमित्त साधून कलावंत, साहित्यिक, शास्त्रज्ञ, सामाजिक कार्यकर्ते आणि विचारवंतांनी निवेदने काढून भाजपविरोधात मतदान करण्याचे आवाहन केले. मात्र अनेक वृत्तपत्रांनी या संबंधीच्या बातम्यांना अडगळीची जागा दिली. लोकशाही मजबुतीसाठी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी घेतलेली भूमिका लोकांपर्यंत जाऊ नये, हाच हेतू यामागे होता.

सामान्य नागरिकांना प्रश्न विचारण्याचा आणि त्यांच्या हक्कांबद्दल दाद मागण्याचा अधिकार आहे. मात्र आता प्रश्न

विचारण्याचा अधिकार राहिलेला नाही. याबाबत जो बोलतो, त्याला देशद्रोही ठरवले गेले आहे. यामुळे लोकशाही पुन्हा विकसित करायची असेल तर विद्वेषाच्या राजकारणाविरोधात मतदान करण्याचे आवाहन पुण्यातील २५३ सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत आणि कलावंतांनी ५ एप्रिल रोजी पत्रकार परिषदेत केले होते. सामाजिक कार्यकर्ते कुमार सप्तर्षी, विद्या बाळ, लेखक राजन खान, नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. बाबा आढाव, सुमित्रा भावे आदींनी संविधानातील अभिवचने पुन्हा देऊ शकणाऱ्यांना मतदान करण्याचे आवाहन केले होते. या पत्रकार परिषदेची बातमी एखाद-दोन वृत्तपत्रांनीच ठळकपणे छापली.

ज्येष्ठ अभिनेते नसरूद्दीन शहा आणि रत्ना पाठक-शहा या दांपत्यासह अमोल पालेकर, अनुराग कश्यप, कोंकन सेन-शर्मा, डॉली ठाकूर, अभिषेक मजूमदार, संजना कपूर आणि इतर ६१६ कलाकारांनी भाजपला मतदान न करण्याचं आवाहन करणारं निवेदन मुंबईत काढलं. धर्मनिरपेक्ष लोकशाही आणि सर्वसमावेशक भारतासाठी मतदान करा, भाजप आणि त्याच्या सहयोगींविरोधात मतदान करा, अशी भावना ज्येष्ठ आणि श्रेष्ठ कलावंतांची होती. याकडेदेखील मुद्रित माध्यमांनी काणाडोळा केल्याचे दिसते. मराठी वर्तुळातील दिग्गजांनीही, हिंसक कृत्यांनी समाजत दहशत माजवणाऱ्या टोळ्यांना अभय देणाऱ्या राजकारण्यांना व पक्षांना निवडणुकीत त्यांची जागा दाखवून द्या, असे आवाहन केले होते. भालचंद्र नेमाडे, महेश एलकुंचवार, जयंत पवार, राजीव नाईक, येशू पाटील, रंगनाथ पठारे, चंद्रकांत पाटील, श्याम मनोहर, रत्नाकर मतकरी, सतीश आळेकर, प्रज्ञा दया पवार, वसंत आबाजी डहाके, प्रभा गणोरकर, मंगेश काळे, प्रवीण बांदेकर, हरी नरके, अशोक राणे, महेश केळुसकर, सतीश काळसेकर, आसाराम लोमटे अशा दिग्गजांसह १०५ लेखक, प्रकाशक आणि संपादकांनी यासंदर्भात मुंबईत प्रसिद्धीपत्रक काढले होते. ५ वर्षात माणसाच्या नागरी स्वातंत्र्यावर, व्यक्त होण्यावर हल्ले झाले. निष्ठांवर संशय घेऊन त्यांना देशद्रोही ठरवले गेले. त्यांच्या मनात भीतीची भावना निर्माण करण्यात आली. या वाढत्या समाजविघातक प्रवृत्तींचा केवळ निषेध न करता ठोस कृती करून तिचा निपटारा करण्याची गरज असल्याचे सांगतानाच लोकसभेच्या निवडणुकांसाठी मतदान करून लोकशाहीचे रक्षण करू शकेल, असे सरकार निवडण्याची जबाबदारी आपल्यावर असल्याचे या सारस्वतांनी म्हटले होते. त्यांचे अप्रत्यक्षपणे भाजप आणि मित्रपक्षांच्या विरोधात मतदान करण्याचे हे आवाहनही वृत्तपत्रांनी गांभीर्याने घेतले नाही.

धर्म, जात, लिंग, भाषा यांद्वारे भेदनीतीचे राजकारण करणाऱ्या पक्षाला मतदान न करण्याचे देशभरातील २०० शास्त्रज्ञांचे आवाहनही मुद्रित माध्यमांनी लोकांपर्यंत व्यापक प्रमाणात पोहचवले नाही. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, शास्त्रज्ञांनी आपल्या स्वाक्षरीचे निवेदन दिल्लीत प्रसृत केले होते. गेल्या पाच वर्षांत देशातील लोकशाही धोक्यात आली आहे. शिक्षण, विज्ञान आदी स्वायत्त संस्थांवर घाला घालण्याचे प्रयत्न झाले. दलित आणि अल्पसंख्याक समुदायातील लोकांच्या जमावाकडून हत्या घडवून आणल्या गेल्या. भेदनीतीचा अवलंब करून जाती-धर्मात द्वेष पसरविला गेला. विरोध करणाऱ्यांना देशद्रोही ठरवले गेले. विरोधकांना देशद्रोही ठरवणे आणि जात, धर्म, भाषेच्या आधारावर देशातील नागरिकांमध्ये फूट पाडणे लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहे. त्यामुळे विवेकबुद्धी शाबूत ठेऊनच मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहनही शास्त्रज्ञांनी केले होते. वृत्तपत्रांच्या अनास्थेमुळे हे आवाहनही फार लोकांपर्यंत जाऊ शकले नाही.

समाजाच्या जडणघडणीत मोलाची कामगिरी बजावणारे कलावंत, सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत, लेखक, शास्त्रज्ञ यांच्या विचारांचा प्रभाव समाजावर खोलवर पडत असतो. लोकशाहीला धोकादायक ठरलेल्या शक्तींविरूद्ध मतदारांना एक होण्याचं या मंडळींचं आवाहन लोकांना कळणं सुदृढ लोकशाहीसाठी हिताच होतं. मात्र 'मोदीग्रस्त' माध्यमांनी त्यांचं आवाहन सामान्य जनांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवलं नाही.

समाज घडवण्यातही आपली काही जबाबदारी असते, हे विसरून बहुतांश वृत्तपत्रांनी 'मोदी एके मोदी'चाच धोशा लावला. दुसरीकडे, जगभरातील माध्यमं मात्र आपल्या निवडणुकांचे तटस्थ आणि सापेक्ष वार्तांकन करताना दिसतात. पंतप्रधान म्हणून मोदी कितपत यशस्वी झाले, सामान्यांच्या जगण्याला खऱ्या अर्थानं बळ देणारे किती निर्णय त्यांनी घेतले, हे पटवून देण्याऐवजी मोदींसह भाजपची सर्वच मंडळी वैयक्तिक टिकेचे घृणास्पद राजकारण करीत आहेत. याचा खरपूस समाचार जगभरातील वृत्तपत्रांनी घेतलेला आहे. 'द अटलांटिक' या नियतकालिकाने असत्यकथन हाच २०१९ च्या निवडणुकांचा मंत्र असल्याचे म्हटले आहे. 'द वॉशिंग्टन पोस्ट' या अमेरिकन वृत्तपत्राने तर विकासाच्या आशेपेक्षा असुरक्षिततेची भीती वरचढ ठरवण्यात मोदी यशस्वी ठरल्याचे म्हटले आहे. १० एप्रिलच्या 'द गार्डियन' मध्ये, जग समजते तसं मोदी या निवडणुकांत मजबूत स्थितीत नाहीत, या शीर्षकाखालील लेखात भाजपच्या भांबावलेल्या स्थितीचं वर्णन करण्यात आलं आहे. 'ग्लोबल टाईम्स' या चीनी वृत्तपत्राने ११ एप्रिलच्या अंकात म्हटलंय की, मोदींना तीव्र स्पर्धेस तोंड द्यावं लागतंय. 'द न्यूयॉर्क टाईम्स' ने तर, मोदींच्या नेतृत्त्वाखाली देशाच्या ऐक्यभावनेस सुरूंग लावून विभाजनवादी शक्तींना बळच मिळालंय, अशा अत्यंत परखड शब्दात सामान्य भारतीयांच्या मनात खदखदणारी सल व्यक्त केलेली आहे. ऑस्ट्रेलियन वृत्तपत्र 'हेराल्ड सन' ने तर मोदींचा बायोपिक ब्लॉक केल्याचीही दखल घेतली आहे. सलग ५० वर्षे सत्तेत राहू, अशी वल्गना करणाऱ्या भाजपला आत्ताच सिनेमे, पोर्टल्स, सर्जिकल स्ट्राईक, वेबसिरीज इत्यादींचा आधार घेत स्वतंत्र वाहिनीही काढावी लागली. निवडणुकीत तरण्यासाठी भाजपची केविलवाणी धडपड जगभरातील वृत्तपत्रांनी अचूकपणे टिपलेली असताना भारतीय प्रसारमाध्यमे मात्र भाजप सरकारच्या दावणीला बांधली गेली असल्याचे दिसते आहे. ●●●


# दलित पक्षांच्या मतांमध्ये घट होत आहे का?



डॉ. माला मुखर्जी

दलित पक्षांमध्ये आरपीआयला महाराष्ट्रात चांगली मतपेढी (व्होट बँक) लाभली आहे; परंतु आता ती बसपाकडे वळत आहे. बसपा राष्ट्रीय पातळीवरचा पक्ष असून तो सर्व जागांवर आपले उमेदवार देत असला तरीही इतर पक्ष मात्र सर्व जागांवर उमेदवार देऊ शकत नाहीत. मागच्या वेळच्या राज्य निवडणुकांत बसपाने २८० उमेदवार दिले होते आणि बीबीएमने ७० उमेदवार दिले होते. बीबीएमने १ जागा जिंकली होती; परंतु त्यांच्या ६२ उमेदवारांच्या अनामत रकमा जप्त झाल्या होत्या. बसपाला एकही जागा जिंकता आली नव्हती आणि त्यांच्या २७५ उमेदवारांच्या अनामत रकमा जप्त झाल्या होत्या. म्हणून महाराष्ट्रात बीबीएमची स्थिती अजूनही चांगली आहे आणि बसपानंतरचा तो दुसऱ्या क्रमांकाचा महत्त्वाचा दलित पक्ष आहे. बसपाचा एकूण मतांचा वाटा सर्वोच्च असला तरी बीबीएमने ७० जागांवर चांगली कामगिरी केली आहे.

ते २००४ साल होते. मी नुकतीच कोलकात्याहून दिल्लीच्या प्रतिष्ठित सेंट्रल युनिव्हर्सिटीत दाखल झाले होते आणि वसतिगृहात एका सिनिअर मुलीच्या खोलीत मला राहण्यास तात्पुरती जागा मिळाली होती. मात्र तरीही माझे पहिल्यांदा स्वागत झाले ते 'आप कौन से जाती की हो?' (तुमची जात काय आहे?) या प्रश्नाने. मला याचे फक्त आश्चर्यच वाटले नाही; तर आपल्या समाजातील सामाजिक स्तरीकरणाचे खरे स्वरूपही माझ्यासमोर उलगडले. काही वर्षांनंतर पुन्हा एकदा मला याच प्रश्नाला तोंड द्यावे लागले. त्यावेळी आमच्या एका वर्गमित्राने आम्हाला त्याच्या गावात येण्याचे निमंत्रण दिले होते आणि गावात तर एखाद्याच्या जातीविषयी विचारणे ही गोष्ट अगदी एखाद्याचे नाव विचारण्याएवढी नियमित अंगवळणी पडलेली गोष्ट होती, असे मला आढळले. सुरुवातीला मला असे वाटले की, ती एखाद्या विशिष्ट भागातील पद्धत किंवा रुढी असावी; परंतु नंतर माझ्या एका मित्राने कोलकात्याला भेट दिली होती. त्यावेळी माझ्या एका शेजाऱ्याने मला अगदी खाजगीत विचारले होते, की हा मुलगा फक्त 'कुमार' असा शब्द वापरण्याऐवजी आडनाव का लावत नाही? माझ्या लक्षात आले की, ही भारतभर सगळीकडेच पसरलेली पद्धत होती; परंतु आम्हाला त्याची जाणीव नव्हती. कारण आम्ही एकसंध समाजात रहात होतो. तिथे प्रत्येकाच्या




**विविध दलित राजकीय पक्षांनी महाराष्ट्राच्या राज्य विधानसभेत मिळवलेल्या मतांची पक्षनिहाय विभागणी (१९९९–२००४)**

| मतदार संघ | मतदार संघाचा प्रकार | पक्ष | दुसऱ्या क्रमांकावरील पक्ष | विजयी उमेदवाराचे मताधिक्य |
|---|---|---|---|---|
| अकोला पूर्व | सर्वसाधारण | भाजप | भारिप–बहुजन महासंघ | २४४० |
| मूर्तीजापूर (एससी) | एससी | भाजप | भारिप–बहुजन महासंघ | १२८८८ |
| कारंजा | सर्वसाधारण | भाजप | भारिप–बहुजन महासंघ | ४१४७ |
| दर्यापूर (एससी) | एससी | भाजप | रिपाइं | १९५८२ |
| हिंगणघाट | सर्वसाधारण | भाजप | बहुजन समाज पक्ष | ६५१७५ |
| नागपूर उत्तर (एससी) | एससी | भाजप | बहुजन समाज पक्ष | १३७१८ |
| भंडारा (एससी) | एससी | भाजप | बहुजन समाज पक्ष | ३६८३२ |

**२०१४ च्या निवडणुकांमध्ये दलित पक्षांचे उमेदवार दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या विधानसभा**

आडनावावरून त्याची किंवा तिची जात समजत होती. 'जात' हा शब्द फक्त एखाद्याच्या आडनावापुरताच मर्यादित नाही, तर त्याच्या किंवा तिच्या जीवनाच्या प्रत्येक पैलूवर, प्रत्येक अंगावर त्याचा परिणाम होतो. अशा प्रकारे अगदी आजच्या समाजातही जातविरोधी चळवळ प्रसंगोचित, समर्पक आहे आणि उपेक्षित, वंचित लोकांचा आवाज संघटित करण्यात दलित राजकीय पक्ष महत्त्वाच्या भूमिका बजावत आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राजकारणात तरुणांना प्रशिक्षित करण्यासाठी शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना केली, त्यावेळी संघटित राजकीय दलित पक्षांची सुरुवात झाली. कालौघात त्यातूनच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया म्हणजेच भारतीय रिपब्लिकन पक्षाचा (आरपीआय) उदय झाला. दलितांचा आवाज संघटित करणे आणि त्याचबरोबर उपेक्षितांसाठी राजकीय हक्क मिळवणे याचे महाराष्ट्रातील एक विलक्षण चांगले उदाहरण म्हणून याकडे पाहता येते. उत्तर प्रदेशात बसपाप्रणित सरकारचा उदय होण्याच्या बराच काळ आधी हे महाराष्ट्रात घडले होते. तरीही अलीकडच्या काही वर्षात या पक्षाला अंतर्गत संघर्षाला तोंड द्यावे लागत आहे आणि म्हणून त्याचे विविध उपगटांत विभाजन झाले आहे. या उपगटांमध्ये ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्त्वाखालील भारिप बहुजन महासंघ (बीबीएम) आणि रामदास आठवले यांच्या नेतृत्त्वाखालील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हे दोन उपगट सर्वाधिक महत्त्वाचे आहेत. या दोन पक्षांखेरीज फारशी ओळख नसलेले इतरही अनेक दलित राजकीय पक्ष महाराष्ट्रात कार्यरत आहेत. बहुजन समाज पक्ष (बसप) हाच फक्त एकमेव दलित विचारसरणीचा राष्ट्रीय पक्ष आहे. म्हणून महाराष्ट्रात तीन प्रमुख दलित पक्ष आढळतात. बसप, बीबीएम आणि आरपीआय हे ते पक्ष होत. गेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांतील त्यांची कामगिरी त्यांचा घसरणीकडे असलेला कल दाखवते; परंतु सूक्ष्म निरीक्षण केल्यास वेगळेच चित्र दिसून येते.

२०१४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला एकूण वैध मतांपैकी २७.५६ टक्के; तर शिवसेनेला १८.२९ टक्के मते मिळाली. मात्र इतर पक्षांना आणि विशेषतः दलित पक्षांना मतांची नगण्य टक्केवारी मिळाली. फक्त बसपाला २.६३ टक्के किंवा १२ लाख ७१ हजार सहाशे ऐंशी मते मिळाली. २००४ मध्ये बसपाला महाराष्ट्रातून ३.०५ टक्के आणि १९९९ मध्ये ०.३२ टक्के मते मिळाली होती; परंतु १९९९ मध्ये बीबीएमला सर्वाधिक मते (२.१ टक्के मते) मिळाली होती. त्यांनी एक जागाही जिंकली होती. बहुजन पक्षांमध्ये बीबीएम आणि आरपीआय यांना १९९० मध्ये चांगला आधार मिळाला होता; परंतु अंतर्गत दुफळी आणि विभाजन यामुळे मतांची विभागणी झाली.

विधानसभा निवडणुकीत बीबीएमला लागोपाठच्या तीन निवडणुकांमध्ये एकेक जागा मिळाली होती आणि १९९९ मध्ये या पक्षाला तीन जागा मिळाल्या होत्या. आरपीआयनेही १९९९ मध्ये आणि २००४ मध्ये एक जागा मिळवण्यात यश मिळवले. तरीही बसपाला एकही जागा जिंकणे शक्य झाले नाही आणि बसपाच्या मतांचा वाटा लक्षात घेतला तर कालौघात तो कमी होत गेला आहे. २०१४ मध्ये महाराष्ट्रात बसपाला एकूण वैध मतांपैकी २.२५ टक्के मते मिळाली होती. २००९ मध्ये ही टक्केवारी २.३५ आणि २००४ मध्ये ४ होती.

तरीही जर दलित पक्षांना देण्यात आलेली एकूण मते एकत्र केली तर आपल्याला वेगळे चित्र दिसते. बसपाने महाराष्ट्रात एकही जागा जिंकली नसली तरी गेल्या काही निवडणुकांमध्ये फक्त बसपाचा वाटा वाढत गेल्याची नोंद आढळते. यामागचे महत्त्वाचे कारण म्हणजे बसपा याच एकमेव पक्षाने सर्वच्या सर्व म्हणजे २८० जागांवर त्यांचे उमेदवार उभे केले होते. म्हणून इतर दलित पक्षांमध्ये बसपाचा निव्वळ वाटा हा सर्वोच्च आहे.


आपल्याला असेही आढळते की, १९९९ मध्ये बीबीएमला दलित पक्षांना मिळालेल्या एकूण मतांपैकी ६३ टक्के मते मिळाली होती; परंतु २००४ पासून पुढे बसपाला ६० टक्क्यांहून अधिक मते मिळत गेली. २००९ मध्ये बसपाला सर्व दलित पक्षांना मिळालेल्या एकूण मतांपैकी ५६.५ टक्के मते मिळाली होती आणि बीबीएम व आरपीआय यांना प्रत्येकी २० टक्के मते मिळाली होती. तरीही गेल्या निवडणुकीत दलित पक्षांना मिळालेल्या एकूण मतांपैकी ६४ टक्के मते बसपाने मिळवली होती आणि आरपीआयचा मतांचा वाटा लक्षणीयरित्या कमी झाला होता.

प्रत्येक ढगाला रुपेरी किनार असतेच आणि अगदी पराभवातही अशा रुपेरी कडा आहेत. उपेक्षित, वंचित लोकांच्या मतांचे संघटन करण्यासाठी आणि त्यांच्या विशिष्ट मागण्या मांडण्यासाठी तसेच पर्यायी विचारसरणींना प्रोत्साहन देण्यासाठी उपेक्षित, वंचित लोकांना व्यासपीठ मिळवून देणे हे दलित राजकीय पक्षांचे प्रमुख उद्दिष्ट आहे. हा हेतू काहीसा यशस्वी झाला असून अनेक जागांवरून या पक्षांच्या उमेदवारांनी विरोधकांना जोरदार लढत दिली आहे.

दलित पक्षांच्या उमेदवारांनी सात विधानसभा जागांवर जिंकणाऱ्या उमेदवारांना जोरदार लढत दिली. त्यांच्यापैकी तीन मतदारसंघ हे सर्वसामान्य मतदारसंघ आहेत. अकोला पूर्व, मूर्तिजापूर आणि कारंजा इथे बीबीएमचे उमेदवार दुसऱ्या क्रमांकावर होते. मूर्तिजापूर वगळता इतर दोन मतदारसंघ सर्वसामान्य मतदारसंघ होते. बसपा उमेदवारांनी हिंगणघाट, नागपूर उत्तर आणि भंडारा इथे जिंकणाऱ्या उमेदवारांच्या विरोधात जोरदार लढत दिली. अगदी जिंकलेल्या उमेदवारांच्या आणि दलित उमेदवारांच्या मतांमधील फरकही कमी आहे. अकोला पूर्व आणि कारंजामध्ये हा फरक पाच हजारांहून कमी मतांचा होता.

दलित पक्षांमध्ये आरपीआयला महाराष्ट्रात चांगली मतपेढी (व्होट बँक) लाभली आहे; परंतु आता ती बसपाकडे वळत आहे. बसपा राष्ट्रीय पातळीवरचा पक्ष असून तो सर्व जागांवर आपले उमेदवार देत असला तरीही इतर पक्ष मात्र सर्व जागांवर उमेदवार देऊ शकत नाहीत. मागच्या वेळच्या राज्य निवडणुकांत बसपाने २८० उमेदवार दिले होते आणि बीबीएमने ७० उमेदवार दिले होते. बीबीएमने १ जागा जिंकली होती; परंतु त्यांच्या ६२ उमेदवारांच्या अनामत रकमा जप्त झाल्या होत्या. बसपाला एकही जागा जिंकता आली नव्हती आणि त्यांच्या २७५ उमेदवारांच्या अनामत रकमा जप्त झाल्या होत्या. म्हणून महाराष्ट्रात बीबीएमची स्थिती अजूनही चांगली आहे आणि बसपानंतरचा तो दुसऱ्या क्रमांकाचा महत्त्वाचा दलित पक्ष आहे. बसपाचा एकूण मतांचा वाटा सर्वोच्च असला तरी बीबीएमने ७० जागांवर चांगली कामगिरी केली आहे.

एकमेव राष्ट्रीय दलित पक्ष असल्यामुळे अखिल भारतीय पातळीवरच्या राजकारणात बसपा महत्त्वाची भूमिका बजावत आहे. तरीही उत्तर प्रदेशातील पक्षांनी लढवलेल्या निवडणुकांतील वैध मतांपैकी बसपाला १९ टक्के मते मिळाली आहेत. उत्तर प्रदेश वगळता मध्य प्रदेश, हरयाणा आणि उत्तराखंड या तीन राज्यांत




त्यांना २ ते ४ टक्के मते मिळाली आहेत. बिहार, राजस्थान, महाराष्ट्र आणि छत्तीसगड या राज्यांत या पक्षाला २ टक्क्यांहून अधिक मते मिळाली आहेत आणि उर्वरित राज्यांमध्ये १ टक्क्याहून कमी मते मिळाली आहेत.

महाराष्ट्रातील अलीकडच्या राजकीय हालचालींतून असे स्पष्ट झाले आहे की, युती न करता यांपैकी कोणताही पक्ष सत्तेत येऊ शकत नाही. म्हणून या पक्षांनी बसपाशी आणि इतर राष्ट्रीय पक्षांशी युती करण्याच्या शक्यता पडताळून पाहिल्या. मात्र या पक्षांतील काही भागाला सत्ताधारी पक्षांशी युती करायची आहे, काहींना अल्पसंख्याकांशी युती करायची आहे. त्यामुळे दलित मतांमध्ये दोनहून अधिक दिशांना विभागणी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सत्ताधारी पक्ष आणि दलित पक्ष हे दोघेही आता ऐक्यासाठी विविध सामाजिक-राजकीय मुद्द्यांवर लक्ष ठेवून आहेत. विदर्भासाठी स्वतंत्र राज्याची मागणी हा असाच एक मुद्दा आहे. विदर्भावर नेहमीच दलित पक्षांची जबरदस्त पकड राहिली आहे. विदर्भातील कृषी संकट आणि इतर अनेक मुद्दे हे दलित पक्षांना त्यांच्या पाठिराख्यांशी आणि सहानुभूतीदारांशी ऐक्य करण्यास चांगलाच वाव मिळवून देण्याची शक्यता आहे. जर कोणत्याही प्रकारे या सगळ्या पक्षांमध्ये विशेषतः आगामी विधानसभा निवडणुकीपूर्वी युती झालीच, तर त्यामुळे राजकारणाचा पटच बदलू शकेल.

●●●

# With Best Compliments from



# AJIT CONSTRUCTIONS



खा.शरद यादव

# देशाचे स्वातंत्र्य धोक्यात, अघोषित आणीबाणी संपवा

**जनता दल युनायटेडचे राष्ट्रीय अध्यक्ष खा.शरद यादव यांचा नवी दिल्लीतील त्यांच्या शासकीय निवासस्थानी द पीपल्स पोस्टचे संपादक चेतन शिंदे यांनी घेतलेल्या मुलाखतीचा संपादित अंश.**

**प्रश्न : आपण अभियांत्रिकीची पदवी सुवर्णपदकासह मिळवली. महाविद्यालयात विद्यार्थी चळवळीत होतात. त्यानंतर जयप्रकाश नारायण यांच्या चळवळीत आलात?**

**शरद यादव :** मी तर विद्यार्थी दशेपासूनच जयप्रकाश नारायणजींच्या चळवळीत होतो. जयप्रकाशजींच्या चळवळीबद्दल सांगायचं तर निवडणुका आल्यानंतरच तिचं विशेष महत्त्व सर्वांना पटत होतं. जर त्या निवडणुकीत मतं मिळाली नाहीत तर आंदोलनाची हवा निघून जायची. निवडणुकीत कुणाला उभं करायचं या अनुषंगाने चर्चा व्हायची. मी मात्र यापूर्वीच्या आंदोलनात होतो. मला निवडणुकांविषयी जाणीव व्हायची.

**प्रश्न : राममनोहर लोहियांच्या आंदोलनाशी आपण असे जुळलात?**

**शरद यादव :** त्यांच्या कार्यकर्त्यांकडून लोहियांच्या विचाराविषयीचं जे साहित्य मिळालं ते वाचून मी प्रभावित झालो. आचार्य रजनीश हे देखील डॉ. लोहियांच्या विचारांमुळे खूपच प्रभावित झाले होते. विद्यापीठात शिकत असताना काँग्रेस विद्यार्थी संसदेच्या निवडणुकीत आपल्या लोकांना उभं करून इतरांवर दबाव आणायचा, मारामारी करायची, मी त्यात पुढाकार घेत होतो. मला नेहमी टारगेट केलं जायचे. त्यामुळे विरोधकांसोबत माझी मैत्री जुळली. मी कोणत्याही आंदोलनात पुढे असायचो. आंदोलनातून लोहियांच्या जवळ गेलो.

**प्रश्न : आपण १९७४ मध्ये पहिल्यांदा खासदार झालात आणि १९७७ मध्ये जनता दलाचे अध्यक्ष होतात. त्यानंतरचा आपला प्रवास कसा झाला?**

**शरद यादव :** निवडणूक जिंकल्यानंतर जयप्रकाश नारायण यांनी मला सोबत अनेक ठिकाणी नेलं. त्यांच्यासोबत मी फिरायचं ठरवलं होतं. १९७४-७५ मध्ये मी जिंकलो असेल तर त्याच्या पूर्वीही विद्यार्थी निवडणूका जिंकलो. जयप्रकाशजी त्यांच्या कार्यक्रमांसाठी जयपूर, ग्वाल्हेरला जाताना मलाही सोबत नेत होते. त्या कार्यक्रमात अन्य मुलांप्रमाणे मीदेखील भाषण केलं होतं. त्यांच्या सोबत फार जवळून मला काम करता आले. त्यांची प्रेरणा मिळत गेली.

**प्रश्न : डॉ. लोहिया आणि जयप्रकाशजी यांच्या आंदोलनाचा प्रभाव देशात कसा होता?**

**शरद यादव :** उत्तर भारतातील बहुतांश विद्यापीठांमध्ये त्यांचा प्रभाव होता. बडोदा विद्यापीठापासून ते उत्तरप्रदेश, बिहार आणि मध्यप्रदेशातही लोहियांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. अलाहाबाद, बनारस आणि लखनौमध्येही त्यांचे कार्यकर्ते जिंकायचे. त्यांच्या विचारांचा प्रभाव शैक्षणिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात सर्वत्र होता.

**प्रश्न : विद्यार्थी नेता असताना आपण पहिल्यांदा संसदेत गेलात. तो अनुभव कसा होता?**

**शरद यादव :** जेव्हा मी संसदेत गेलो, तेव्हा ज्यांना मी आयुष्यात कधी पाहिले नव्हते, ते सारे दिग्गज मला संसदेत पाहता आले. ज्योती बसू, श्यामनंदन मिश्रा, अटल बिहारी वाजपेयी, मधु लिमये, सोमनाथ चॅटर्जी, पीलो मोदी, यशवंतराव चव्हाण, बाबू जगजीवनराम, इंदिरा गांधी यांच्यासारखे वरिष्ठ नेते मला संसदेत पाहता आले. त्यांच्यासोबत संसदेत काम करता आले. संसदेत मी दलित, आदिवासींच्या प्रश्नांवर चर्चा घडवून आणली होती. त्यावेळी इंदिरा गांधी यांनी माझे कौतुक केले होते. नागपुरातील दलित समाजातील बब्रुभान याचे डोळे काढले होते. तो मुद्दा मी संसदेत लावून धरला होता, तेव्हा इंदिरा गांधी यांनी मला बब्रुभानच्या केसशी संबधित सर्व पेपर घेऊन त्यांच्या कार्यालयात बोलवले होते. त्यावेळी मी पहिल्यांदा प्रधानमंत्र्यांचे कार्यालय पाहिले होते. संसदेतील पहिला अनुभव खूप चांगला राहिला. देशाच्या सर्वोच्च सभागृहात काम करण्याची संधी मिळाल्याचे प्रचंड समाधान होते.

**प्रश्न : आपण १९७७ मध्ये युवा जनतादलाचे अध्यक्ष होतात. त्यानंतरची १० वर्षे एवढा काय बदल झाला, आपण जनता दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष बनलात?**

**शरद यादव :** देशात आणीबाणी लागू झाल्यानंतर आम्हा सर्वांना अटक करण्यात आली. आम्हाला जबलपुरातून अटक करण्यात आली. मोरसिंग, मलखान अशा कुख्यात गुंडांना ठेवलेल्या नरसिंगगढ तुरुंगात आम्हाला नेण्यात आले. त्याला जयप्रकाशजींनी विरोध केला होता. तरीही त्या तुरुंगात आम्ही तीन-चार दिवस राहिलो. त्यानंतर त्यांच्याशी आमचे संबंध चांगले झाले. नंतर मधु लिमये तेथे आले. त्यानंतर इतरही अनेक लोक आले. नंतर आणीबाणी संपली. आणीबाणी उठल्यामुळे मी १९७७ ची निवडणूक लढवली आणि पुन्हा जिंकलो. १९७७ ला जनता

पार्टीचे सरकार आल्यानंतर मोरारजी देसाई पंतप्रधान झाले होते. चंद्रशेखर पक्षाचे अध्यक्ष होते. त्यांच्या काळात मी युवा जनता दलाचा अध्यक्ष झालो.

**प्रश्न : आपण नेहमी मूल्यांचं राजकारण केलत. आपण जे राजकारण पाहिलं, देश घडताना पाहिला. तो काळ आणि आत्ताचा राजकीय काळ फार बदलला असे वाटते का? आज अघोषित आणीबाणी सारखी स्थिती आहे. या बदलत्या राजकारणाकडे आपण कसे पाहता?**

**शरद यादव :** बदलत्या राजकारणातही आम्ही संघर्ष करत आहोत. आयुष्यभर संघर्ष करीत आलो आहोत. काँग्रेसच्या काळात तर मला सर्वाधिक काळ शिक्षा झाली. तरूण, शेतकरी आणि कामगारांच्या प्रश्नांवर लढताना आणीबाणीच्यापूर्वी दोनवेळा मला तरुंगवास झाला. पावलोपावली त्रास होता. मी ४५ वर्षांपासून संसदेत आहे. अकरावेळा मी संसदेत आलो. भ्रष्टाचाराची प्रकरणे असतील, देशाच्या विकासाचा, देशाच्या लोकशाही मूल्यांचा, शिक्षण, वीज, रस्ते, उद्योग, व्यवसाय या संबंधीचे प्रश्न असतील, अशा अनेक प्रश्नांवरील चर्चेत भाग घेतला. कधी आशियायी क्रीडा स्पर्धावाल्या सुरेश कलमाडींना तर उभ्या-उभ्या धडा शिकवला. सलग संघर्षास आपण एकट्याने तोंड दिले. मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश आणि नंतर बिहार अशा तीन ठिकाणांहून निवडणूक लढवली. २०१५ मध्ये राष्ट्रीय जनता दल, जेडीयू आणि काँग्रेसच्या महागठबंधनला दोन तृतीयांश बहुमताने बिहारच्या जनतेने निवडून दिले. नितीशकुमारांना मुख्यमंत्री केले. नंतर त्यांनीच आमचा पक्ष पळवला आणि ते विरोधी भाजपला जाऊन मिळाले. आज देशातील हिंदुत्ववादी शक्ती धार्मिक उन्माद माजवून देशाला पाषाण युगाकडे नेऊ इच्छित आहेत. लोकांमध्ये भयग्रस्तता आहे. त्यांच्यात असुरक्षिततेची भावना आहे. सारे वातावरण संवेदनशील झाले आहे. देशाची लोकशाही संकटात सापडली आहे. देश वाचवणे महत्त्वाचे आहे.

**प्रश्न : मोदी सरकारच्या काळात देशात घडलेल्या मॉब लिंचिंगच्या घटनांवर खूप टीका झाली. देशातील संपूर्ण वातावरणच त्यांनी दूषित केलं आहे. घटनात्मक संस्थांवरही त्यांनी हल्ले केले आहेत. काया सांगाल?**

**शरद यादव :** हे पहा, देशात आता अशी एकही संस्था नाही जिचा त्यांनी विध्वंस केलेला नाही. संपूर्ण देशातील कायद्याचे राज्य त्यांनी संपुष्टात आणले आहे. कधी गायीच्या नावावर तर कधी कशाच्या नावावर जमावाने लोकांना ठेचून मारले गेले. अनेक मंत्री संविधानाची चौकट ओलांडून बेताल वक्तव्य करतात. जाती-जातीत विद्वेष पसरवणारी वक्तव्ये केली जात आहेत. १९७५ ची आणीबाणी दिसत तर होती. आताची परिस्थिती मात्र अघोषित आणीबाणीसारखीच आहे. आम्ही लढत आलो, लढतच राहणार आहोत. देश वाचवणार, लोकशाही वाचली पाहिजे म्हणून प्रस्थापितांसोबत संघर्ष करणार, देशाने मात्र सहभागी झाले पाहिजे. शेवटी सत्य हे एकमेव सत्य आहे. राष्ट्रभक्ती आहे.

**प्रश्न : मंडल आयोग आला त्यावेळी मंडलला कुमंडल म्हटले जात होते. आज त्याबद्दल काय सांगाल?**

**शरद यादव :** मंडल आयोग लागू झाल्यानंतर देशातील जातीव्यवस्था संपवण्यात मदत होईल, असे आमचे स्वप्नं होते; परंतु जातव्यवस्था जी आहे ती राजकीय पक्षात रूपांतरीत झालेली आहे. आता उच्चवर्गीय लोक जाती तोडत आहेत; परंतु शुद्र, अतिशुद्र जातीशी चिकटून राहिले आहेत. त्यांनी जातीयता सोडली पाहिजे. संविधानाप्रमाणे वागले पाहिजे.

**प्रश्न : आपण जे महागठबंधन उभे केले, त्याच्यातर्फे ममता बॅनर्जी यांनी रॅली काढली. पुढे हे महागठबंधन टिकेल का?**

**शरद यादव :** महागठबंधन तर स्थापन झालेले नाही, ते नंतरही होऊ शकते. मात्र 'संस्कृती वाचवा, संविधान वाचवा' अभियानाच्या बैठका मी अनेक ठिकाणी घेतल्या आहेत. दिल्ली, इंदूर, मध्यप्रदेश, जयपूर, मुंबई अशा विविध ठिकाणी त्या झाल्या. वेगवेगळ्या जाती-धर्मांना एकत्र बांधून ठेवणारी राज्यघटना आज संकटात आहे. त्यामुळे राज्यघटना वाचविण्याच्या मुद्यावर सर्वांना एकत्र आणायचे आहे. सर्व धर्मनिरपेक्ष पक्षांनी यासाठी एकत्र आले पाहिजे.

**प्रश्न : लोकसभेच्या निवडणुका सुरू होत आहेत. काय आहे देशासमोरचे मोठे संकट?**

**शरद यादव :** देश मोठ्या संकटातून पुढे जात आहे. स्वातंत्र्याच्या लढाईत ज्या नेत्यांनी बलिदान दिले त्यांचे विचार आज धोक्यात आहेत. पाच वर्षांत या सरकारने समाजात कशाप्रकारे तेढ निर्माण होईल, वाद वाढेल असे प्रयत्न केले आहेत. जातीच्या नावावर कसे विभाजन होईल, मतभेद वाढतील यासाठी प्रयत्न केले आहेत. काश्मिर प्रश्न आणि वाद हा त्यांचा मुख्य अजेंडा आहे. गंगा नदी स्वच्छ करून, तरूणांना नोकरी देऊ, शेतकऱ्यांसाठी स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी लागू करून, शेतमालाला दिडपट भाव वाढवून देऊ. अशी जी काही आश्वासने सरकारने दिली होती त्याची पूर्तता केली गेली नाही. देशाच्या इतिहासात कोणत्याही पंतप्रधानाने या पंतप्रधानाइतकं दिवसभर भाषणबाजी केलेली नाही. संविधान आणि देश वाचवणे हे प्रमुख मुद्दे आहेत.

**प्रश्न : तुमच्या पक्षाची युती महामिलावट आहे, असं भाजपवाले म्हणतात?**

**शरद यादव :** एनडीए युतीच महामिलावट युती आहे. हा प्रधानमंत्री जुमलेबाज प्रधानमंत्री आहे. फालतू भाषणबाजी करत आहे.

**प्रश्न : निवडणुकीतील तुमचे मुद्दे कोणते आहेत?**

**शरद यादव :** या देशाची लोकशाही, संविधान धोक्यात आहे. मोठ्या परिश्रमाने व मेहनतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेल्या संविधानाला यांनी धक्का पोहोचवला आहे. त्याच्या मजबूत पायांना यांनी पंगू बनवले आहे. न्यायसंस्था, अंमलबजावणी संचालनालय (ईडी), सीबीआय, आयबी, कॅग यांच्यावर हल्ले केले आहेत. हेच आमचे निवडणुकीतले मुद्दे आहेत.

**प्रश्न : एनडीएकडे पंतप्रधानपदाचा उमेदवार आहे. तुमच्या गठबंधनकडे काय आहे?**

**शरद यादव :** आपण एक लक्षात घेतले पाहिजे की, विरोधी



खा.शरद यादव यांची मुलाखत घेताना संपादक चेतन शिंदे.

पक्षांकडे पंतप्रधानपदाचा उमेदवार अगोदर निश्चित होत नसतो. १९७७ मध्ये मोरारजी देसाईंचे नाव कोणाला माहीत होते. निवडणुकीनंतर त्यांचे नाव पंतप्रधानपदासाठी पुढे आले. १९८९ मध्ये संयुक्त आघाडीचे सरकार केंद्रात आल्यानंतर व्ही.पी.सिंग पंतप्रधान झाले. व्ही.पी. सिंगांचे नाव काय जाहीर झाले होते का? १९९६ मध्ये पंतप्रधान झालेल्या एच.डी. देवेगौडा यांचेही नाव आधी या पदासाठी निश्चित झालेले नव्हते. आमचा उमेदवार ठरला असल्याचे सांगून भाजपवाले खोटे पसरवत आहेत आणि तुम्ही ते घेऊन फिरत आहात.

विरोधकांचा पंतप्रधानपदाचा उमेदवार कधीही निश्चित होत नसतो. एक-दोन दिवसात तो ठरत असतो. पंतप्रधान निश्चित करण्याच्या प्रक्रियेत मी सहावेळ सहभागी झालो आहे.

**प्रश्न : गठबंधनचा जेव्हा विषय निघतो तेव्हा अनेक जागांवर विशेषत: बिहारमध्ये अनेक जागांवर नाराजी दिसते. त्याचे कारण काय?**

**शरद यादव :** आपल्याला एवढेतरी निश्चित माहित पाहिजे की, जे राजकीय पक्ष लढत आहेत ते सर्वच भाजपविरोधात लढत आहेत. मग ते युपीमध्ये असो, केरळमध्ये असो वा अन्य कोणत्याही राज्यात. युपीमध्ये काँग्रेस जिंकली तर कोणाचे सरकार बनेल? गठबंधन जिंकले तर कोणाचे सरकार बनेल? केरळमध्ये काँग्रेस आणि कम्युनिस्ट पक्ष लढत आहेत, ते दोघे जिंकले तर भाजपसोबत जातील का? जी निवडणूक होत आहे त्या दृष्टिकोनातून गठबंधनकडे पाहू नका. सरकार ठीक नाही, हा सर्वांचाच समान मुद्दा आहे.

**प्रश्न : लालूप्रसाद यादव आता सक्रिय राजकारणात नाहीत. या निवडणुकीत त्यांची अनुपस्थिती जाणवते का?**

**शरद यादव :** नक्कीच. २०१५ मध्ये बिहारच्या विधानसभा निवडणुकीच्या वेळी लालूप्रसाद यादव बाहेर होते. त्यामुळे त्यांचा राष्ट्रीय जनता दल, जे.डी.यू. आणि काँग्रेस यांच्यात गठबंधन झाले. त्यावेळी लोकांनी या गठबंधनला दोन तृतीयांश बहुमतांनी निवडून दिले होते. लालूजी म्हणत होते की, नितिशकुमारने मला फसवले. जसेही हे सरकार आले. पहिल्या दिवसापासूनच त्यांचा फास आवळायला सुरूवात झाली, आता ते तुरुंगात आहेत. लालूप्रसाद आज प्रचार मोहिमेत असते तर बेस अधिक चांगला झाला असता.

**प्रश्न : आपण जे.डी.यू.ची स्थापना केली. कालपर्यंत आपण नितीशकुमार यांच्यासोबत अनेक निवडणुका लढवल्या. त्यामुळे त्यांची व्यूहरचना (स्ट्रॅटेजी) आपण चांगल्याप्रकारे जाणून असाल?**

**शरद यादव :** त्याची स्थापना तर आम्हीच केली. ते जे.डी.यू. नव्हते. जे.डी. अर्थात, जनता दल असे होते. चौधरी देवीलाल आणि मी अशा दोघांनी हा पक्ष स्थापन केला होता. पुढे त्याचे दहा-बारा तुकडे झाले. शेवटी आमचा पक्ष घेऊन एक माणूस पळून गेला. उपमुख्यमंत्री तेजस्वीनी यादव यांच्या विरोधात भ्रष्टाचार प्रकरणी आरोप निश्चित केल्यानंतर नितीशकुमार यांनी त्यांना मंत्रिमंडळातून राजीनामा द्यायला सांगितले होते; परंतु राजदने त्यास नकार दिला आणि त्यानंतर नितीशकुमार यांनी २६ जुलै २०१७ रोजी राजीनामा देऊन गठबंधन संपुष्टात आणले. त्यानंतर ते एनडीएमध्ये सामील झाले. भाजपशी मैत्री करून नितीशकुमार यांनी केवळ बिहारचेच नाही तर देशाचेही नुकसान केले.

**प्रश्न : २०१९ मध्ये विरोधी पक्षाची काय स्थिती राहील?**

**शरद यादव :** विरोधी पक्ष सत्तेत राहील. हे भाजपचे सरकार सत्तेतून लोक घालवतील.

**प्रश्न : तुमचे त्यात काय स्थान असेल?**

**शरद यादव :** ते पुढे पाहू. आधी देश महत्त्वाचा आहे. तुम्ही काही वाद वाढतील असे प्रश्न विचारून संभ्रम निर्माण करू नका?

●●●




# मोदी-शाह देशावरील संकट !

## भाजपाला मतदान करू नका : **राज ठाकरे**

लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी इचलकरंजी येथे केलेल्या जाहीर सभेतील भाषणाचा संपादित अंश.

२०१९ ची लोकसभा निवडणूक महाराष्ट्र नवनिर्माण सेना लढवत नाही. उमेदवार उभा केलेला नाही; परंतु नरेंद्र मोदी आणि अमित शाह नावाचं संकट या देशावरून दूर व्हावं, म्हणून महाराष्ट्रभर प्रचार करतोय. इचलकरंजीमधील यंत्रमागाचा विकास काही नवीन नाही. याबाबतची माहिती घेतली असता लक्षात आलं की, १९०४ साली यंत्रमाग इचलकरंजीमध्ये सुरू झालं. म्हणजे त्यावेळी महात्मा गांधीसुद्धा भारतामध्ये आले नव्हते, म्हणजे महात्मा गांधींनी सूत काढायच्या अगोदर इचलकरंजीने सूत काढायला सुरूवात केली होती. केवढ्या गोष्टी या इचलकरंजीमध्ये झालेल्या आहेत. आपण म्हणतो की, रतन टाटा यांनी नॅनो नावाची गाडी काढली आहे. जेव्हा त्यांनी बघितलं की, स्कुटरवर एक परिवार, नवरा बायको आणि मुलं जात आहेत. दोन चाकांवरती, अपघात होत आहेत. म्हणून रतन टाटांनी एक स्वप्नं पाहिलं की, एक छोटी गाडी काढावी की, जी सामान्य परिवाराला परवडेल. म्हणून त्यांनी नॅनो नावाची गाडी काढली ती जवळपास २००८ च्या सुमारास. पण अशा प्रकारची छोटी गाडी काढण्याचा पहिला विक्रम हा इचलकरंजीमध्ये १९७० साली झालेला आहे. त्या गाडीचे नाव होते मीरा. इतके हरहुन्नर या महाराष्ट्रामध्ये आहेत आणि हे (मोदी) महाराष्ट्राला शिकवत आहेत, 'मेक इन इंडिया', असा टोला राज ठाकरे यांनी भाजपवर मारला. आजही भारतामध्ये इंडस्ट्रीच्या बाबतीत महाराष्ट्र हा एक नंबरलाच आहे आणि त्याचा कोणत्याही राजकारणाशी संबंध नाही. या मातीवर झालेले संस्कारच तसे आहेत. इथला माणूसच तसा आहे आणि अशा इचलकरंजीमध्ये माझी सभा होत आहे.

राज ठाकरे जे प्रश्न विचारतोय हे भाजपावाल्यांना समजत नाही, कारण त्यांना अपेक्षाच नव्हती अशा गोष्टींची की, मी काहीतरी जुने उकरून काढील. हे जे मी करतोय ना बाबांनो, या गोष्टीमुळे या देशात, भविष्यात एक गोष्ट मात्र नक्की होईल की, या देशामधला कोणताही राजकारणी ज्यावेळेस तुमच्यासमोर उभा राहील त्यावेळला तो खोटं बोलणार नाही. तुम्हाला फुकटची स्वप्नं तो दाखवणार नाही. खोटं बोलून तो/ती मतं मिळवण्याचा प्रयत्नदेखील करणार नाही. समजा ती गोष्ट जरी त्याने केली तर पाच वर्षांनंतर अशाच क्लिप दिसणार. मी जे प्रश्न विचारतो आहे,

त्या प्रश्नांची उत्तरे आहेत का भारतीय जनता पार्टीकडे? या देशाची लोकशाही संकटात घातली. या देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचे चार न्यायाधीश न्यायालयाच्या बाहेर लोकांसमोर येतात आणि पत्रकार परिषद घेऊन काय सांगतात तर लोकशाही धोक्यात आहे. १९४७ ला या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून या क्षणापर्यंत असा प्रकार या देशाने पाहिला नव्हता. न्यायाधीश कोणत्या विषयावर बोलतात, लोकशाही धोक्यात आहे. इथल्याच एका न्यायाधीशाचा खून झाला आणि त्या न्यायाधीशाच्या खुनाच्या संशयाचं बोट (आरोप) त्या अमित शाहकडे जात होतं. ही ती केस होती, त्यामुळे सुप्रीम कोर्टामध्ये हा विषय जेव्हा आला त्या न्यायाधीशावर याचं दडपण येऊ लागलं. तेव्हा ते चार न्यायाधीश रस्त्यावर आले आणि सांगू लागले की, लोकशाही धोक्यात आहे. देशाच्या इतिहासात आजपर्यंत असे कधी घडले नव्हते. त्या चार न्यायाधीशांनी रस्त्यावर येऊन पत्रकार परिषद का घेतली, याचे उत्तर अगोदर भारतीय जनता पक्षाने द्यावे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आर.बी.आय.) चे दोन गव्हर्नर सरकारचे आमच्यावर प्रेशर येत आहे, सरकार नको त्या गोष्टी आम्हाला करायला लावत आहे, असे म्हणून राजीनामे देतात. असे आजपर्यंत या देशाच्या इतिहासात कधी घडलं नव्हतं. एक रघुनाम राजन आणि दुसरे ऊर्जित पटेल या दोघांनी आपले राजीनामे दिले. आमच्या देशाच्या एका पंतप्रधानाला एक झटका आला आणि एका रात्रीत त्यांनी नोटाबंदी करून टाकली. आर.बी. आय.च्या गव्हर्नरला त्याची माहिती नाही, देशाच्या मंत्रिमंडळाला त्याची माहिती नाही. मंत्रिमंडळाला एका रूममध्ये डांबून ठेवले. सगळ्यांचे फोन काढून घेतले. पंतप्रधानाने बाहेर जाऊन देशाला संबोधून सांगितले की, आजपासून जुन्या नोटा बंद. असं काय झालं, अशी कोणती गोष्ट होती? त्याविषयी सर्वानुमते निर्णय का घ्यायचा नव्हता? आर.बी.आय.च्या गव्हर्नरला तुम्ही विश्वासात का नाही घेतलं. या देशाच्या नोटा बंद करण्याचा निर्णय तुम्ही एका रात्रीत घेता, या देशाच्या फायनान्स मिनिस्टरला माहिती नाही. तेव्हा या देशात जवळपास १४ किंवा १६ लाख कोटी रूपये सगळीकडे फिरत होते. तुमच्या त्या जुन्या नोटा एका रात्रीत बंद करून टाकल्या. का तर म्हणे, काळा पैसा बाहेरून आणायचा आहे. तुमच्या हातामध्ये देश आहे, ईडी आहे, इनकम टॅक्स विभाग आहे. सगळ्या गोष्टी तुमच्या हातात असताना तुम्हाला माहिती नाही का? काळा पैसा कुठे आहे? कोणाकडे आहे? काळ्या पैशांवरती भारतीय जनता पक्ष बोलतोय, मग नोटा बंद झाल्यापासून २०१४ ते २०१९ सालापर्यंत निवडणुकीला वापरलेला पैसा भारतीय जनता पक्षाकडे आला कुठून? याचं उत्तर त्यांनी द्यावं.

आज ते जे वारेमाप पैसे फेकतात, ते पैसे भारतीय जनता पक्षाकडे आले कुठून? आणि भारतामध्ये फेक करन्सी आहे म्हणतात. भारतामध्ये खोट्या नोटा किती होत्या. त्या खोट्या नोटांबद्दल बंगळुरुच्या एका इन्स्टिट्यूटचा रिपोर्ट आहे, ५०० ते ८०० कोटी रूपयांच्या खोट्या नोटा होत्या. ५०० ते ८०० कोटी रुपयांसाठी तुम्ही १६ लाख कोटी रुपयांच्या नोटा बंद करून टाकल्या. त्या नोटाबंदीचा हेतू स्वच्छ नव्हता. हे सरकार सांगत होते की, आम्ही दरवर्षी २ कोटी लोकांना रोजगार देऊ. २ कोटी लोकांना रोजगार म्हणजे ५ वर्षात जवळपास साधारणतः १० कोटी लोकांना रोजगार मिळाला असता. १० कोटी लोकांना रोजगार याचा अर्थ, समजा एका घरामध्ये ४ माणसे धरली तर २० कोटी लोकांचं घर उभं राहिलं असतं. पण एका नोटाबंदीच्या निर्णयामुळे या देशाच्या अधिकृत आकड्याप्रमाणे साडेचार ते पाच कोटी लोकांच्या नोकऱ्या गेल्या. एका नोटाबंदीच्या निर्णयामुळे जीएसटी लावल्यामुळे अनेक उद्योगधंदे बंद झाले. आज आमच्या इथला यंत्रमाग उद्योग देशोधडीला लागतोय, तो बंद होतोय, तो उद्‌ध्वस्त होतोय. त्यामध्ये काम करणारे कामगार उद्‌ध्वस्त होत आहेत. कुठून शोधायच्या नवीन नोकऱ्या? कुठून शोधायचे नवीन काम? का तुम्हाला असा झटका आला, ज्याच्यातून तुम्हाला असा निर्णय घ्यावा लागला. काय मिळालं या निर्णयामधून? काय लागलं हाताला? ते आधी सांगा. या नोटाबंदी व जीएसटीबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी निवडणुकीच्या प्रचारामध्ये एक शब्द काढायला तयार नाहीत आणि काय म्हणतात, 'जवानांच्या नावाखाली मला मतं द्या' मग 'मेक इन इंडिया गेलं कुठं', 'स्टार्ट अप इंडिया गेलं कुठं'. नमामी गंगे म्हणत गंगा साफ करणार होते, त्याच्यासाठी २० हजार कोटी रुपये काढले होते, ते कुठे गेले? जेवढ्या योजना या माणसाने (पंतप्रधान नरेंद्र मोदी) सांगितल्या होत्या, त्या योजनांच्या जाहिरातीवर साडेचार हजार कोटी रुपये खर्च केले. तुमच्या आमच्या हाताला काय लागलं? या देशाच्या हाती काय लागलं?

इतकी वर्षे या देशामध्ये जे उद्योग सुरू होते, ते हळूहळू बंद पडत आहेत. नरेंद्र मोदी तुम्ही कोणती स्वप्नं दाखवत होता. 'सबका साथ सबका विकास', 'अच्छे दिन आऐंगे' काय काय वारेमाप गोष्टी बोलले होते. परदेशातला काळा पैसा मी भारतात परत आणणार आहे आणि प्रत्येक भारतीयाच्या खात्यात १५ लाख रुपये जमा करणार, अशी स्वप्नं भारतीयांना दाखविण्यात आली, विसरू नका या गोष्टींना. या देशातील एक जबाबदार व्यक्ती जेव्हा या देशातल्या नागरिकांना सांगते की, मी तो काळापैसा बाहेरून (परदेशातून) आणीन आणि तुमच्या प्रत्येकाच्या खात्यात १५-१५ लाख रुपये टाकीन, देशाच्या सव्वाशे कोटी लोकांच्या. सव्वाशे कोटी सोडा त्यापैकी अर्ध्या लोकांच्या खात्यात किती टाकले? कसे येणार आहेत? याचा जाब विचारा.

दोन ते तीन वर्षांपूर्वीची एक गोष्ट. एक पत्रकार एका व्यक्तीला मला भेटायला घेऊन आले. ती व्यक्ती इंग्लंडमध्ये राहते आणि मराठी व्यक्ती आहे. स्वित्झरलॅण्डमधील ज्या बँका आहेत, त्या बँकांची मिळून एक वेगळी बँक झाली, एक संस्था झाली आहे. ती व्यक्ती त्या संस्थेमध्ये काम करते. त्यांच्याशी बोलता बोलता तो विषय निघाला की, मोदी बोलले, १५-१५ लाख रुपये प्रत्येकाच्या खात्यावर जमा करणार. ही गोष्ट ऐकून ती व्यक्ती हसायला लागली आणि म्हणाली की, हे बघा स्विस बँक

आहे ती. अहो, आम्ही धंदा करायला बसलो आहोत, लोकांचे पैसे परत करायला बसलो नाही. उद्या आम्हाला अमेरिकेने जरी सांगितलं की, आम्हाला माहिती द्या. ह्या प्रकारेच पैसे परत करा, आम्ही अमेरिकेला पण देऊ शकत नाही, देणार नाही. भारत तर खूप लांबची गोष्ट राहिली. तर असल्या कोणत्याही गोष्टीची कल्पना नसताना नरेंद्र मोदींनी खोटी स्वप्नं का दाखवली, सर्वांच्या खात्यावर १५-१५ लाख रुपये टाकण्याची? हा विषय अत्यंत गंभीर आहे आणि ही निवडणुकही अत्यंत गंभीर आणि महत्त्वाची आहे. हा हसण्यावर नेण्याचा विषय राहिलेला नाही. देशामध्ये अशा प्रकारची राजकारणी माणसं तुमच्याकडे येऊन तुम्हाला खोटं बोलतात, तुम्हाला खोटी स्वप्नं दाखवतात, तुम्हाला मूर्ख बनवतात आणि मतं मिळवून घेतात आणि त्यानंतर ते या गोष्टीबद्दल चकार शब्दही बोलायला तयार नसतात.

२०१४ च्या निवडणुकीपूर्वी मोदी एका पत्रकार परिषदेत काळा पैसा परत आणण्याच्या मुद्यावर काय बोलले होते आणि २०१४ नंतर त्यांचे सरकार आल्यानंतर त्यांचे सहकारी आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष अमिह शाह यांना याच मुद्यावर एका पत्रकाराने प्रश्न विचारले असता, ते जे काही बोलले या मुद्यासंदर्भात त्यांनी दिलेलं उत्तर हे देशाच्या थोबाडीत मारल्यासारखं आहे. हे किती निर्लज्जपणाचं उदाहरण आहे. (ही लोकं सामान्य जनतेची कशी फसवणूक करतात, हे स्पष्ट करणारे उदाहरण आहे. या सभेत राज ठाकरे यांनी मोदी आणि शहा यांच्या व्हिडीओ क्लिप चालवून लोकांसमोर प्रश्न उपस्थित केला व जागरूक राहण्याचा सल्लाही दिला. निवडणुका तोंडावर असताना फक्त आणि फक्त मतं मिळवण्याच्या हेतूने भाजपने लोकांची उडवलेली थट्टा, मोठमोठ्या मारलेल्या थापा हे इचलकरंजीतील सभेत प्रस्तूत केलेल्या व्हिडीओ क्लिपद्वारे स्पष्ट केले).

राज ठाकरेंनी पुढे पंतप्रधानांची बिहार भेटीची व्हिडीओ क्लिप प्रस्तुत केली आणि त्यामध्ये पंतप्रधानांनी दिलेल्या आकड्यांवर नीट लक्ष देऊन ऐकण्याचे अपील केले. पंतप्रधानांनी बिहार राज्यात स्वच्छता अभियानाअंतर्गत बांधण्यात आलेल्या शौचालयांचा जो आकडा प्रस्तूत केला, तो म्हणजे एका आठवड्यामध्ये ८ लाख ५० हजारांपेक्षा जास्त शौचालये निर्माण केल्याचा दावा स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदींनी बिहार येथील भाषणामध्ये केला आहे. यावर राज ठाकरे यांनी मोदींच्या थापा मारण्यावर काही लिमीट आहे की नाही, असा प्रश्न उपस्थितांसमोर मांडला. यावर प्रतिक्रिया देत ते म्हणाले की, एका आठवड्यामध्ये ८ लाख ५० हजार एवढी शौचालये बांधणे म्हणजेच मोदी सरकारने केलेला विश्वविक्रमच आहे.

नोटाबंदीमधून तुम्ही जे काही उभं केलं, या देशाला प्रामाणिकपणे तासन्‌तास रांगेमध्ये उभं केलं. ज्यामध्ये जवळपास १०० ते १२५ माणसे मरण पावलीत. हाताला काय लागलं? नोटा बंद का केल्यात? भ्रष्टाचार बंद करायचा होता. हजाराची नोट बंद करून दोन हजाराची नोट काढली, अशा कोणत्याही प्रश्नांची उत्तरे आमचे पंतप्रधान पत्रकारांना व जनतेला द्यायला तयार नाहीत. देशातल्या पत्रकारांसमोर जायला आमचे पंतप्रधान



घाबरतात. १९४७ साली पंडित जवाहरलाल नेहरू पंतप्रधान झाल्यापासून आजपर्यंतचे मोदी हे असे एकमेव पंतप्रधान आहेत, ज्यांनी गेल्या पाच वर्षांत एकही पत्रकार परिषद घेतली नाही. या देशाला उत्तर द्यायला ते तयार नाहीत आणि देशाला उत्तर द्यायला बांधीलपण नाहीत. निवडणुका तोंडावर असताना या विषयावर बोलायला पण तयार नाहीत. पण याच निवडणुकीच्या तोंडावर तुम्ही भारत आणि पाकिस्तानसारखा विषय निर्माण करता. चार वर्षांपूर्वीची गोष्ट सांगताना राज ठाकरे म्हणतात की, चार वर्षांपूर्वी मी कल्याण-डोबिंवली महानगरपालिकेच्या निवडणुकीच्यावेळी बोललो होतो, पत्रकार परिषदेत मी बोललो होतो की, २०१९ च्या निवडणुकीच्या अगोदर नरेंद्र मोदी या देशामध्ये एखादी युद्धसदृश्य परिस्थिती निर्माण करतील. तो व्हिडीओ आजही यू-ट्यूबवर आहे. त्यांनी या प्रकारची गोष्ट उभी केली, आमचे जवळपास ४० जवान शहीद झाले . एक आरडीएक्सने भरलेली गाडी येते आणि आमच्या सी.आर.पी.एफ. च्या जवानांच्या ताफ्यात घुसते आणि मोठा स्फोट घडवते, यामध्ये आमचे जवान हकनाक मरतात. मग सांगितले जाते की, आमची विमाने गेली आणि बॉम्ब टाकला. या देशाचे एअरफोर्स, पायदळ सैन्य यांचा आम्हाला अभिमान आहे, ते चुकणार नाहीत.

मी काल-परवाच सांगितलं की, ही जी विमानं असतात ना ही सगळी विमानं प्रोग्रामेड असतात, ही काय वरून बघत जात नसतात. कोल्हापूर आलं का? इचलकरंजी आली का? ही इतकी प्रोग्रामेड असतात की, त्या विमानांमध्ये त्यांना संपूर्ण माहिती दिली जाते की, बरोबर ह्या ठिकाणी बॉम्ब पडला पाहिजे. माहिती जर चुकीची दिली तर आमचा वैमानिक काहीच करू शकत नाही. वैमानिकाला जे टार्गेट दिलेलं असतं, त्या टार्गेटवर जेव्हा विमान पोहोचतं तिकडे ते बरोबर बॉम्ब टाकतं. पहाटे तीन-सव्वातीनच्या



सुमारास बॉम्ब टाकला गेला. सकाळी पहिल्यांदा अमित शाह म्हणाले की, अडीचशे (२५०) माणसे मेली. को-पायलट होतात का तुम्ही? बसला होतात का मागे? अमित शहाला कुठून कळलं की, २५० माणसे मेलीत? तिकडचा एक मदरसा म्हणे उद्‌धवस्त केला. जैश-ए-मोहम्मदचा मदरसा होता तो. परवाच्या दिवशी माणसं जाऊन आली तिकडे, जगभरातील पत्रकार जाऊन आले तिथे, तो मदरसा आहे तिथेच आहे. मुलं तिथे शिकताहेत. जगातील पत्रकार तिथे जाऊन आलेत आणि व्हिडीओपण शुट करून आलेत. का या देशाशी खोटं बोलले पंतप्रधान. तुम्हाला निवडणुकीत विषय पाहिजे म्हणून तुम्ही हा नवीन मुद्दा काढलात. आज पाकिस्तानचा पंतप्रधान इमरान खान सांगतो की, नरेंद्र मोदी निवडून आले पाहिजेत. पाकिस्तानचा इमरान खान सांगतो, जर दुश्मन राष्ट्राकडचा पंतप्रधान सांगत असेल की, आम्हाला इथे हा पंतप्रधान पाहिजे, तर का पाहिजे? ही काय ॲडजेस्टमेन्ट नाही? गेल्या पाच वर्षामध्ये आमचे सर्वाधिक जवान मारले गेले, या मोदीच्या पायी. पंतप्रधान व्हायच्या आधी तुम्ही सांगता, लव लेटर पाठवायचे बंद करा, पाकिस्तानला गोळीने उत्तर द्या. त्यांनी एक मारला तर आम्ही चार मारले पाहिजेत म्हणून आणि हेच पंतप्रधान त्यांच्या शपथविधी सोहळ्याला त्यांच्या नवाज शरीफला बोलवतात. कुठे तरी विमानाने जात असताना अचानक तुमच्या लक्षात येतं की, आज नवाज शरीफांचा वाढदिवस आहे. म्हणून तिकडनं तुम्ही विमान फिरवता आणि नवाज शरीफांकडे जाऊन येता आणि त्यांना केक भरवता. त्या जवानांच्या आई-वडिलांना काय वाटलं असेल. अरे, माझा एकुलता एक मुलगा शहीद झाला आणि हा आमचा पंतप्रधान तिकडे जाऊन त्या दुश्मनाला केक भरवतोय. त्याच्या घरची बिर्याणी खातोय. इतका खोटं बोलणारा माणूस मी खरचं नाही बघितला. या देशातल्या शंभर-सव्वाशे कोटी लोकांशी अशा प्रकारची प्रतारणा करून खोटं बोलणं आणि आज तुमच्यासमोर येऊन हीच माणसं निर्लज्जपणे त्याच जवानांच्या नावानं मतं मागत आहेत. ही गंभीर गोष्ट आहे. तुम्ही विचार करा की, तो जो आरडीएक्सचा हल्ला घडवून आणण्यात आला, त्यामध्ये तुमच्या घरामधील एखादी व्यक्ती गेली असती, एखादा जवान गेला असता, तर तुम्ही तोच व्हिडिओ आनंदाने पाहिला असता का? आणि तोच आमचा पंतप्रधान आज महाराष्ट्रामध्ये येत आहे, देशामध्ये जात आहे आणि देशामध्ये काय सांगत आहे की, ''मै आपसे कहेना चाहता हूँ, मेरे देश के फस्टटाईम व्होटर को, आप ही संकल्प किजीए की, पहला वोट आपका जो आपके जीवन की पहेली ऐतिहासिक घडी है, आपको जीवनभर याद रहेगा की, पहला वोट कब डाला, कहाँ डाला, कौनसा चुनाव था, किसको डाला. ये जीवनभर याद रहनेवाला है. हर किसी को जीवन की पहेली घटना याद रहेती है. मै यह कहेना चाहता हूँ, फर्स्ट टाईम वोटरोको, क्या आपका पहेला वोट पाकिस्तान के बालाकोट मे एअर स्ट्राईक करनेवाले वीर जवानों के नाम समर्पित हो सकता है. क्या मै मेरे फर्स्ट टाईम वोटरो से कहना चाहता हूँ की, आपला पहला वोट पुलवामा मे जो वीर शहीद हुये, उन वीर शहीदों के नाम समर्पित हो सकता है क्या?''. नरेंद्र मोदींची व्हिडिओ क्लिप दाखवत त्यांच्या स्वतः च्या शब्दात जशीच्या तशी हिंदी भाषेमध्ये दाखवल्यानंतर राज ठाकरे सभेतील लोकांना संबोधित करताना पुढे म्हणतात की, ज्या शहीद जवानांच्या नावाने मतं मागत आहेत. या देशाला जी स्वप्नं त्यांनी दाखवली, त्याबद्दल एक वाक्यही बोलायला तयार नाहीत. हा माणूस आणि याच माणसाच्या मनात हे जे दोन व्हिडिओ आहेत ना, हे मी माझ्या प्रत्येक सभेमध्ये दाखवणार आहे. मुद्दामहून दाखवणार आहे की, हा माणूस कळटोक आहे ते. या माणसाच्या मनामध्ये आमच्या जवानांप्रती जी भावना आहे ती एकदा ऐका, म्हणजे तुम्हाला कळेल की, या माणसाच्या मनामध्ये काय आहे ते. आज जवान तुम्हाला मतदानासाठी दिसत आहेत. पण हाच माणूस आमच्या जवानांबद्दल काय बोलला होता, ते ऐका असे म्हणून राज ठाकरे मोदींचा दुसरा व्हिडिओ लोकांना दाखवतात. ''सेना मे जवान जितना साहस करने की ताकद रखता है ना उससे ज्यादा साहस करणे की ताकद एक व्यापारी रखता है''. व्हिडिओ संपल्यानंतर राज ठाकरे पुढे म्हणतात की, आमच्या जवानांपेक्षा या देशातल्या व्यापाऱ्यांचे साहस जास्त आहे असे मोदी म्हणतात, तर अनिल अंबानीला घेऊन जा ना मग सीमेवर, बंदुका पकडू द्या हातामध्ये, घेऊन जा त्या अदानीला. पंतप्रधानांच्या मनामध्ये काय आदर आहे आमच्या जवानांबद्दल, हे त्यांच्याच एका व्हिडिओ क्लिपवरून लक्षात येते. चाळीस मेले काय, दोनशे मेले काय, आठशे मेले काय आणि हजार मेले काय? काय फरक पडतो. आमचे राजकारण चालूच राहणार आणि आता निर्लज्जपणे तुमच्या समोर येत आहेत जवानांच्या नावावर मतं मागायला ही माणसं. नरेंद्र मोदी आणि अमित शाह,




**हरीसाल हे देशातील पहिले डिजिटल गाव ठरल्याचा डांगोरा पिटणाऱ्या मोदी सरकारचा पर्दाफाश राज ठाकरे यांनी सोलापूरच्या सभेत केला. हरीसाल हे गाव बेरोजगारीसह अनेक समस्यांना तोंड देत असल्याचे त्यांनी सांगितले. पुराव्यादाखल हरीसाल डिजिटल गाव झाल्याची जाहिरात करणाऱ्या तरूणालाच राज ठाकरे यांनी यावेळी सभेत लोकांसमोर उभे केले होते. जाहिरातील तरूणाने कामासाठी गाव सोडले आहे.**

ही दोन माणसं या देशाला कलंक आहेत. या देशाची लोकशाही हे लोक धोक्यात आणत आहेत. मी तुम्हाला सांगून ठेवतो की, हे सगळं आहे ना रशियाच्या लेवलने घेऊन जायचं आहे की, आठ, दहा पंधरा लोकं या देशाची आर्थिक नाडी सांभाळतील. सगळे उद्योगधंदे फक्त आठ, दहा, पंधरा लोकांच्या हातामध्ये असणार. दुसरा कोणी याच्यामध्ये पडणार नाही. उद्या जर तुम्ही उसावर किंवा यंत्रमागावर आंदोलन केलं तर चिरडून टाकतील, मारून टाकतील. या देशाची लोकशाही यांना संपवून टाकायची आहे आणि याच गोष्टीची त्यांनी सुरुवात केली आहे. पहिला हात घातला सुप्रीम कोर्टाला आणि आरबीआयला. या देशातील जेवढ्या संस्था आहेत, या देशात लोकशाही म्हणून जो ढाचा आहे तो सगळा उद्ध्वस्त करून टाकयचा आहे, हीच गोष्ट १९३०-३१ आणि १९३२ साली अॅडॉल्फ हिटलरने केली होती. आज नरेंद्र मोदी तुमच्यासमोर येऊन रेडिओ वर जी 'मन की बात' सांगत आहेत, ते हे अॅडॉल्फ हिटलरने त्यावेळेस सुरू केलं होतं. रेडिओवर भाषणं व्हायची त्याची. दर महिन्याला भाषण व्हायचं. त्यांनी तेच केलं होतं त्यावेळेस. त्यावेळी टीव्ही चॅनल्स नव्हते, पण सर्व वर्तमानपत्रांची मुस्कटदाबी करून टाकली होती. जेवढे पत्रकार होते बंद करून टाकले. हे जे आता चालू आहे ना तुम्ही जे आता चित्रपट पाहिले ना, हे सगळे चित्रपट गव्हर्मेंट, नरेंद्र मोदी स्पॉन्सर्ड चित्रपट आहेत. उदाहरणार्थ, ऊरी, पॅडमॅन हे सगळे जे आता येऊन गेले, हे सगळे चित्रपट त्यांच्या प्रचाराची तंत्र आहेत. अगदी हीच गोष्ट अॅडॉल्फ हिटलर त्यावेळेस करायचा. त्याच्या प्रचारासाठी म्हणून तो फिचर्स फिल्म काढायचा, जर्मन फिल्म काढायचा आणि लोकांपर्यंत पाठवायचा. लोक ते बघायचे आणि त्या फिल्ममध्ये तो मेसेज असायचा, त्याच्या प्रचाराचा. हेच सध्या चालू आहे. एक खोटं जर तुम्ही समजा दहा वेळा बोलत राहिलात तर ते खरं वाटायला लागतं. ही गोबेल्स नीती आहे. हिटलरचा जो माणूस होता गोबेल्स, त्याची नीती आहे. इथे सगळं चक्र पूर्ण भारतामध्ये फिरवण्याचे काम सुरू आहे. नरेंद्र मोदी पंतप्रधान व्हायच्या आधी हे कळलं नाही या देशाला. पण वर्षभरातच कळायला लागलं या देशाला की, हा माणूस काय आहे आणि आता तर स्पष्टचं झालं की, या माणसाने काय करून ठेवलंय. जगभरातील वर्तमानपत्र बोलत आहेत की, या माणासने या संपूर्ण देशाचे अर्थकारण फिरवून टाकलं. स्पॉन्सर्ड पुरस्कार मिळत आहेत त्यांना आता. मी आज तुमच्यासमोर भाषणासाठी उभा आहे, ना माझा कोणी उमेदवार उभा आहे, ना माझा पक्ष आहे. मी आज तुम्हाला फक्त हे सांगायला आलो आहे की, बाबांनो बेसावध राहू नका. हा देश एकदा फसला, पुन्हा फसू नका. माझ्या माता-भगिनी येथे आल्या आहेत. त्यांना माझी हात जोडून विनंती आहे की, २०१४ च्या निवडणुकीत जे झालं ते झालं. ते एक वाईट स्वप्नं होत म्हणून सोडून देऊ आपण. पण यापुढे या देशाने वेगळा विचार करणे गरजेचे आहे. राजकीय क्षीतीजावरचे नरेंद्र मोदी आणि अमित शाह ही दोन माणसं नष्ट होणं गरजेचं आहे. ते जाणे गरजेचं आहे. त्यासाठी तुम्हाला इथं कामाला लागणं गरजेचे आहे. जेव्हा कधी इथे मतदान असेल तेव्हा मात्र आपण व्यवस्थित जागृत राहावं, सावध राहावं एवढीच विनंती करतो. धन्यवाद.

●●●

**शब्दांकन : जयेश बोदेले**



# मोदींनी खोटे बोलून जगात भारताची अब्रू काढली - ॲड. प्रकाश आंबेडकर

पुलवामा हल्ल्यानंतर पाकिस्तानचे विमान पाडल्याचा दावा पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केला. त्यावर झालेल्या तपासात अमेरिकेने सांगितले की, पाकिस्तानला दिलेली सर्व १६ विमाने सुरक्षित आहेत. यावरून मोदींनी खोटे बोलून जागतिक स्तरावर देशाची अब्रू काढल्याची घणाघाती टीका ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी केली. शहीदांच्या नावावर मतं मागून मोदींनी देशाच्या सैनिकांचा अवमान केला आहे. पाच वर्षात काहीच काम न करता निवडणुकीच्या तोंडावर शहीदांचे, सैन्यदलाच्या कारवाईचे श्रेय लाटण्याचा प्रकारही मोदींनी केला आहे. नरेंद्र मोदी पाच वर्षात केलेल्या कामाच्या मुद्द्यावर मतं मागण्याऐवजी नको त्या विषयाचे चित्र उभे करून मतं मागत आहेत, जो अधिकार त्यांना नाही.

सध्याच्या सरकारचे चारित्र्य चोरांचे आहे. यापूर्वी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या काळात भ्रष्टाचाराची मालिका सुरू झाली. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवत आता भाजप सरकारही घोटाळ्यात अडकले आहे; कारण राफेलप्रकरणी पितळ उघडे पडू नये म्हणून कागदपत्रे चोरीला गेल्याचे सांगतात आणि सर्वोच्च न्यायालयात सांगतात की, कागदपत्रे समितीकडे आहेत. मंत्रालयातील कागदपत्रे जाळली जातात. दहावी नापास असलेला पंतप्रधान देश कसा सांभाळणार? असा प्रश्न करीत वंचित आघाडी सत्तेत आल्यास अशांना जेलमध्ये टाकल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराही ॲड. आंबेडकर यांनी विविध सभांमधून दिला आहे.

केंद्र व राज्यातील सरकारच्या काळात विकासाची अनेक कामे बंद पडली; कारण यांची टक्केवारी वाढल्याने कार्पोरेट करप्शन वाढले आहे. नोटाबंदीचा अधिकार गव्हर्नरला असताना पंतप्रधानांनी अचानक नोटाबंदी जाहीर केली. पंतप्रधानाला हा अधिकार कोठून आला? देशात नोटाबंदी करून देशाच्या अर्थव्यवस्थेची वाट लावली. व्यापाऱ्यांना देशोधडीला लावले. अनेक तरुणांना नोकरी गमवावी लागली, बेरोजगारी वाढली, छोटे व्यापारी उद्ध्वस्त झाले. येणाऱ्या काळात व्यापाऱ्यांचीही अवस्था शेतकऱ्यांसारखी झालेली दिसेल, तेही आत्महत्येच्या मार्गाने जातील. हे टाळण्यासाठी देशात सत्ता परिवर्तन आवश्यक असून नरेंद्र मोदी आणि भाजप कुठल्याही परिस्थितीत सत्तेत येणार नाहीत याची काळजी मतदारांनी घेतली पाहिजे. व्यापाऱ्यांनी हिंदू एकत्रीकरणाच्या भूलथापांना बळी पडू नये, असे सांगून शेतकरी, व्यापारी, बहुजनांनी वंचित आघाडीच्या उमेदवारांच्या पाठीशी राहावे. वंचित बहुजन आघाडी सत्तेत आल्यास आरएसएसला कायद्याच्या चौकटीत आणले जाणार असून केजी टू पीजीपर्यंत मोफत शिक्षण देण्यात येणार आहे. शिक्षणाच्या बजेटवर १२ टक्के इतका खर्च केला जाणार आहे. लिंगायत समाजाला स्वतंत्र समाजाचा दर्जा, शेतकऱ्यांना मोफत वीज, शेतमालाला

योग्य हमीभाव, मुस्लिमांसाठी सच्चर आयोगाची अंमलबजावणी यांसारख्या अनेक महत्त्वाच्या योजना राबवल्या जाणार आहेत.

भाजपने जनतेला भूलथापा देऊन सत्ता हस्तगत केली, तीच सत्ता जनता हिसकावून घेणार असल्याचे आग्रही मत प्रकाश आंबेडकर मांडत आहेत.

संसदेतील प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसने कायमच भाजपच्या धोरणाला छुपा पाठिंबा दिला आहे. मुळात काँग्रेस पक्ष नरेंद्र मोदींच्या इशाऱ्यावर चालत असून मोदींनी गांधी परिवाराला तुरुंगात टाकण्याची धमकी दिल्यामुळेच काँग्रेसने वंचित बहुजन आघाडीशी युती केली नसल्याचा आरोप ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी एका सभेत केला आहे. ज्या समाजाची मते, त्याच समाजाला उमेदवारी हा राजकारणात नवा फंडा आला आहे. महाराष्ट्रात १६९ घराणी राज्यकारभार हाकत असून नात्यागोत्यांचे राजकारण केले जात आहे. या १६९ प्रस्थापित घराण्यांची सत्ता घालवण्याचे काम आमची आघाडी करत असून घराणेशाही मोडण्याचे काम महाराष्ट्रातील वंचित समूह एकत्र येऊन करत आहेत. राज्यातील सामान्य माणसाने, सर्व वंचितांनी, आलुतेदार-बलुतेदारांनी प्रस्थापित कुटुंबशाही व धनदांडग्यांविरुद्ध बंड पुकारले आहे. धर्मवादी, जातदांडग्या, धनदांडग्यांची बांधिलकी, दहशत मोडून वंचितांचा वंचितपणा दूर करण्यासाठी ही आघाडी राजकारणात नव्या ताकदीने उभी राहिली आहे.

गांधी कुटुंबाला व रॉबर्ट वड्रा यांना तुरुंगात टाकण्याची धमकी दिली. आम्ही आरएसएसला कायद्याच्या चौकटीत आणण्यासाठी प्रयत्न करत आहोत, त्यासाठी दलित-मुस्लिम युती केली आहे. आमच्या भूमिकेमुळे आरएसएस हादरली असल्यामुळे काँग्रेसने आमच्याशी युती केली नसल्याचे ॲड. आंबेडकर म्हणाले आहेत. आरएसएस व भाजपला माणुसकीचे राजकारण संपवून धर्माचे राजकारण करायचे आहे. धर्माच्या राजकाणामुळे देशातील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार असून अल्पसंख्याक, दलित या समूहांवर अन्याय करण्याची भूमिका धर्मवादी लोक घेण्याची शक्यता आहे. आज देशातील लोकशाही, संविधान मोदींच्या हुकूमशाही प्रवृत्तीमुळे धोक्यात आले आहे. काँग्रेस-राष्ट्रवादी या सर्व प्रक्रियेत शांत राहिली असून त्यांच्या छुप्या पाठिंब्यामुळेच मोदी देशात नंगानाच करत आहेत. काँग्रेस आणि भाजपा या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून त्यांना सत्तेबाहेर काढणे हाच पर्याय वंचितांच्या समोर आहे. देशातील जनतेला शांत, मजबूत व लोकशाही मूल्यांची बूज राखणारे सरकार स्थापन करायचे असल्यास वंचित बहुजन आघाडीच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे. आज वंचित समाजाच्या ऐक्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात एक भक्कम पर्याय उभा राहिला असून या देशातील तरूणांना, व्यापाऱ्यांना, शेतकरी, शेतमजुरांना, अल्पसंख्याक समूहाला नरेंद्र मोदींना सत्तेतून खाली खेचण्यासाठी एक संधी निर्माण झाली असून पंतप्रधान मोदींचे कपडे फाडून संधीचं सोनं करा, भाजपाला सत्तेतून खाली खेचा, असं आवाहन ॲड. आंबेडकर यांनी मतदारांना केलं आहे. मोदींनी नोटाबंदी करून व्यापाऱ्यांचा व्यापार बुडवला आहे. स्वतःच्या मर्जीने जीएसटी करप्रणाली लागू करून लाखो रुपयांचा महसूल जमा केला आहे. पेट्रोल, डिझेल दरवाढ करून जनतेच्या खिशातील पैसे उकळले आहेत. शेतकऱ्यांना हमीभाव न दिल्यामुळे त्यांच्या आत्महत्यात प्रचंड वाढ झाली आहे. अशा वेळी राज्यात शिवसेना सरकारवर अंकुश ठेवायचे काम करत असल्याचा दावा करते. मात्र, याच शिवसेनेने गुजरातच्या हिरे व्यापाऱ्यांना त्यांच्या उद्योगासाठी एक लाख कोटी रुपयांचे अनुदान दिले. ते अनुदान कशाच्या आधारावर दिले हे पहिल्यांदा जाहीर केले पाहिजे.

सेना-भाजपचे सरकार हे शेतकऱ्यांचे नसून फक्त कारखानदारांचे आहे, बड्या उद्योगपतींचे आहे, असा आरोप ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी प्रचार सभांमधून केला आहे.

मोदी सरकरने गेली पाच वर्षे देशाला लुटले आहे. या लुटारूंनी नोटाबंदी, जीएसटी आणून दोन कोटी तरुणांच्या नोकऱ्या घालवल्या आहेत. अशा सत्ताधाऱ्यांना पुन्हा जनतेने थारा देऊ नये. विदेशवारी करणाऱ्या नरेंद्र मोदींना जर चौकीदार व्हायचे असेल तर त्यांनी चौकीदारीच करावी, पंतप्रधान होण्यासाठी खटाटोप करून निवडणूक लढविण्याची काय गरज, असा प्रश्न वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी उपस्थित केला.

महाराष्ट्रात सुरू असलेले परिवर्तन मोदींसह अन्य राजकारण्यांच्या पचनी पडत नाही. अशा लुटारूंना सत्तेवरून खाली खेचले पाहिजे. भाजपतील काही पुढारी हे सुशिक्षित बेरोजगारांनी पकोडे विकण्याची भाषा करतात; परंतु वंचित आता मोदींना चाय तर अमित शहांना पकोडे विकायला लावतील. महाराष्ट्रात प्रचार करताना मोदींनी मी मागासवर्गीय असल्यामुळेच काँग्रेस मला जातीवाचक बोलत असल्याचे सांगितले. मात्र, मोदी १५ वर्षे गुजरातचे मुख्यमंत्री तर पाच वर्षे देशाचे पंतप्रधान होते. याकाळात त्यांनी मागासवर्गीयांसाठी काय केले, हे जाहीर करायला हवं. मोदींनी गोंदिया येथे बोलताना तिहार तरुंगात बंदिस्त असलेल्या दोघांनी तोंड उघडले तर अनेकांचे खरे चेहरे समोर येतील, असा गर्भित इशारा कुणाचेही नाव न घेता दिला होता. यावर शरद पवारांनी आमची कळ काढाल तर माफी नाही, असे प्रत्युत्तर दिले होते. यावर प्रकाश आंबेडकरांनी निशाणा साधताना पंतप्रधान मोदी हे खरोखरच शरद पवारांचे आवाहन स्वीकारतील का, असा प्रश्न करून निवडणूक काळात सगळ्याच गोष्टींचा खुलासा झाला पाहिजे, सर्वच गोष्टी समोर आल्या पाहिजेत म्हणून मोदींनी शरद पवारांचे आवाहन स्वीकारले पाहिजे, असे मत ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी मांडले आहे. नोटाबंदी करताना नोटांवर जर गव्हर्नरची सही आहे तर नोटांची सर्व मालकीही गव्हर्नरची असायला हवी. कोणत्याही नोटा बदलून देण्याचे काम हे त्यांचेच आहे. मग मोदींनी नोटाबंदी कशी केली? हा अधिकार मोदींना कोणी दिला? नोटाबंदी करून ४० टक्के कर भरून घेतल्याने हा एक प्रकारे मोदींनी दरोडाच टाकला आहे. ●●●

**(ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी १५ एप्रिल २०१९ पूर्वी महाराष्ट्रात विविध ठिकाणी केलेल्या भाषणांचा सारांश)**



# मॉबलिंचिंग मोदींचा वारसा-ओवेसी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभा निवडणुकांसाठी पुन्हा एकदा हिंदुत्वाचे कार्ड बाहेर काढले आहे. त्यांनी आपल्या भाषणात हिंदू-मुस्लिम भाषा वापरणे योग्य नाही, अशी टीका ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमिनचे (आयएमआय) अध्यक्ष खासदार असदुद्दिन ओवेसी यांनी केली. पंतप्रधान असलेल्या व्यक्तीने 'हिंदू-मुस्लिम'ची भाषा वापरणे योग्य नाही. मात्र, मला त्यांच्या तोंडून ही भाषा ऐकल्याचे आश्चर्य वाटले नाही'. नरेंद्र मोदी यांनी हिंदू-मुस्लिमांची भाषा करून देशात सत्ता मिळवली असल्याचा आरोप ओवेसी यांनी यावेळी केला. महाराष्ट्रामध्ये ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या वंचित बहुजन आघाडीला ओवेसी यांच्या पक्षाने पाठिंबा दिला असून राज्याच्या राजकारणात प्रस्थापित पक्षांना सळो की पळो करून सोडले आहे. ओवेसी यांनी ॲड. प्रकाश आंबेडकर आपला मोठा भाऊ असल्याचे सांगून त्यांच्या खांद्याला खांदा लावून ते सांगतील त्याप्रमाणे महाराष्ट्रात राजकीय भूमिका घेणार असल्याचे सांगितले आहे. वंचित बहुजन आघाडीच्या वतीने राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी जाहीर सभा झाल्या. ओवेसी यांनी या सभांमधून भाजप सरकार संविधानविरोधी असून त्याला सत्तेवरून खेचण्याचे आवाहन केले आहे. नरेंद्र मोदी यांच्या काळातच देशातील दलित व मुस्लिमांवर मोठ्या प्रमाणावर अन्याय-अत्याचार झाले असून मुस्लिम तरूणांना वेगवेगळ्या खोट्या गुन्ह्यांत अडकवले जात आहे, त्यांच्यावर देशद्रोहाचे आरोप केले जात आहेत. अनेक मुस्लिम व्यक्तींना गोहत्येच्या आरोपावरून सामूहिकरित्या ठेचून मारले जात आहे. मोदी यांच्या अप्रत्यक्ष पाठिंब्यामुळेच देशात मॉब लिंचिंगचे प्रकार वाढले असून मोदी अत्यंत सूडबुद्धीने व द्वेषाने मुस्लिम समुदायाला वागवत आहेत. हिंदू-मुस्लिम द्वेष पसरवण्यात चौकीदार म्हणणारेच मोदी सर्वात पुढे आहेत. मॉब लिंचिंगचा वारसा मोदींनीच देशाला दिला आहे. भारताचा इतिहास जमावाकडून झालेल्या हत्यांसाठी लक्षात ठेवला जाईल, असा आरोप ओवेसी यांनी केला. आसाममध्ये ७ एप्रिल रोजी एका मुस्लिम व्यक्तीला जमावाने मारहाण करून जबरदस्तीने गोमांस खाण्यास भाग पाडले. याचा निषेध करत ज्या राज्यांत गोमांसावर बंदी नाही, जिथले लोक गोमांस खातात तिथे शौकतअली नावाच्या एका ६८ वर्षीय मुस्लिमाला बेदम मारहाण केली असल्याचे सांगून देशात रोज कुठे ना कुठे मुस्लिमांवर हल्ले होत आहेत. हे हल्ले रोखू शकणाऱ्या व्यक्तीला सरकारमध्ये पाठवणं गरजेचं आहे, असं सांगून मोदी सर्वांसाठी बोलत नाहीत तर केवळ हिंदुत्वासाठी बोलतात, हिंदुत्त्ववाद्यांचे रक्षण करतात, ते केवळ आरएसएसच्या विचारधारेवर विश्वास ठेवणाऱ्यांचे चौकीदार आहेत. देशापेक्षा स्वतःला मोठे मानतात, देशापेक्षा स्वतःला मोठे न मानणाऱ्या माणसाला मत द्या, असे आवाहन त्यांनी विविध



समाजाने आता जागे होऊन स्वतःच्या हिमतीवर राजकारण करणे अत्यावश्यक असून त्यांनी आपली स्वतंत्र ताकद उभी करायला हवी. धर्मनिरपेक्षतेचा ठेका केवळ मुस्लिम समाजाचा नसून या देशावर प्रेम करणाऱ्या प्रत्येकाचा आहे. लोकशाही वाचवण्यासाठी भाजपा सरकारला सत्तेबाहेर काढून सर्वांना समान न्याय मिळेल, अशी राजकीय शक्ती उभारणे महत्त्वाचे आहे. आज देशावर हिंदुत्ववादाचे, फॅसिस्ट विचारांचे संकट घोंगावत असून ते दूर करण्यासाठी दलित-मुस्लिम ऐक्याची नितांत गरज आहे. देशाच्या संसदेत रोज संविधानविरोधी कायदे बनवण्याचा उच्चांक नरेंद्र मोदी यांनी गाठला आहे. स्वतःच्या मर्जीप्रमाणे कायदे तयार केले आहेत. उच्चवर्णीयांना १० टक्के आरक्षण देणे पूर्णपणे घटनाबाह्य असून तिहेरी तलाकच्या माध्यमातून शरियतमध्ये हस्तक्षेप करण्याचा गुन्हा मोदी सरकारने केला आहे. संसदेत दलित-मुस्लिमांची शक्ती असती तर घटनाबाह्य आरक्षण किंवा तिहेरी तलाकसारखा कायदा मंजूर झाला नसता. येणाऱ्या काळात भाजपला सत्तेवरून हटवणं हेच प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य असायला हवे. मोदी

सभांमधून केले आहे. बिहारसारख्या राज्यात पुरोगामी म्हणवणाऱ्या नितीशकुमार आणि नरेंद्र मोदी यांचे प्रेम हे 'लैला-मजनू'सारखे आहे. आज बिहारमध्ये सर्वाधिक मुस्लिमांवर अत्याचार केले जात आहेत. महाराष्ट्रात तर मुस्लिमांना दिले गेलेले आरक्षण भाजप सरकारने काढले असून महाराष्ट्रातील सोलापूर, मालेगांव, मुंबई या शहरांतील निष्पाप तरूणांना खोट्या गुन्ह्यांत अडकवून त्यांचे आयुष्य सरकारने पोलिसांच्या मदतीने बर्बाद केले आहे. महाराष्ट्रात काँग्रेस-राष्ट्रवादीने यासंबंधाने मुस्लिमांच्या बाजूने कधीही मत मांडले नाही. सुशीलकुमार शिंदे यांनी ठरवले असते तर सोलापूरमधून ज्या चार तरूणांना देशद्रोहाच्या गुन्ह्यात अटक करून एकाची हत्या केली, ती थांबवू शकले असते. मात्र त्यांनी तसे धाडस दाखवले नाही. आज देशासमोर संविधान टिकवण्याचे सर्वात मोठे आव्हान असून काँग्रेस छुप्या पद्धतीने भाजपासोबत असल्याचा आरोप ओवेसी यांनी केला आहे. शरद पवार मोदींचे राजकीय गुरू असून ते संविधान वाचवण्यासाठी प्रयत्न करत नाहीत तर ते केवळ पुतण्याला वाचवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. पवारांच्या पुतण्याने शेतकऱ्यांनी पाणी मागितल्यानंतर धरणात सू करावी का, असा प्रश्न करून अपमान केला असल्याचे त्यांनी म्हटले. भाजप किंवा काँग्रेस-राष्ट्रवादीचे सरकार कोणत्याही परिस्थितीत दलित-मुस्लिमांना न्याय देऊ शकत नाही, हे दोन्ही एकाच नाण्याच्या दोन बाजू असून भाजप जहाल हिंदुत्त्वाचे समर्थन करत आहे तर काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस हे छुप्या हिंदुत्त्वाचे समर्थन करीत आहेत. राहुल गांधींनाही सातत्याने मंदिरात जाऊन आपण हिंदू असल्याचे दाखवून द्यावे लागत आहे. आजवर मुस्लिमांना हिंदुत्ववाद्यांची भीती दाखवून काँग्रेसने कायम मुस्लिम समाजाची मते मिळवून ७० वर्षे सत्ता उपभोगली आहे. धर्मनिरपेक्षतेची सगळी तत्त्वे मुस्लिम समाजावरती लादली जात आहेत. त्यामुळे मुस्लिम

हिंदू-मुस्लिमांबाबत चर्चा घडवतात, पण ते माझ्यासमोर पाच मिनिटेही टिकू शकत नाहीत. त्यांना हिंदू-मुस्लिमांवर चर्चा करायचीच असेल तर त्यांनी माझ्यासोबत चर्चा करावी, असे खुले आव्हान ओवेसी यांनी मोदींना दिले आहे. महात्मा गांधींना गोळी घालून ठार करणारा नथुराम गोडसे हा दहशतवादी आहे की नाही हे पहिल्यांदा नरेंद्र मोदी यांनी जाहीर करायला हवे. आरएसएसची विचारधारा ही देशाला तोडणारी विचाधारा असून ते संविधानाला तोडण्याच्या गोष्टी करत असले तरी गेल्या ५ वर्षात संविधानाला कमजोर करण्याचे सर्वात मोठे प्रयत्न मोदी सरकारकडून झाले आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, बेरोजगारी, चायवाल्या चौकीदाराला दिसत नाही. चौकीदाराच्या पाठिंब्यानेच मेहूल चोक्सी, नीरव मोदी, विजय मल्ल्या करोडो रुपये घेऊन पळाले आहेत. राफेलमध्ये करोडो रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे. देश आर्थिक संकटात सापडला आहे. अशा वेळी देशाची लोकशाही आणि संविधान वाचवण्यासाठी भाजपला सत्तेबाहेर काढण्यासाठी वंचित बहुजन आघाडी आणि प्रकाश आंबेडकरच संसदेत पोहोचणे महत्त्वाचे आहे. ॲड. प्रकाश आंबेडकरांच्या रूपाने बहुजन समाजाला ताकदवान नेता मिळाला असून डॉ. बाबासाहेबांचे नातू म्हणून संसदेला त्यांचे ऐकावे लागेल. मुस्लिम समाज प्रकाश आंबेडकरांना आपल्या खांद्यावर घेऊन संसदेत जायला तयार असल्याचे त्यांनी विविध सभांमधून सांगितले आहे. भाजपवर कठोर टीका करत, काँग्रेस-राष्ट्रवादीच्या धोरणांची पोलखोल करत ओवेसी यांनी ॲड. प्रकाश आंबेडकरांसोबत लोकसभेसह विधानसभेच्याही निवडणुका सोबत लढणार असल्याचे जाहीर केले आहे. ●●●

**(असदुद्दीन ओवेसी यांनी १५ एप्रिल २०१९ पूर्वी महाराष्ट्रात विविध ठिकाणी केलेल्या भाषणांचा सारांश)**

# अॅड. प्रकाश आंबेडकरांचे महाराष्ट्रातील जनतेला खुले पत्र!

*स.न.वि.वि.*

*पत्रास कारण की,*

*देशात लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू झाली आहे. देशात आजवर प्रामुख्याने काँग्रेस किंवा भाजपा अशा दोनच पक्षांनी सत्ता उपभोगली. तिसरा राजकीय पर्याय म्हणून कधीच वंचित समूहाला उभे राहू दिले नाही. किंबहुना घटनाकारांना अपेक्षित लोकशाही सामान्य माणसाच्या दारात पोहचू दिली नाही. मूठभर लोकांनी ७० वर्षे कधी छुप्या, तर कधी खुल्या पद्धतीने आपलाच विकास केला. देशात कायमच वंचित बहुजन समूह सामाजिक, राजकीय क्षेत्रात बेदखल ठरविला गेला आहे. त्यामुळे कधीही छत्रपती शिवबांच्या स्वप्नातील रयतेचे राज्य अस्तित्वात येऊ दिले नाही. छत्रपती शाहू महाराजांनी 'समता' सामान्य जनतेच्या दारात गेली नाही. महात्मा फुल्यांचा सत्यधर्म 'सार्वजनिक' होऊ दिला नाही. गेल्या ७० वर्षात वंचित समूहांच्या शिक्षण, आरोग्य, रोजगार या मूलभूत गरजा सोडवण्यात आल्या नाहीत. तृतीय पंथीयांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकारच व्यवस्थेने नाकारला आहे. वंचित समूहाला राजकीय प्रतिनिधित्व मिळाल्याशिवाय हे प्रश्न सुटणार नाहीत, हे आपण लक्षात घ्यावे.*

*वंचित समूहांच्या मतांवर प्रस्थापित राजकीय पक्षांनी सत्ता उपभोगली. श्रीमंत अधिक श्रीमंत झाला, तर गरीब अधिकाधिक गरीब झाला. हे चित्र बदलवण्यासाठी विकासाची समान संधी निर्माण करणे गरजेचे आहे. सत्ता, संपत्ती विशिष्ट कुटुंबाची मक्तेदारी राहिली आहे. म्हणूनच महाराष्ट्रात तमाम वंचित समूहांनी एकत्र येत लोकशाही वाचवण्याचा आणि स्वतः सत्ताधारी होण्याचा सशक्त पर्याय उभा केला आहे. या सत्ता संपादन लढ्यात वंचित समूहाला महाराष्ट्राच्या जनतेची साथ हवी आहे. हा निर्णायक लढा असल्याने वंचित बहुजन समाजाने जागृत होऊन, सत्तेतील आपला वाटा स्वतः घ्यावा. यासाठी लोकशाहीतील सर्वांत मोठ्या उत्सवात आपण सर्वांनी सहभागी होऊन वंचित बहुजन आघाडीला मोठ्या प्रमाणात मतदान करावे, हीच महाराष्ट्रातील जनतेला विनंती.*

*एकत्र येऊयात, लढूयात, जिंकूयात!!!*

***– अॅड. प्रकाश यशवंत आंबेडकर.***
*वंचित बहुजन आघाडी*

# संविधानाचा सरनामा हाच आमचा जाहीरनामा : वंचित बहुजन आघाडी

'भारतीय संविधानाचा सरनामा हाच आमचा जाहीरनामा' असल्याचे सांगत वंचित बहुजन आघाडीने आपला जाहीरनामा प्रकाशित केला. 'केजी टू पीजी' मोफत शिक्षण देण्यापासून ते आरएसएसला संविधानाच्या चौकटीत आणणार, अशी अनेक आश्वासने या जाहीरनाम्यात देण्यात आली आहेत. पुण्यात पत्रकार परिषद घेऊन हा जाहीरनामा प्रकाशित करण्यात आला. यावेळी माजी आमदार पद्मश्री लक्ष्मण माने उपस्थित होते.

हा समग्र जाहीरनाम्याचा अंश असून संपूर्ण जाहीरनाम्याचे डिजीटायझेशन करून तो नागरिकांपर्यंत पोहचविण्यात येईल, असे यावेळी सांगण्यात आले. या जाहीरनाम्यात विविध २७ मुद्द्यांवर भर देण्यात आला आहे. सत्तेत आल्यास शिक्षणावर बजेटच्या १२ टक्के इतका खर्च करणार असल्याचे या जाहीरनाम्यात म्हटले आहे. आजतागायत शिक्षणाचा मुद्दा कुठल्याही राजकीय पक्षांनी मूळ अजेंड्यावर घेतला नव्हता. त्याचबरोबर सर्वांना मोफत शिक्षणाबरोबरच आरएसएसला संविधानाच्या चौकटीत आणणार असल्याचेही या जाहीरनाम्यात नमूद करण्यात आले आहे. लिंगायत समाजाला स्वतंत्र धर्माचा दर्जा, शेतकऱ्यांना मोफत वीज, आयोग नेमून शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव व शेतकऱ्यांना सबसिडी देणार, मुस्लिमांसाठी सच्चर आयोगाची अंमलबजावणी करणार असल्याचे या जाहीरनाम्यात वचन देण्यात आले आहे.

यावेळी लक्ष्मण माने म्हणाले, शिक्षण मोफत देणे हे सरकारचे काम आहे. आम्ही १२ टक्के बजेटची रक्कम शिक्षणावर खर्च करू. डोनेशन बंद करून प्रायव्हेट शाळांना शासनाच्या ग्रँटमध्ये आणणार. तसेच देशात एकाच प्रकारचा अभ्यासक्रम आम्ही लागू करू. आरबीआय व इतर स्वायत्त संस्थांमध्ये हस्तक्षेप करणार नाही. शेतकऱ्यांना वर्षातून दोनदा ६ हजार रुपयांची सबसिडी आम्ही देऊ. तसेच आरएसएस ही भारतीय संविधान, भारतीय ध्वज, राष्ट्रगीत मानत नाही. आरएसएसला संविधानाच्या चौकटीत आणून त्यांना हे मान्य करायला लावू.

# ऊर्मिला मातोंडकर: अभिनयाकडून राजकारणात

प्रतिनिधी



**बॉलिवूडमधील** एक अत्यंत बुद्धिमान अभिनेत्री असं जिचं वर्णन एकेकाळी चित्रपट समीक्षक करीत असत, ती अभिनेत्री ऊर्मिला मातोंडकर नुकतीच राजकारणात आलीय. २७ मार्च २०१९ रोजी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर तिला १७ व्या लोकसभेसाठी होऊ घातलेल्या निवडणुकीत काँग्रेसने उभे केले आहे. उत्तर मुंबई मतदारसंघातून ती निवडणूक लढवत आहे. आपण केवळ निवडणुकीत उतरण्यासाठी काँग्रेसमध्ये प्रवेश केलेला नाही तर पक्षाच्या विचारधारेमुळे आपण काँग्रेसकडे आकर्षित झाल्याचे ती सांगते. भारतीय चित्रपट अभिनेत्री, टेलिव्हिजन कलावंत आणि राजकारणी अशी तिची ओळख असली तरी तिला हिंदीबरोबरच मल्याळम, मराठी, तामिळ आणि तेलुगू या भाषांमधील चित्रपटांतील कामामुळे प्रामुख्याने ती ओळखली जाते. ४ फेब्रुवारी १९७४ रोजी मुंबईत एका मराठी कुटुंबात जन्मलेली ऊर्मिला ही पुणे विद्यापीठाची तत्वज्ञान विषयातील पदवीधर आहे. ती एक चांगली जलतरणपटूही आहे. झाकोळ या मराठी चित्रपटात बालकलाकाराची भूमिका करून तिने १९८० मध्ये आपली चित्रपट कारकीर्द सुरू केली. वयाच्या ६ व्या वर्षी रूपेरी पडद्यावर झळकलेल्या या अभिनेत्रीने मराठी, मल्याळम, तेलुगू, हिंदी अशा विविध भाषांमधील ६३ चित्रपटांमध्ये काम केले. १९८१ मध्ये झळकलेला कलयुग हा तिचा पहिला हिंदी चित्रपट. मासूम (१९८३) मधील भूमिकेमुळे तिला लोक चांगले ओळखू लागले. तेव्हापासून तिला काही चित्रपटात बालकलाकाराची भूमिका करण्याची संधी मिळाली. १९८९ मध्ये आलेला मल्याळम भाषेतील चाणक्य हा मध्यवर्ती भूमिका असलेला तिचा पहिला चित्रपट. त्यानंतर तिने अभिनय कारकीर्दीत पूर्णवेळ काम सुरू केले. तिची मुख्य भूमिका असलेला नरसिम्हा (१९९१) हा चित्रपट हिट ठरला. तिची नंतरची काही वर्षे अशीच गेली. १९९५ हे वर्ष मात्र तिच्या आयुष्याला कलाटणी देणारे वर्ष ठरले. राम गोपाल वर्मा यांच्या रंगीला या रोमॅन्टिक चित्रपटात तिला मुख्य अभिनेत्रीची भूमिका मिळाली. त्या चित्रपटाने तिला प्रचंड यश मिळवून दिले. पुढे जुदाई (१९९७), गुन्हेगारी पार्श्वभूमीचा थरारपट सत्या (१९९८), रोमॅन्टिक कॉमेडी असलेला खूबसुरत (१९९९), जंगल (२०००) आणि २००२ मध्ये आलेल्या मानसिक प्रणयावर बेतलेला दिवानगी आदी चित्रपटांमधील ऊर्मिलाच्या भूमिकांचं व्यापक प्रमाणात कौतुक झालं. तमिळ आणि तेलुगू चित्रपटांनीही तिला यश मिळवून दिलं. थरारपट कौन (१९९९) मधील एक सिरियल किलर, प्यार तुने क्या किया (२००१) मधील एक प्रेयसी, भूत या रामगोपाल वर्मा यांच्या दुसऱ्या थरारपटातील एक महिला अशा विविध भूमिकांमुळे तिचं चित्रपटसृष्टीत चांगलंच नाव झालेलं होतं. त्यानंतर तिने तहेजीब (२००३), पिंजर (२००३), नैना (२००५), मैने गांधी को नही मारा (२००५), बस एक पल (२००६) आणि २०१४ मधील आजोबा या मराठी चित्रपटांसह काही आर्ट-हाऊस प्रकल्पांसाठी स्वतंत्रपणे चित्रपट निर्मात्यांसमवेत करार केले.

**पडद्याच्या बाहेरही काम :** अभिनयाबरोबरच मातोंडकरने काही स्टेज शो आणि चॅनेलवरील पुरस्कार वितरण सोहळ्यांमध्येही सहभाग घेतलेला आहे. २००७ मध्ये आलेल्या आशा ॲण्ड फ्रेन्डस भाग - १ या आशा भोसले यांच्या अल्बमसाठी तिने आवाज दिला आहे. यामध्ये 'महेबुबा दिलरूबा' हे गीत तिने आशा भोसले यांच्यासोबत गायले आहे. त्यानंतर सोनी एंटरटेन्मेंट्सच्या 'झलक दिखला जा' या डान्स रिॲलिटी शोच्या दुसऱ्या भागासाठी जज म्हणून तिने काम पाहिले. सोबत जितेंद्र आणि शियामक दावर हेही जज होते. मी या शोचा जज बनण्यास सक्षम होते, याचा मला खूप आनंद झाला होता. स्पर्धक आणि प्रेक्षकांसमोर मी पहिल्यांदाच गेले. तिथे ना लिखित ओळी होत्या ना दुसरी संधी होती. तुम्ही ते काम केलेलं असेल किंवा नसेल. ही संकल्पना मला आवडली, अशा शब्दात ऊर्मिला मातोंडकरने 'झलक दिख ला जा' मधील अनुभवाबद्दल सांगितलं.

**चित्रपट सृष्टीतील यशस्वीतेनंतर अभिनेत्री ऊर्मिला मातोंडकर हिने नुकतेच राजकारणात पाऊल टाकलेय. अर्थात, लोकसभा निवडणुकीनेच तिच्या राजकारण प्रवेशाला सुरुवात झाली आहे. ज्या मतदारसंघातून काँग्रेसने पाच वेळा बाजी मारली आणि गोविंदासारख्या हरहुन्नरी कलाकारानेही याच पक्षातर्फे भाजपच्या एका मोठ्या नेत्याला पराभूत केले, त्या उत्तर मुंबई मतदारसंघाकडे लोकांचे लक्ष लागले आहे. इथं ऊर्मिला मातोंडकरचा सामना भाजपच्या गोपाळ शेट्टी यांच्याशी आहे. ऊर्मिलाने अनेक मोठ्या बॅनरच्या आणि स्वतंत्र चित्रपटातही काम केले. दिग्दर्शक राम गोपाल वर्मा यांच्याशी सहकार्य प्रस्थापित केल्यानंतर तर तिला मोठा चाहता वर्ग लाभला. ९० च्या दशकात स्वतःला बॉलिवूडची 'सेक्स सिम्बॉल' म्हणून प्रस्थापित केलेल्या या अभिनेत्रीने अनेक चित्रपटांमध्ये बोल्ड आणि वादग्रस्त भूमिका करून एक नवीन ट्रेंड निर्माण केला. तिचं स्टायलिश फॅशनविषयीचं ज्ञान आणि नृत्य कौशल्यामुळे तिला खूप प्रसिद्धी मिळाली. या अष्टपैलू अभिनेत्रीने आव्हानात्मक भूमिका करून बॉलिवूडच्या अभिनेत्रींमध्ये स्वतःचं एक वेगळं स्थान निर्माण केलं. चित्रपटांव्यतिरिक्त विविध संस्थांच्या माध्यमातून महिला आणि मुलांसाठी तिने काम केले आहे. संसदीय निवडणुकीने तिच्या राजकीय कारकीर्दीला प्रारंभ होत आहे. तिच्या आयुष्यातील ही दुसरी इनिंग यशस्वी होईल, असा तिला विश्वास आहे.**

२००८ मध्ये तिने 'वार परिवार' हा गाण्याचा सोनी टीव्हीवरील रिॲलिटी शो सादर केला. २०११ मध्ये तिने 'कलर्स'च्या 'चक धूम धूम' या डान्स रिॲलिटी शोमध्येही जावेद जाफरी आणि टिरेन्स लेविस यांच्यासोबत जज म्हणून काम केले. २००२ मध्ये झी मराठीवरील 'डान्स महाराष्ट्र डान्स'साठी ती परीक्षक होती.

चित्रपट क्षेत्रात कार्यरत असतानाच तिने विविध धर्मादाय संस्थांच्या कार्यक्रमात सहभाग नोंदवला आणि विशेष करून महिलांच्या उपक्रमांना पाठिंबा दिला. भारतात मुलींना अधिकार प्रदान करण्यासाठी कार्यरत असलेल्या अंगेली फाऊंडेशनच्या लंडन येथील कार्यक्रमातही २०१३ मध्ये ती सहभागी झाली होती.

काश्मिरमधील उद्योगपती आणि मॉडेल मोहसिन अख्तर मीर याच्यासोबत ती ३ मार्च २०१६ रोजी एका साध्या समारंभात विवाहबद्ध झाली. ममता मातोंडकर नावाची तिची थोरली बहीणही अभिनेत्री राहिलेली आहे. पूजा नावाची आणखी एक बहीण तिला आहे. तिचा मोठा भाऊ केदार याने भारतीय हवाई दलात एअरक्राफ्ट मेंटेनन्स टेक्निशियन म्हणून काम केले आहे.

**हिंदुत्वावर विश्वास आणि आदरही :** काँग्रेसमध्ये प्रवेश करून ऊर्मिला उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवत आहे. भाजपाचे ज्येष्ठ नेते, विद्यमान खासदार गोपाळ शेट्टी यांच्याशी तिची लढत आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विरोधकांकडून होणाऱ्या टीकेला ती समर्थपणे उत्तर देत आहे. हिंदुत्वाबद्दलच्या कथित वक्तव्यावरून केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने ती म्हणते की, मला हिंदुत्वात विश्वास आणि आदरही आहे. अभिनयाबरोबरच सामाजिक क्षेत्रातही माझं काम आहे. मी राजकारणात नवखी असले तरी ज्या पक्षातर्फे मी निवडणूक लढवत आहे, तो काँग्रेस पक्ष ५४ वर्षे केंद्रात सत्तेत होता. बलिदानाची परंपरा असलेल्या या पक्षाने राष्ट्रउभारणीत भरीव योगदान दिलेले आहे. त्यामुळे लोकसभेत उत्तर मुंबई मतदारसंघाचे काँग्रेसतर्फे प्रतिनिधीत्व करण्याची संधी जनता देईल, असा विश्वास ऊर्मिला मातोंडकर व्यक्त करते. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना आदर्श मानणारी ऊर्मिला म्हणते की, माझ्या उमेदवारीने जुन्या कार्यकर्त्यांवर अन्याय झालेला नाही, उलट त्यांच्यामध्ये जोश आहे.

**दहा पुरस्कार, ३६ साठी नामांकन :** गुणी अभिनेत्री ऊर्मिला मातोंडकर हिने जवळपास ६३ चित्रपटांमध्ये काम केले असून दूरचित्रवाणी वाहिन्यांवरील एकूण नऊ मालिका/टॅलेंट शोमध्ये काम केले आहे. विविध चित्रपटांमधील उत्कृष्ट भूमिकांबद्दल तिला राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरील १० पुरस्कार मिळाले तर ३६ पुरस्कारांसाठी तिला नामांकन मिळाले. बॉलिवूडमधील कलावंतांना त्यांच्या व्यावसायिक उत्कृष्टतेसाठी बॉलिवूड फिल्म इंडस्ट्रीतर्फे दि एशिया फिल्म कॅफे ॲवॉर्ड दिले जातात. या ॲवॉर्डसाठी नामांकन तिला मिळाळे होते. 'प्यार तुने क्या किया', 'मैने गांधी को नही मारा' या चित्रपटांतील भूमिकाबद्दल ऊर्मिलाला बॉलिवूड मूव्ही ॲवॉर्ड मिळाले. भूत चित्रपटातील आघाडीच्या भूमिकेत 'उत्कृष्ट अभिनेत्री' वठवल्याबद्दल अप्सरा फिल्म ॲण्ड टेलिव्हिजन प्रोड्यूसर्स गिल्ड ॲवॉर्डस तर याच चित्रपटासाठी उत्कृष्ट अभिनेत्रीचे बॉलीवूड मुव्ही ॲवॉर्ड तिला मिळाले. 'भूत' साठी तिला फिल्मफेअर, स्टार स्क्रीन आणि झी सिने ॲवॉर्डदेखील प्राप्त झाले. एक हसिना थी, पिंजर, मैने गांधी को नही मारा, रंगिला, जुदाई, सत्या, प्यार तुने क्या किया, एक ही कर्ज, जंगल, नैना, बस एक पल आदी चित्रपटांकरिता विविध पुरस्कारांची नामांकनं तिला मिळालेली आहेत. बॉलिवूडमधील विशेष कामगिरीबद्दल तिला राजीव गांधी स्मृती पुरस्कारानेही गौरविण्यात आले आहे. ●●●

# श्रमिकांचे जग : काल, आज आणि उद्या



डॉ. मिलिंद कसबे

आज भारतच नव्हे, तर जगभरातल्या श्रमिकांच्या चळवळी विकलांग झाल्या आहेत. त्यांना नवी ऊर्जा देण्यासाठी भांडवलशाहीच्या विरोधी नवा विचारी लढा उभा करावा लागणार आहे. असा आशावाद घेऊन उत्तम कांबळे यांनी २०१२ साली 'श्रमिकांचे जग : काल, आज आणि उद्या' हा ग्रंथ संपादित केला आहे.

'श्रमिकांचे जग : काल, आज आणि उद्या' हा उत्तम कांबळे यांनी संपादित केलेला ग्रंथ जागतिकीकरणात श्रमिकांच्या प्रश्नांची सर्वांगीण चर्चा करणारा आहे. श्रमिकांच्या लढ्यासाठी डाव्या चळवळीत सक्रिय राहून आयुष्य समर्पित केलेले क्रियाशील कार्यकर्ते शिवाजी लांडे यांना हा ग्रंथ अर्पण केला असून, तो उद्याच्या कार्यकर्त्यांना प्रेरणादायी ठरावा असा आहे.

श्रमिकांचे प्रश्न आज राहिलेत का? त्यांच्या चळवळी का विकलांग झाल्या? जागतिकीकरणात चेहरा हरवलेल्या चळवळीला नवे बळ देण्यासाठी, वेगवेगळ्या माध्यमांतून या चळवळींचा क्रांतिकारी इतिहास मांडून तिला नवे वैचारिक बळ प्राप्त होईल, अशी दिशादर्शक प्रस्तावना उत्तम कांबळे यांनी लिहिली आहे. उत्तम कांबळे यांची प्रस्तावना हे या ग्रंथाचे बलस्थान आहे.

भांडवलशाहीने नवे वर्ग तयार केले. श्रमिकांमध्ये भेदाभेद केला. खाजगीकरणाने ग्रामीण भागातल्या साधनसंपत्तीची लूट केली. आधुनिक जीवनशैलीला भुलणारा नवा मध्यमवर्ग तयार झाला. या मध्यमवर्गाला भुलविणाऱ्या अनेक गोष्टी भांडवलशाहीने उभ्या केल्या. १९९२ नंतर आपल्या देशात जागतिकीकरण आणि खाजगीकरण रुजवण्याचा आणि त्यासाठी उदारीकरण राबविण्याचा प्रयत्न सुरू झाला. भांडवलशाहीला सारे रान मोकळे झाले, त्यामुळे एकीकडे भांडवलदारांचा मोठ्या प्रमाणात फायदा झाला आणि दुसरीकडे श्रमिकांमध्ये फाटाफूट करण्याची, त्यांना अस्तित्वहीन करण्याची संधी व्यवस्थेला मिळाली. आज भारतच नव्हे, तर जगभरातल्या श्रमिकांच्या चळवळी विकलांग झाल्या आहेत. त्यांना नवी ऊर्जा देण्यासाठी भांडवलशाहीच्या विरोधी नवा विचारी लढा उभा करावा लागणार आहे, असा अशावाद घेऊन हा ग्रंथ प्रकाशित झाला आहे.

या ग्रंथात कुमार शिराळकर, डॉ. भारत पाटणकर, प्रा. उदय नारकर, दत्ता देसाई, कॉ. गोविंद पानसरे, प्रा. डॉ. सुखदेव थोरात, भीमराव सरवदे, प्रा. जयदेव डोळे, विनया मालती हरी, उद्धव कांबळे, कॉ. भालचंद्र कांगो, प्रा. डॉ. विजय खरे, डॉ. आनंद तेलतुंबडे या विचारवंत व कार्यकर्त्यांनी लेखन केले आहे. गेल्या दहा वर्षांत जागतिकीकरणाच्या आगमनाची, त्याच्या परिणामांची उलट-सुलट चर्चा झाली. भांडवलशाहीच्या समर्थकांनी त्याची उपयोगिता मांडली तर प्रागतिक चळवळींनी त्याला विरोध केला. पण जागतिकीकरणाचे वेगवेगळ्या घटकांवर कसे परिणाम झाले, हे स्पष्ट करणारी चर्चा मात्र झाली नाही. या ग्रंथाने ही चर्चा अधिक गतिमान केली आहे. जागतिकीकरणाच्या विळख्यात सर्वांत मोठ्या प्रमाणावर भरडला गेलेला वर्ग म्हणजे श्रमिक. श्रमिकांच्या चळवळींचा क्रांतिकारी इतिहास या ग्रंथात अधोरेखित झाला आहेच; पण या चळवळी विकलांग करण्यासाठी भांडवलशाहीने कोणकोणते फंडे उभे केले याची अत्यंत समर्पक चर्चा या ग्रंथाने केली आहे. दलित, श्रमिक, आदिवासी आणि शोषितांच्या चळवळीत सामील होऊन रस्त्यावर आलेल्या प्रत्येक कार्यकर्त्यांसाठी हा ग्रंथ मार्गदर्शक ठरेल, यात शंका नाही.

गेली तीस वर्षे भूमिहीन व आदिवासी चळवळीत सक्रिय असणारे कुमार शिराळकर यांनी 'श्रमिकांच्या चळवळी : काल, आज आणि उद्या' या लेखात आपले अनुभव मांडले आहेत. धुळे, सातपुडा आणि शहादा तालुक्यांतील आदिवासी चळवळी कशा उभ्या राहिल्या? तिथल्या शेतमजुरांचे प्रश्न कोणते होते आणि आपल्या देशातल्या बहुराष्ट्रीय कंपन्या व देशी लूटखोर भांडवलदारांनी खाणी, जंगले व नैसर्गिक संसाधनांवर कशी झडप घातली, याची चर्चा शिराळकरांनी केली आहे. शिराळकरांच्या मते, साम्राज्यवादी जागतिकीकरण व नवउदारवाद यांनी घेरलेल्या भांडवलशाहीच्या आजच्या नव्या युगात वित्त भांडवलाचा निर्घृण वरवंटा जगातल्या सर्व कष्टकरी जनतेवर सरसकट फिरत आहे. श्रमिक माणसांचे आणि निसर्गाचे असे दुहेरी शोषण करत आहे. कुमार शिराळकर यांनी आपल्या लेखात कामगार, शेतमजूर, शेतकरी, कारागीर, श्रमिक यांच्या प्रश्नांचा व त्यासाठी सुरू झालेल्या आंदोलनांचा परामर्श घेतला आहेच, पण त्याचबरोबर दलित, आदिवासी, भटके-विमुक्त, महिला, अल्पसंख्याक अशा समूह घटकांचे विशेष प्रश्न घेऊन अस्पृश्यता, जातिभेद, स्त्री-पुरुष विषमता, अंधश्रद्धा, धर्माधारित द्वेष या सर्वांचा परामर्श शिराळकरांनी घेतला आहे.


विस्थापितांच्या चळवळीचे ज्येष्ठ नेते डॉ. भारत पाटणकर यांनी आशावादी मनाने 'शोषणमुक्त श्रमिकांच्या समाजाचे स्वप्नं' मांडले आहे. हे नवे स्वप्नं पाहून त्याच्या समीक्षेतून नवा पर्याय साकारणार आहे, पण त्यासाठी विचारांचा पाया अधिक मजबूत हवा. जुन्या स्वप्नांच्या आधारे नव्या परिस्थितीला भिडता येणार नाही. त्यासाठी प्रस्थापित शोषणव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांमध्ये

श्रमिक जनता आणि तिच्या सर्व विभागांना मुक्त करण्याच्या दिशेने नेण्यासाठी पर्याय देऊनच संघर्ष करावे लागतील. त्यासाठी मानवमुक्तीचे स्वप्नं साकारायला निघालेल्या माणसाची चळवळ म्हणून ही प्रक्रिया उभी करायला हवी, असा आशावाद पाटणकरांनी मांडला आहे.

कम्युनिस्ट पार्टीचे नेते प्रा. उदय नारकर यांनी जगभरातल्या कामगार चळवळींचा वेध या ग्रंथात घेतला आहे. नव्या क्रांतीची प्रक्रिया सुरू करण्यासाठी इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यावर कामगारांच्या संघटनेला, त्यांच्या क्रांतिकारक राजकीय पक्षाला आपली व्यूहरचना आखावी लागेल, त्यामुळे वर्गलढ्याचा पुढचा टप्पा केव्हाही उद्‌भवू शकतो. तो आल्यानंतर जमवाजमव करण्यापेक्षा आजच त्याची तयारी करायला हवी, अशी मांडणी नारकर यांनी केली आहे. या ग्रंथात दत्ता देसाई यांनीही कामगार चळवळी विकलांग का होत गेल्या, याची चर्चा केली आहे. त्यांच्या मते, श्रमणाऱ्या 'दृश्य हातांना' बाजारपेठेचा 'अदृश्य हात' जागतिकीकरणाच्या आवर्तात अदृश्य करण्याच्या प्रयत्नात आहे आणि त्यामागे अर्थातच आताचे विशिष्ट अर्थराजकारण कार्यरत आहे. तसेच जागतिकीकरणात सर्वच क्षेत्रांत महिलांचे खच्चीकरण कसे होत आहे, याविषयी अभ्यासपूर्ण मांडणी विनया मालती हरी यांनी केली आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते व विचारवंत कॉ. गोविंद पानसरे यांची प्रा. भास्कर ढोके यांनी घेतलेली मुलाखत या ग्रंथाचा गाभा आहे. जागतिकीकरणात श्रमिकांची, कामगारांची व त्यांच्या चळवळींची अवस्था कशी असेल, या प्रश्नांवर कॉ. पानसरेंनी दिलेले उत्तर महत्त्वाचे आहे. ते म्हणतात, 'तत्त्वज्ञान आणि तंत्रज्ञान' या भिन्न गोष्टी आहेत. अणूचा वापर जग उद्ध्वस्त करण्यासाठी करायचा की मानवी कल्याणासाठी, हा तंत्रज्ञानाचा नव्हे, तर तत्त्वज्ञानाचा प्रश्न आहे. म्हणून तंत्रज्ञान कधी तत्त्वज्ञानाची जागा घेऊ शकणार नाही.

या ग्रंथात डाव्या चळवळीतील विचारवंत, कार्यकर्त्यांनी लिहिले आहे, तसेच त्यात प्रा. डॉ. सुखदेव थोरात, उद्धव कांबळे, प्रा. जयदेव डोळे आणि प्रा. डॉ. विजय खरे यांसारख्या संशोधक विचारवंतांच्या लेखामुळे या ग्रंथाचे संदर्भमूल्य अधिक वाढले आहे. दलितांचे प्रश्न हा सुखदेव थोरातांच्या चिंतनाचा विषय आहे. याशिवाय या ग्रंथात त्यांनी दलित मजुराची घुसमट सप्रमाण मांडली आहे. आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक भीमराव सरवदे यांच्या मते, नवे आर्थिक धोरण, दलित आणि कामगार संघटनांना आव्हान ठरत आहे. त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कामगार धोरण समजून घेऊन मागासवर्गीय कामगारांनी राजकीय चळवळीत आपले अस्तित्व शोधायला हवे. त्यासाठी कामगार चळवळीच्या नेत्यांनी आत्मटीकेला सामोरे जाऊन राजकीय विचारधारा स्वीकारायला हवी. असे झाले तर मागासवर्गीयांनी गेल्या पन्नास वर्षांत उभी केलेली संघटनशक्ती वैफल्यग्रस्त होईल आणि साऱ्याच धर्मांधशक्ती तिच्याकडे उपहासाने पाहतील, असे सरवदे यांनी सूचित केले आहे.

संरक्षणशास्त्राचे अभ्यासक डॉ. विजय खरे यांचा 'नवे जग,




नवी बेकारी, नवी आव्हाने' हा लेख अभ्यासकांनी जरूर वाचावा. या लेखात त्यांनी भारतीय कामगार चळवळीची स्थिती मांडून जगभरातल्या युवक बेरोजगारांची आकडेवारी दिली आहे. डॉ. खरे यांच्या मते वेगवेगळ्या देशांत नव्याने तयार होत असलेली बेकारी हेच महाभयंकर आव्हान ठरणार आहे. याशिवाय ज्येष्ठ पत्रकार जयदेव डोळे यांच्या 'माध्यमांतील श्रमिकांचे अस्थिर जग' हा लेख प्रसारमाध्यमांची नीतिमत्ता उघड करणारा आहे. जयदेव डोळे यांनी त्यांच्या खास उपरोधिक शैलीत माध्यमे ताब्यात घेणारा राज्यकर्ता वर्ग आणि भांडवलदार मालक पत्रकारितेची प्रतिष्ठा कशी संपवत आहेत, यावर परखडपणे मते मांडली आहेत.

या ग्रंथाचे अजून एक बलस्थान म्हणजे साहित्य आणि समाजशास्त्राचे अभ्यासक, सेवानिवृत्त आयपीएस अधिकारी उद्धव कांबळे यांचा 'श्रमिकांची पीछेहाट : कारणे कोणती व उपाय काय?' हा लेख जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या संस्थांनी जगभरातल्या कामगारांची कशी वाट लावली, यातून बेकारी वाढली, जागतिक स्तरावर संगणकाने कामगारांच्या शोषणात कशी वाढ केली. शासनाच्या कामगारविरोधी धोरणामुळे आणि एनजीओंच्या माध्यमांतून कामगारांचे विघटन कसे झाले याविषयी अत्यंत अभ्यासपूर्ण मांडणी कांबळे यांनी केली आहे. या लेखाच्या शेवटी त्यांनी श्रमिकांच्या चळवळी गतिमान होण्यासाठी सुचविलेले उपाय म्हणजे या ग्रंथाचा सारांश आहे.

आशयगर्भ मुखपृष्ठ, संवादी रेखाटने, आकर्षक छपाई यामुळे हा ग्रंथ अधिक आकर्षक झाला आहे. त्यासाठी या ग्रंथाचे संपादक उत्तम कांबळे, चित्रकार धनंजय गोवर्धने आणि लोकवाङ्मय गृह या प्रकाशन संस्थेचे अभिनंदन करायला हवे. ●●●

**साभार : श्रमिकांचे जग : काल, आज आणि उद्या.**
**संपादक : उत्तम कांबळे**
**लोकवाङ्मय गृह – २००२. पृष्ठ क्रमांक–२६३, किंमत ४८०**

पंक्चरवाला

# जाहीरनामे म्हणजे एक भ्रमच!




भारतात निवडणुकीत प्रसिद्ध होणारे विविध पक्षांचे प्रसिद्ध होणारे जाहीरनामे हे जगातील सर्वांत अधिक चकाकणारे जाहीरनामे असतात हे कोणीही मान्य करेल आणि अर्थात हेही मान्य करेल की, जे जे चकाकतं ते सारंच काही सोनं असत नाही. मुळात भारतासारख्या प्रचंड मोठ्या लोकसंख्येच्या देशात बहुसंख्य नागरिकांना जाहीरनामे कशाला म्हणतात हेच ठाऊक असत नाही आणि ज्यांना थोडेफार ठाऊक असतं, त्यांच्यापर्यंत जाहीरनामे पोहोचत नाहीत आणि गंमत म्हणजे पोहोचले तरी कळत नाहीत. आणखी गंमत म्हणजे समजले तरी जाहीरनामे राबवण्याची सक्ती राजकीय पक्षांवर असत नाही आणि समजा असली तरी ते राबवण्याची क्षमता सरकारमध्ये असत नाही. सरकार टेकडीवर असतं आणि जाहीरनाम्यात पर्वत देण्याचं आश्वासन असतं. सरकारच्या हातात पाण्याची बाटली असते आणि नद्या जोडण्याचं, समुद्र मालकीचा करण्याचं आश्वासन असतं. सरकार कुंडीतल्या रोपाच्या सावलीत बसलेलं असतं आणि समृद्ध जंगलाचं आश्वासन दिलेलं असतं. आहे की नाही गंमत! तर आपले जाहीरनामे म्हणजे निवडणुकीतला ताणतणाव कमी करण्याची असते एक गंमत. करमुक्त किंवा मोफतचं मनोरंजन! ते केव्हा येतात आणि स्वच्छ भारत अभियानांतर्गत कोणत्या घंटागाडीत जातात हे रस्त्यावर बसून ट्यूब-टायर फुगवणाऱ्या पंक्चरवाल्यालाही कधी कळलं नाही. जाहीरनामे म्हणजे मतदारांना भ्रमात टाकण्यासाठी करावयाचा एक उपचार असतो. तसं तर लोकशाहीत जाहीरनाम्याला खूप महत्त्व असतं. लोकांच्या अपेक्षांचं आणि समाज, देश लोक कुठं घेऊन जाणार याचं प्रतिबिंब असतं. पण एवढं गांभीर्यानं घेतोय कोण भाऊ? प्रत्येकाला मत गोळा करण्याची घाई झालेली असते. उपचार उरकण्याची घाई झालेली असते. कोणी शहाण्यानं अभ्यास केला तर सहज कळेल की, ५२ नंतर किती आश्वासनांचे महापूर येऊन गेले आणि त्यातील काय काय किनाऱ्याला लागलं हे कोणाच्याही बापाला कळणार नाही. जर कुणी तसा दावा केला तर त्याला 'पीपल्स पोस्ट'चा एक अंक भेट दिला जाईल. आपल्या देशात लोकांची, देवांची, जातींची आणि कधीही फळाला न येणाऱ्या आश्वासनांची संख्या किती हे संगणकात अडकलेल्या गुगल साहेबालाही सांगता येणार नाही. काय बिशाद आहे त्याची की इथला माणूस किती आश्वासनं घेऊन जगतोय याचा शोध घेण्याची! होय की नाही भाऊ! या आश्वासनांपैकी पाच टक्के जरी फळाला आली असती तर भारत अमेरिकेच्या हॅटवर जाऊन बसला असता. थाळी घेऊन गोऱ्या साहेबाकडं कधी भीक मागायला गेला नसता. 'सब का साथ, सब का विकास' या घोषणेला कधीच नववा महिना लागला असता. भारतातल्या लोकांचं एक बरं आहे की त्यांना भ्रमात, स्वप्नात, नसलेल्या स्वर्गात, अवतारात, पुनर्जन्मात जगण्याची सवय आहे; अन्यथा काही खरं नसतं. त्यांनी चौकाचौकात या जाहीरनाम्यांची धिंड काढली असती; पण एवढं आलंय कुठं आपल्याकडं? मतदानासाठी वाहन पाठवून द्या, कडकनाथाची एखादी तंगडी पाठवून द्या, सरकारनं जनसेवेसाठी काढलेली देशी पाठवून द्या, असं अनेक मतदार म्हणालेच नसते. ज्या दिवशी या तंगडीवाल्यांना देश माझा, संपत्ती माझी.. एकट्या अंबानीची नव्हे, राष्ट्रभक्ती माझी.. एकट्या 'आरएसएस'ची नव्हे, सरकारचा मालक मी असं वाटायला लागेल त्या दिवशी फळणारे जाहीरनामे प्रसिद्ध होतील. आपल्या जाहीरनाम्यात जेवढी लोकप्रियता, अनुनय, चकवा देण्याची क्षमता असते तेवढी जगात कुठंच नसते. कल्याणकारी राष्ट्राचा अर्थ राजकारण्यांनी चुकीचा घेतलाय. आपलं सरकार सत्तेवर आल्यावर लोकांना आधारकार्डावर लंगोट्या मिळतील. थाळ्या मिळतील, सुखडी मिळेल. गरोदर स्त्रियांना सत्त्वयुक्त आहार मिळेल, सायकल मिळेल, तिच्यात हवा भरायला पंप मिळेल, पुस्तक मिळेल. त्याला कव्हर घालायला कागद मिळेल. पेन्शन मिळेल. निर्वाह भत्ता मिळेल. धान्य मिळेल. औषध मिळेल. पंतप्रधानांच्या नावानं मोफत शस्त्रक्रिया होईल. कुणा संघवाल्याच्या नावानं अजून काय तरी मिळेल. बाबासाहेबांच्या नावानं झोपडं, गांधींच्या नावानं टिकाव आणि नेहरूंच्या नावानं फावडं मिळेल. आता हे सारं द्यावं लागतं; कारण लोक गरीब आहेत आणि लोक गरीब का आहेत तर संपत्ती आणि संधीचं केंद्रीकरण झालंय. ते का झालंय तर भांडवलशाहीनं शड्डू ठोकायला सुरुवात केलीय. तिनं तसं का केलं तर गरिबांची जगण्याची, आत्मसन्मानाची, मनगट हलवण्याची साधनं कमी झाली आहेत. त्यांना घाम गाळण्यासाठीही काम नाही आणि मिळालं तर ते हंगामी आहे. अशा परिस्थितीत दारिद्र्याची रेषा वरवर जाते. भूक, बेकारी, अनारोग्य यांचा मुका घ्यावा अशी स्थिती तयार होते. हे सारं थांबवून मते ढापायची असतील तर खायच्या आणि हगायच्या घोषणा कराव्या लागतात. देवाधर्माच्या नावानं हे सारं आबाळपण सहन करण्याची क्षमता निर्माण करावी लागते. लोकांना पागल बनवावं लागते. आम्ही फूटपाथवर राहू पण आमच्या देवाला घर

आणि त्याला सोन्याचं अंगडं द्या, असे लोकच म्हणतील अशी परिस्थिती निर्माण करावी लागते. देश जगवायचा कसा आणि देशातील लोकांचा आत्मसन्मान वाढवायचा कसा यावर पेन्शन, निर्वाह भत्ता आणि हगायची मोफत सोय हे काही उत्तर नाही. त्यामुळे लोक  द पीपल्स पोस्ट पाक्षिक द पीपल्स पोस्ट पाक्षिक ५ आणखी दुबळे, आणखी गरीब, आणखी निष्क्रिय बनतील. जन्माला आलेल्या प्रत्येकाला उच्च दर्जाचं मोफत शिक्षण द्या, शिकलेल्या प्रत्येकाला सन्मानानं काम द्या, सन्मानानं श्रममूल्य द्या, त्याचा घाम वाया जाणार नाही, त्याची श्रमशक्ती कुजून जाणार नाही याची घटनात्मक व्यवस्था करा. लोक काहीतरी सतत मागत राहतील यापेक्षा ते देणारेही होतील अशा एका व्यवस्थेचं स्वप्न द्या. त्याऐवजी टी.व्ही. मोफत, मोबाईल मोफत, तांदूळ मोफत अशा भंपक आश्वासनांच्या सापळ्यात लोकांना अडकवू नका. कोणताही समाज मनिऑर्डर पाठवून जगवता येत नाही तर त्याच्या स्वनिर्मितीच्या क्षमता वाढवाव्या लागतात. जे गरजू आहेत त्यांना सक्षम होण्यासाठी जरूर मदत करायला हवी; पण कोणताही समाज आय.सी.यू.मध्ये नेऊन जगवता येत नसतो. सतत कुबड्या देऊन कोणताही समाज चालवता येत नसतो. धावणारे पुढारी आणि रांगणारे मतदार असं चित्र कोणत्याच देशाला, समाजाला परवडणारं नसतं. प्रचंड भ्रष्टाचार थोडा जरी रोखला, लोकांच्या जगण्याचा आणि त्यांना आत्मसन्मानी नागरिक बनवण्याचा थोडा जरी अभ्यास केला तरी वांझोटे जाहीरनामे काढण्याची गरज भासणार नाही. जाहीरनाम्याच्या कितीही चिकटपट्ट्या केल्या तरी कोणाला कायमस्वरूपी लज्जा रक्षण करता येणार नाही. टँकर पाठवून शेती समृद्ध करता येणार नाही तर जिवंत झऱ्याची विहीर खोदावी लागेल आणि तसं करायचं असंल तर कोणत्या कंपन्यांनी किती झरे आपल्या बाटल्यांत बंद केले आहेत ते आधी शोधून काढू असं जाहीरनाम्यात सांगितलं पाहिजे. भांडवलशाही आणि धर्माचे चमचे बनलेले लोक, भगव्यांना निवडणुकीच्या रिंगणात नाचवणारे लोक हे सारे करतील का, हा कळीचा मुद्दा आहे. आताच्या जाहीरनाम्यातही अशीच अन्नदानाची आणि तीर्थ वाटण्याची स्पर्धा आहे. एकजण मूठभर दान करणार असेल तर दुसरा सूपभर दान करण्याची घोषणा करतोय. एवढी सारी वैद्यकीय महाविद्यालये निघणार; पण ती गरिबांसाठी खुली असणार काय? उद्योजक, शेतकरी आणि गरीब यांना पेन्शन देऊन कसं जगवणार आणि त्यांचं आयुर्मान कसं वाढवणार याचं उत्तर कोणी देत नाही. बापाची मालमत्ता असल्याप्रमाणं किंवा म्हाताऱ्या आजीचा सोन्याचा हंडा सहजच सापडल्याप्रमाणं हे सारे दान करायला निघाले आहेत. माणसाचे श्वास नुसतेच टिकवून ठेवल्यानं त्याला चालता–धावता येत नाही. तसं समजणं म्हणजे आणखी भ्रम करणे आहे. सत्यसाईबाबाप्रमाणे हातातून सोन्याची अंगठी काढण्यासारखं आहे. अंगठी घेऊन धावता येत नाही तर प्रवास लवकर करण्यासाठी वाहने लागतात आणि सत्यसाईबाबा कधी हातातून रेल्वे, विमान काढू शकले नाहीत हाही इतिहास आहे. तात्पर्य जाहीरनामा धूळफेक नसतो तर लोक, समाज आणि देशबांधणीचं ते दस्तऐवज असतं. जाहीरनामा असाच असावा असा आग्रह जेव्हा लोकच धरतील तेव्हा हे शक्य आहे; अन्यथा पारावर उमेदवारांकडून मिळणाऱ्या गरम चहाचा कप पकडण्यासाठीच त्याचा उपयोग होईल.

## कुणाच्या खांद्यावर कुणाचं ओझं...



भारताच्या मध्ये असलेला मध्य प्रदेश नैतिकता, माणुसकी आणि लिंगभेदाच्या बाबतीतही मध्येच असल्याचं वारंवार दिसून येतं. गेली काही वर्षे भगव्याची सावली घेऊन तो अधिक मूलतत्त्ववादी झाला की काय, याबाबतच्या घटना अधूनमधून घडत असतात. अशीच एक घटना झाबुआ जिल्ह्यातील एका छोट्याशा मागास खेड्यात घडली आहे. जाती आणि तिच्या पंचायती आणि अजून किती क्रूर आहेत? त्या माणुसकीला, नैतिकतेला आपली टोकदार नखे आणि दाते कशी लावतात हे पुन्हा यावरून सिद्ध झालंय. महाराष्ट्रातही अशा घटना घडतात. इतरत्रही घडतात आणि इथली जात समता कशी कुरतडत असते, राज्यघटनेच्या विरोधात काम कशी करत असते हेही सांगत असतात. विशेषतः स्त्रीपुरुष संबंधांच्या आणि जातीच्या, वंशाच्या शुद्धतेच्या बाबतीत या जाती अधिक आक्रमक होतात. एका आदिवासी गावातील म्हणजे देवगड येथे भिल्ल समाजातील जातपंचायतीनं गंभीर प्रश्न निर्माण केला आहे. खरंच आपण धर्मनिरपेक्ष होणार की जातीचे बळी जात राहणार, हा तो प्रश्न आहे. एका विवाहित महिलेचं तिच्या इच्छेविरुद्ध लग्न झालं. अर्थात महिलांच्या इच्छांना व्यवस्था जुमानत नाही हा भाग वेगळा. आपण माणूस आहोत हेही सांगण्याचा अधिकार तिला नाहीय. लग्नाचा आणि जगण्याचा अधिकार तिला कुठला आलाय? तर या महिलेला तिच्या इच्छेविरुद्ध लग्न करावं लागलं. ज्याच्यावर तिचं प्रेम होतं त्याच्यापासून तिला दूर करण्यात आलं. लग्नानंतरही या महिलेच्या काळजातील प्रेमकथा संपली नव्हती. ती अधूनमधून आपल्या प्रियकराला भेटायची. ती गोष्ट तिच्या सासर– माहेरला कळली. त्यांनी ती जातपंचायतीत नेली. स्वतः ला परमेश्वर आणि नेते मानणाऱ्या पंचायतीनं एक अमानवी निर्णय घेतला. पत्नीनं आपल्या बोजड आणि वजनदार पतीला आपल्या

खांद्यावर घेऊन त्याला गावभर मिरवायचं. शिक्षेची अंमलबजावणी सुरू झाली. लाठ्याकाठ्या घेऊन पंच मिरवणुकीत आले. लोकांची गर्दीही झाली. मिरवणुकीला सुरुवात झाली. ही पत्नी खांद्यावर भलं मोठं ओझं घेऊन थकायची, चालताना अडखळून कोसळायची, घामाघूम व्हायची. रडायची. आक्रोश करायची. तसं घडलं की पंच आणि लोक आक्रमक व्हायचे. घे नवऱ्याला खांद्यावर, उचल त्याला असं म्हणत लाथाबुक्क्या हाणायचे. गर्दीही मारझोड करायची. पत्नी पतीला खांद्यावर घेऊन चालू लागली की गर्दी वाद्याच्या तालावर नाचायची. भाग धन्नू, चल धन्नू, उचल धन्नू असंच काही तरी म्हणत पत्नीला अमानवतेच्या कड्यावर न्यायची. लोकांनी या घटनेचं शूटिंग केलं. चॅटिंग केलं. अरे वा काय धमाल म्हणत एन्जॉय केलं. कुणीही या पत्नीच्या मदतीसाठी आलं नाही. ती प्रेम केल्याचा गुन्हा कबूल करत होती; पण ही शिक्षा मात्र तिला असहाय्य होत होती. ओझं घेऊन कोसळायची  द पीपल्स पोस्ट पाक्षिक ६ आणि कोसळली की मार खायची. खांद्यावरचा नवरा टाळ्या वाजवायचा. खांद्यावर बसूनच तो नाचायचा. माणुसकीचे एक थडगे उभारले जात होते आणि सारा समूह त्याचा साक्षीदार होऊन नाचत होता. पोलिसांपर्यंत ही गोष्ट गेली. नेहमीप्रमाणे तोंडपाठ केलेलं उत्तर आलं, 'गुन्हा नोंदवला आहे. तपास चालू आहे.' आणि समाज सगळा तर जाणीवपूर्वक षंड होऊन बसलाय. संवेदनाहीन होऊन बसलाय. ना कुठं निषेध, ना कुठं मोर्चे, ना कुठं अन्यायग्रस्तांचे अश्रू पुसण्यासाठी सरसावणारे हात दिसले. छोट्या पडद्यावर खालवर केलेले अंगठे वगळता समाजात काहीच घडलं नाही. अशा घटनांना विरोध न करणारा समाज स्वतःच्या थडग्यासाठी जागा शोधत असतो हे सांगायचं कुणी? पक्चरवाल्यानं...?

## बोलत का नाहीत मोदी...

निवडणुका म्हणजे राजकारणात कुळीमुळी शोधण्याचाही कार्यक्रम असतो. कोण कोणती धोरणे आखणार, कोण लोकांचे प्रबोधन करणार याऐवजी खासगी जीवनात घुसण्याची चढाओढ सुरू होते. मूळ निवडणूक बाजूला राहते आणि भलत्याच गोष्टीकडे निवडणूक वळते किंवा पळवलीही जाते. कुणाच्या गाडीत किती पैसे सापडले, किती बाटल्या सापडल्या, कुणाचं चारित्र्य कसं आहे, कोण अमली पदार्थ खातो, कोण कधी डान्सर होतं आदी गोष्टींवर चर्चा सुरू होते. पुढारी त्यासाठी भरपूर खतपाणी घालतात. लोक चवीनं ऐकतात. निवडणूक असते कशासाठी? लोकशाही बळकट करण्यासाठी की अशी लफडी ऐकण्यासाठी? पण आपल्या निवडणुकीत हे सातत्यानं घडत आलंय. कोण कोणत्या जातीचा, कुळातला, धर्मातला यावर चर्चा झडायला लागते आणि ती पंतप्रधानांच्या पत्नीपर्यंत पोहोचते. आपल्या नेत्याचं लग्न झालं की नाही आणि झालं असेल तर पत्नी कुठं आहे? जणूकाही हा राष्ट्राला भेडसावणारा सर्वांत ज्वलंत प्रश्न आहे असं समजून चर्चा सुरू झाली. रोज आपली छाती उघडून 'मन की बात' जबरदस्तीनं ऐकवणाऱ्या नेत्यानं या सर्व प्रश्नांची उत्तरे द्यायला पाहिजे होती.



खरं तर ती लोकांना माहीतच असलेली ही गोष्ट आहे. प्रश्न एवढाच की नेते मौन का पाळतात? ज्यांचा खानदानी व्यवसायच चहा विकण्याचा होता त्यांनी मी चहावाला पोऱ्या होतो असं सांगितलं. खरं तर याला काही अर्थ नाही. चहा विकणाऱ्या कुटुंबातील पोऱ्या काय आइस्क्रीम विकेल? आपण मागास आहोत हेही नेत्यानं मोकळेपणानं सांगितलं. एवढंच नव्हे तर मी मागास असल्यामुळे माझ्यावर टीका होतेय असंही सांगितलं. हे सारं बरं केलं पण आपण किती जणांच्या जाती उकरून काढल्या हे मात्र सांगायला ते विसरले. टीका करण्याचा आपल्यालाच अधिकार असतो असं नाही. लोकशाहीत तो तर सर्वांनाच असतो; पण भाजपवाल्यांची लोकशाही वेगळी आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य वेगळं आहे. ते काहीही टीका करू शकतात. राष्ट्रपित्याची रोज निंदानालस्ती करू शकतात; पण अशी टीका यांच्या नेत्यावर होते तेव्हा? तेव्हा धर्म आणि राष्ट्र संकटात येते. मोदींच्या पत्नीविषयी असेच सवालजबाब झडू लागले आहेत. पंतप्रधानपदाची शपथ घेण्यापूर्वी त्यांच्या पत्नीची मुलाखत सरकारी टी.व्ही.वर दाखवली होती. नंतरही एकदा-दोनदा त्या टी.व्ही.वर दिसल्या. त्यांचं मंगळसूत्र दिसले. पतीसाठी व्रतवैकल्ये करतो हेही त्यांनी सांगितले. एवढं सारं झाल्यानंतर गुजरातच्या माजी महिला मुख्यमंत्री म्हणाल्या की, मोदींनी लग्नच केलेलं नाहीय. देशसेवेसाठी त्यांनी आयुष्य वाहिलं आहे. तलवारीशी लगीन लागलं असं मराठी चित्रपटात एक गाणं आहे. शूर सरदारानं तलवारीशी लग्न लावलं. तसं यांनी देशभक्तीशी लावलं म्हणजे कोणत्या देशभक्तीशी हे कुणी सांगत नाही. मोदींनी देशभक्ती केली म्हणजे नेमकं काय केलं असा वस्तुनिष्ठ प्रश्न कुठल्या तरी स्पर्धा परीक्षेत विचारला गेला तर... अलीकडे सारेच जण सत्ता संपादनाला देशभक्ती समजत आहेत. त्यासाठी तो किती कष्ट घेतो याला देशभक्ती म्हणतात. विरोधी पक्षांनीही हा मुद्दा ऐरणीवर घेतला. देशासमोरचे प्रश्न, त्याची उत्तरे यावर निवडणूक वळवण्याऐवजी ती लग्नापर्यंत पोहोचवण्यात आली. निदान राष्ट्राच्या हितासाठी किंवा राष्ट्रभक्तीचा भाग म्हणून तर नेत्यानं आता स्पष्ट बोलायला हवं. 'मन की बात'मध्ये हा विषय घालून बोलायला हवं. ●●●

# बोधी वृक्षातील सळसळता आक्रोश

प्रत्येक सभ्य माणसातही
असतो एक असभ्य पुरूष
आत खदखदणारा एक अबोला जपून

झाडावरच्या पाखरावर
भिरभिरते त्याचेही मन
पंखातील ऊर्जा ताणून

अंगात असते जननक्षमता
त्यालाही अस्वस्थ करतो तिचा प्रौढ स्पर्श

अनेकदा गुदमरुन जातो तोही
सभ्यपणाच्या ओझ्याने

लादता येत नाही तसे कुणावरही
अनाहूतपणे कुणाचेही ओझे

आतल्या पशुला गोंजारण्याची
क्षमता कमावलेली असते त्याने
सभ्यपणाच्या सरावातून

माणसातल्या या पुरूषत्वाला
घ्यायला नको का समजून तिने ?

असभ्यतेच्या तळमळीतून
मिळत जातो सभ्यतेला आकार
यातनांच्या वाळवंटाला छेदूनच
पुढे सरकते उद्दिष्टाची पाऊलवाट

प्रत्येक सभ्य माणसाच्या थोरपणात
गाडला जातो एक महापुरूष
म्हणूनच उगवतो त्याच्या थडग्यावर
बोधिवृक्षातील सळसळता आक्रोश...

# उद्विग्न मन

माझे उद्विग्न अन भयभीत प्रतिबिंब
आकाशाच्या कंगोऱ्यांना
घृणेने वेढून टाकत आहे

स्वतःला भेडसावणारी असुरक्षितता
अंतरंगातली खासियत बनते आहे
अन् उलगड़त जाताहेत एकेक करून
हिंसकांचे रोमांचक अहम

कुप्रसिद्ध दरोडेखोराने
हिसकावून घ्यावे सारे
असेच झालेय नेतानिष्ट भोगवाद्यांचे

हुतात्मा, महात्मा, लोकमान्य, स्वातंत्र्यवीराना
वाहून नेणारी एक ऐतिहासिक महानदी
डोळ्यांच्या आरपार होत जातेय

अन् शतकापलीकडचे पाहणारे डोळे
होऊन जातात दगडाचे
स्फटिकासारख्या स्वच्छ वेदनांनी
न्हाऊन निघतो आम्ही

तरीही अथकपणे चिरडत आहोत
आपणच एकमेकांना दिङ्मूड होऊन...

**– प्रा.डॉ. सिद्धोधन**

# कोण काय बोलतं...



**अॅड. प्रकाश आंबेडकर** (वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक)

मोदी हे दहावी पास डॉक्टर असून त्यांनी नोटाबंदीचा निर्णय चुकीचा घेतला



**शरद पवार** (राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष)

नरेंद्र मोदींना घराचा अनुभव नाही आणि ते मात्र दुसऱ्याच्या घराची चौकशी करत आहेत



**डॉ. भालचंद्र मुणगेकर** (ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ)

गेल्या ४५ वर्षांतील उच्चांक गाठणारी बेरोजगारी देशात आहे. पाच कोटी तरूण नोकरीच्या शोधात आहेत



**वीरेंद्र सहवाग** (भारताचा माजी सलामीवीर)

क्रीडा संघटनांच्या वादामध्ये खेळाडूंवर बंदी कशासाठी घालायची



**सॅम पित्रोदा** (अनिवासी भारतीय कॉंग्रेस सेलचे अध्यक्ष)

निवडणूक प्रचारात लोकांचे जिव्हाळ्याचे प्रश्न मागे पडले असून त्यांची जागा फेक मुद्यांनी घेतली आहे



**आ. विनायक मेटे** (शिवसंग्राम संघटनेचे अध्यक्ष)

माझ्या मंत्रीपदाच्या वाटेत पालकमंत्री पंकजा मुंडे मांजरासारख्या आडव्या आल्या



**राहुल गांधी** (कॉंग्रेस अध्यक्ष)

कॉंग्रेसने देशातील कोट्यवधी लोकांच्या भावना जाहीरनाम्यातून व्यक्त केल्या. भाजपाचा जाहीरनामा मात्र बंद दाराआड तयार करण्यात आला




**ममता बॅनर्जी**

यापुढे मी मोदींना पंतप्रधान न म्हणता 'एक्सपायरी बाबू' (मुदत संपलेला नेता) असे म्हणेन




**महादेव जानकर** (महाराष्ट्राचे दुग्धविकास मंत्री)

भाजपाच्या चिन्हावर माढ्यातून निवडणूक लढविण्याची मला ऑफर होती



**ख्रिश्चन मिशेल** (घोटाळ्यामधील मध्यस्थ)

वेस्टलॅन्ड हेलिकॉप्टर घोटाळा प्रकरणी आपण कोणत्याही राजकीय नेत्याचे नाव घेतलेले नाही



**रोहित शर्मा** (मुंबई इंडियन्सचा कर्णधार)

आयपीएलमधील प्रत्येक फ्रेंचायजी आपापल्या विभागातील गुणवान खेडाळूंना शोधून काढत असल्याने चांगले खेळाडू मिळाले



**थेरेसा मे** (ब्रिटनच्या पंतप्रधान)

अमृतसरमधील जालियनवाला बाग हत्याकांड हे ब्रिटिशांच्या भारतीय इतिहासावर लागलेला एक लाजिरवाणा डाग आहे

पाक्षिक

स्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्यायासाठी

# द पीपल्स पोस्ट

# वार्षिक वर्गणीदारांना

## २०% सवलत!

**देश आणि राज्यातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक घटनांचा वेध घेणारे निपक्षः निर्भीड पाक्षिक**

---

**हो, मी "द पीपल्स पोस्ट" चा वर्गणीदार बनू इच्छितो!**

खाली आपल्या आवडीच्या ऑफरवर निषाण लावून वाचक-वर्गणीदाराचा फॉर्म भरून खालील पत्त्यावर पाठवावा :
कार्यालय : ११ तळमजला, बी ब्लॉक, लक्ष्मी निवास,
जे.के. सावंत मार्ग, यशवंत नाट्य मंदीरा समोर,
माहीम (वेस्ट), मुंबई- ४०००१६

| टिक करा | अवधि | एकूण अंक | कव्हर किंमत (रू.) | आपल्याला द्यावे लागतील (रू.) | |
|---|---|---|---|---|---|
| ☐ | १ वर्ष | २४ | ६०० | ५०० | |
| ☐ | ६ महिने | १२ | ३०० | ३०० | |
| ☐ | ३ महिने | ६ | १५० | १५० | |

(वार्षिक विशेषांक - ६) / (६ महिने-३)

चेक किंवा डीडी ने पेमेंट

मी 'द पीपल्स पोस्ट' च्या नावाने पाठवत आहे. ---------------------- दिनांक -------- (बँकेचे नाव) ----------------

चेक/डीडी क्र. --------------------.

किंवा माझ्या क्रेडीट कार्ड ने वसूल करा ☐ ☐ VISA ☐ AMERICAN EXPRESS कार्ड नं. ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

कार्डधारकाचे नाव : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ कार्ड एक्सपायरी दिनांक : ---- महिना---- वर्ष-----

कार्डधारकाची स्वाक्षरी : -------------------------------- जन्म तारीख : --------- दिवस----- महिना----- वर्ष-----

नाव : ---------------------------------------------------------पत्ता : ---------------------------

----------------------------------------------------------शहर : ------------------------------------

राज्य : ------------------------ पिन कोड : ------------------ फोन नं. (घर) : ------------------------

मो. नं. : ----------------------इ-मेल : ------------------------------------------------------------

आपण या माध्यमांद्वारेही सबस्क्राईब करू शकता
२९ ऑगस्ट ते १२ सप्टेंबर २०१८

WhatsApp व्हॉट्स अप क्रं. ८८८८५४१८२२ किंवा ७३५००९१५६३ क्र. वर फोन करा:

इ-मेल करा thepeoplespost2014@gmail.com

लॉग ऑन करा www.thepeoplespost.com

कृपया लक्ष द्या : ही ऑफर मर्यादीत कालावधीसाठी आहे. द पीपल्स पोस्ट यांच्याकडे ह्या ऑफरशी संबंधीत कुठल्याही नियम व अटींना कमी करणे किंवा वाढवण्याचे अधिकार आरक्षित आहेत.

■ POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2019-21
■ RNI REG. NO. MAHMAR/2018/76460

With Best Compliments
from



M.K.CONSTRUCTIONS